Regd. N. No 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१ ] आकोला—सोमवार तारीख ३ माहे सप्टेंबर सन १९१७ ई० [ अंक ३५

नवीन ग्रंथ ) विक्रीस तयार ( नवीन ग्रंथ

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्यसच्चिदानंदसरस्वतीदेवस्वामी, पूर्वाश्रमी रा. रा. गणेश वामन देव नांदोदकरकृत.

आवृत्ति दुसरी ] आत्मविचार. [ किं. रु. १॥ पोष्ट शिवाय

पृष्ठसंख्या डेमी अष्टपत्री सुमारें २०० डिसेंबर १९१७ चे आंत मागणी करणारांस पो. व व्ही. पी. नाहीं. विशेष माहितीकरितां तारीख ५ व १२ डिसेंबरच्या केसरींतील जाहिरात पहा. मिळण्याचें ठिकाण.

अनंत गणेश शेकदार,

मॅनेजर इंदुप्रकाश प्रेस, मुंबई, नं. २.

नो. नं. ३१०

# पाहिजे.

देववेवीच्या दुकाना करतां गुमास्ते

## नोटीस

नोटीस देणार किसन वा बापू पाटील रा० बोंडगांव तालुके खामगांव जि० बुलठाणा याजकडून:—

केशव वल्लद शामशी व नामदेव शानजी रा० डिडोळेकर तालुके मलकापूर पोष्ट मोताळे जि॥ बुलठाणा

यांस:—

कळावें कीं बाप्या वा अवधूत व राजाराम वा अवधूत हे अज्ञान आहेत यांचें पालन करणार त्यांची आई भागीरथी मर्द अवधूत ही आहे. हल्लीं माझे बाईणीनें बटाईनें शेतें केलीं आहेत. घरची शेते ही घरीच आहेत. त्यांतील माल होणारा हा भागिरथी इचे ताब्यांत असावा. हा माल दुसरे कोणाचे ताब्यांत नसावा इतके करून असल्यास जो हा माल आपले ताब्यांत ठेवील त्याजवर सर्व जबाबदारी राहील व त्याजबद्दल आह्मी त्याज जवळून दरमहा दर शेकडा २ दोन रुपये प्रमाणें व्याज घेऊं व आह्मी ज्यावेळीं माल मागूं त्यावेळेस दिला पाहिजे व पेवांत ज्वारी भरलेली आहे त्यांत भागिरथीची दोन खंडी जवारी आहे. ती जवारी ही नोटीस पोचल्या बरोबर भागिरथी इचे स्वाधीन करावी न केल्यास हंगामावर दोन खंडीची २॥ अडीच खंडी घेऊं व याची ही जोखीम तुमच्यावरच आहे. भागिरथीची मुलें हा अज्ञान आहेत व अज्ञानाचे पालन करणार त्याची आईच आहे हे मी पाटील पटवारी यांस कळविलें आहे व गांवकरी लोकांस ठाऊकच आहे. ही नोटीस माझी बहीण भागिरथी इचे मार्फत दिली आहे. कळावें ता० ५।९।१७

सही

किसन वा बापु पा. दस्तूर खुद

नो० नं० ३८९

वऱ्हाडसमाचार

अधिक भाद्रपद वद्य २ पिंगल संवत्सर १८३९

## स्पेशल प्रांतिक परिषद्.

मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून दोहोंची स्पेशल प्रांतिक परिषद् गेल्या तारीख २६ रोजीं नागपूर येथें नामदार राय साहेब कल्याणजी ठाकर बॅरिष्टर रायपूर यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. राजकारणांतील संकटावस्थेमुळें ही परिषद् मुद्दाम भरविण्यांत आली आणि राष्ट्राच्या या विपत्कालीं हे दोन्ही प्रांत खामग इतक्या उच्च मनोवृत्तीला चढले कीं सरासरी प्रयाग ५०० प्रतिनिधी एकत्र जमले होते. बाहेर बरीं गांवचे आणि विशेषतः वऱ्हाडांतील पुष्कआली असूनधुरंधर मंडळी हें राजकारणाचें कोडें हजर होती. णारीं तेथें मोठ्या उत्साहानें व चिंतामण जोग ग्री- होते. एकच विचारस्फूर्ति सभेचें अध्यक्षस्थ सद्र गांत नांदत होती असें ग्वालेरकर वैद्य यांनीं स्वै मुळें सभेचें सर्व कार्य आणली व तिला श्री ते मानें सिद्धीस गेलें. जरी वैद्य यांनीं अनुमोदन उर्फ सत्याग्रहाचा ठराव स्थानापन्न झाले. पसर झाला नाहीं तरी चिटणीस हरी शास्त्री ग्रहाच्या लाटेला थोपवून धरआजची सभा कशा क्षांना आपलें गांडीव अस्त्र हें प्रांतिक वैद्यमंडळ वें लागलें. हें अस्त्र ह्मणजे रण काय? मंडळाचे डूं व अध्यक्षपणाचा राजीवगैरे सविस्तर रितीनें दहशत होय. या दहशतीला भेस कांहीं कारणामुळें हजर रा दिवशीं सिंनमल्याबद्दल व 'मंडळा' चें आपला सत्रकरण्याबद्दल गेल्या निखिल डीत कागदावर वैद्यसंमेलनाचे अध्यक्ष कोचीनचे भेच्या राजापेक्षां सर रामवर्मा जी. सी. एस्. आ रावळी कीं सी. आय्. ई., पं. जगन्नाथ जी राजश्री नि. भा. वैद्यसंमेलनस्थायीसर्म उदार विचार पूर्वीच चिटणीस अलाहाबाद, वै. पोहत. तेव्हां एकटा मनुष्य कवडे पुणे, डॉ० कुंटे धुळेकर करूं शकत नाहीं प्रांतीय लोकांकडून व लक्ष्मण गी आशेच्या दृष्टीनें हा णशीकर वैद्य नागपूर, कार्विमंडन वैद्य उ हतों.

दामोदर गोविंद वराडपांडे वैद्य नागपूर, डॉ मुंजे नागपूर, पंढरीनाथ दामोदर मुळे वैद्य उमरावती, विद्वांस वैद्य उमरावती व यवतमाळ, गणेश मोरेश्वर वैद्य उमरावती, पंडे वैद्य उमरावती, हरीप्रसाद शर्मा वैद्य बऱ्हाणपूर, भालचंद्र गणेश नवाल्ये वैद्य सागर डॉ० घारपुरे वर्धा, श्री. रामकृष्ण गोविंद मेटे शेगांव, वि. र. मुजुमदार टेंबुर्णी हुषंगाबाद, आयुर्वेदविशारद मासोदकर वैद्य जरुड, गुंडूभट वैद्य टेंबुर्णी, रत्नपारखी वैद्य वरुड, मोहगांवकर वैद्य वरूड, देशपांडे वैद्य

## राष्ट्रगीत

भारत हमारा देश है, हित उसका निश्चय चाहेंगे, और उसके हितके कारण, हम कुछ न कुछ कर जाएंगे॥ भारत हमारी मातृभूमी उसका ऋण हम पर है बहुत, उसके मिटानेके लिये, हम कुछ न कुछ कर जाएंगे ॥१॥ भारतके दुःखप्रद अवनाति पर क्यों नहिं अश्रु बहावेंगे, उसके हटानेके लिये हम कुछ न कुछ कर जाएंगे ॥२॥ धर्म विद्या और धनसे उन्नति भारतकी होवे, उस उन्नतिके मार्गमें हम कुछ न कुछ कर जाएंगे ॥३॥

त्या नंतर वंदेमातरम् चें गीत आणि दुसरी त्या प्रसंगाला अनुरूप अशी मुद्दाम केलेलीं तीन तेजस्वी गीतें ह्मणण्यांत आलीं. या तिन्ही पदांमध्यें परिस्थितीचा बागुल बावा प्रेमानें फेकून द्या, सुधारणांच्या शुष्क लालचीनें फसूं नका आणि बेसनदशीर दडपेशाहीला भिऊं नका असा उपदेश केला असून या पुण्यभूमीच्या पूर्वीच्या सम्राटांच्या प्रतापाची आठवण देऊन या स्वराज्याच्या नव्या आकांक्षा लोकांपुढें कावि ताम्हनकर यांनीं मांडल्या आणि राष्ट्राचा सवाल ह्मणून सारंग रागांत 'स्वराज्याचा ध्वज उभा राहो', अशी नांदी ह्मणण्यांत आली. स्वागत कमीटीचे अध्यक्ष डॉक्टर हरी शंकर गौर यांनीं प्रथम जबलपूर, नरसिंगपूर, यवतमाळ, कारंजा, इत्यादि ठिकाणाहून आलेल्या तारा वाचून दाखविल्या आणि ते इंग्रजींत उच्च कंठरवानें व अंतःकरणाच्या देठापासून बोलत होते. ते ह्मणाले कीं ही परिषद संकट परिषद होय. हल्लींचें सरकारी धोरण इतकें भीषण आहे कीं थंड नेमस्त देखील अंगावर काटा उभा राहून मागें सरतील. लोकांच्या सनदशीर सार्वजनिक कारभारावर अशा रितीनें मुस्कटदाबीचा भयंकर प्रयोग चालू आहे. कोणीही विचारी मनुष्य या दडपशाहीला आपल्या मताचा आश्रय देणार नाहीं. कलकत्याच्या जाहीरसभेवर लॉर्ड रोनाल्ड शॉ यांनीं जेव्हां गदा उगारली तेव्हां लोकांच्या चळवळी अशा जुलमी हुकमानें बंद करून मनुष्य जर आपला अतिनिकृष्ट लघुपणा व्यक्त शकत नाहीं तरी लोकांचा हा अनादर एवढा दृष्टीनें हा ठराव आपल्या तेचा प्रतिध्वनी सर्व

णूनच मुंबईस भरसंतोषी व मास्लेम खा भरविकमेटी नेमण्यांत श्री

कारीमंड ठराव भवानी शंकर निबाळापुर दिली. ते ह्मणाले अनुमोदन देऊ

अध्यक्ष—डॉ. नरहर शिवराम ऊर्फ बाबासाहेब परांजपे. यवतमाळ

उपाध्यक्ष—पं. दामोदरराव देसाई वैद्य—जबलपूर.

" वैद्य—रामकृष्ण सेवाराम दुबे. नागपूर

" वैद्य पंचानन लक्ष्मणशास्त्री फणशीकर नागपूर

जो नुकताच **आनंदाचा किरण** प्रसिद्ध झाला आहे त्यानें आशा पुन्हां उज्वल झाल्या आहेत आणि राजश्री मॅंटेग सेक्रेटरी ऑफ स्टेट हे प्रधान मंडळाच्या हुकमाप्रमाणें इंडिया सरकारला खऱ्या जबाबदारीची ओळख करून देण्यापूर्वींच अटकेंत ठेवलेली देशभक्त मंडळी पुन्हा आह्मामध्यें येऊन मिसळतील व सभाबंदीचीं धोरणें विलयास जातील तर या नव्या संदेशाला कीन व्हिक्टोरीयाच्या वेळच्या जाहिरनाम्याप्रमाणेंच लोक **मॅगनाचार्टा** समजतील असा भरंवसा आहे.

त्यानंतर नामदार विष्णुदत्त शुक्ल यांनीं हिंदींत अध्यक्षांची निवड करण्याची सूचना आणली. लार्ड हार्डिंज यांचा दृष्टिकोन चांगला होता ह्मणूनच स्वराज्य कामनेचे अंकुर नुकतेंच फुटूं लागले होते, पण ती कारकीर्द बदलतांच ते अंकुर जागच्या जागींच दबून चालले आ राजश्री मॅंटेग यांच्या भावी मुलाखतीमुळे आशेचे परिवर्तन झालें आहे. ही हर्षाची **घोषणा** उद्देशाच्या प्राप्ती विषयीं विश्वास व आनंद उत्पन्न करिते. प्रस्तुतच्या महत्वाच्या समयीं नामदार रायसाहेब ठाकर हेच उत्कृष्ट निर्वाह करण्यासारखे आहेत. या सूचनेला राजश्री मोरोपंत जोशी यांनीं अनुमोदन दिल्यावर अध्यक्षांनीं आपलें पाहिलें संभाषण अगदीं खड्या स्वरामध्यें वाचलें आणि त्यांच्या भाषणांत विलक्षण जोम, स्पष्टोक्ती व निराशजनक पारीस्थितींतही टॅनिसनची काव्यदृष्टी ही ठिकाठिकाणीं चमकत होती. सर बेंजामिन यांच्या उमरावतीच्या ११ आगष्टच्या संभाषणालाही अध्यक्षांनीं अगदीं सयुक्तिक व समर्पक असा जबाब दिलेला आहे. या भाषणाचा सारांश आह्मी दुसरीकडे देणार आहों.

मध्यंतरीं अर्धा तास १५ जिल्ह्यांतर्फेच्या सब्जेक्ट कमिटीनें पूर्ण विचार करून आपलें समेपुढें मांडावयाचे प्रस्ताव निश्चित करून आणले. अध्यक्षांनीं पाहिले तीन ठराव दुःख प्रदर्शनाचे सुचविले. कैलासवासी दादाभाई नौरोजी या राजकीय भीष्माचार्यांचा मृत्यु, कै. अबदुल रसूल यांच्या अल्पकालीन तेजस्वी प्रयत्नामुळें झालेलें दोन धार्मियांचें संमीलन पाहतां त्यांचा अकालीं मृत्यु, आणि तसेंच राव बहादूर काशीनाथ केशव ठाकुर या प्रांतिक पेन्शनदार थोर गृहस्थाचा सार्वजनिक कार्यारंभींच होणारा मृत्यू. त्या तिन्ही हो

आयुर्वेदाभिमानी सद्गृहस्थास या वैद्यमंडळाचे सभासद होतां येतें" असा खुलासा झाल्यावर जमलेल्या बहुतेक सर्व मंडळींनीं आपलीं नांवें सभासदाचे यादींत नोंदावीलीं.

नंतर श्री. हरीहर सीताराम जोशी वैद्य गर्जिदेकर यांनीं वैद्यमंडळाचे स्थापनेनिमित्त काहीं स्वतः नवीन तयार केलेल्या मराठी कविता व आर्यवैद्यकावरील समयोचित

Regd-N. No150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला—सोमवार तारीख १० माहे सप्टेंबर सन १९१७ ई० [अंक ३६

## काश्मीरी केशर.

पवित्र आणि अस्सल १७८ उत्तम कस्तुरी ३९, शुद्धशिलाजीत ४८ सुर्मी ममीरा ३ तो. अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १० कागजी बादाम ४९ पौंड, सेबाचा मुरब्बा २ पौं. टिन १।.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५

नो० नं० ९

—

## नोटीस

नोटीस देणार किसन वा बापू पाटील रा० बोंडगांव तालुके खामगांव जि० बुलढाणा याजकडून:—

केशव वल्लद शामशी व नामदेव शामजी रा० डिडोळेकर तालुके मलकापूर पोष्ट मोताळे जि॥ बुलढाणा

यांस:—

कळावें कीं बाब्या वा अवधूत व राजाराम वा अवधूत हे अज्ञान आहेत यांचें पालन करणार त्यांची आई भागीरथी मर्द अवधूत ही आहे. हल्लीं माझे बाईणीनें बटाईनें शेतें केलीं आहेत. घरची शेते ही घरीच आहेत. त्यांतील माल होणारा हा भागिरथी इचे ताब्यांत असावा. हा माल दुसरे कोणाचे ताब्यांत नसावा इतके करून असल्यास जो हा माल आपले ताब्यांत ठेवील त्याजवर सर्व जबाबदारी राहील व त्याजबद्दल आम्ही त्याज जवळून दरमहा दर शेकडा २ दोन रुपये प्रमाणें व्याज घेऊं व आम्ही ज्यावेळीं माल मागूं त्यावेळेस दिला पाहिजे व पेवांत ज्वारी भरलेली आहे त्यांत भागिरथीची दोन खंडी ज्वारी आहे. ती ज्वारी ही नोटीस पोचल्या बरोबर भागिरथी इचे स्वाधीन करावी न केल्यास हंगामाचे दर दोन खंडीची २॥ अडीच खंडी घेऊं व याची ही जोखीम तुमच्यावरच आहे. भागिरथीची मुलें हा अज्ञान आहेत व अज्ञानाचे पालन करणार त्याची आईच आहे हे मी पाटील पटवारी यांस कळविलें आहे व गांवकरी लोकांस ठाऊकच आहे. ही नोटीस माझी बहीण भागिरथी इचे मार्फत दिली आहे. कळावें ता० ५।९।१७

सही

किसन वा बापु पा. दस्तूर खुद

नो० नं० ३८९

## पत्रव्यवहार

### वऱ्हाड- मध्यप्रांतीय वैद्यमंडळ.

पूर्वी, वऱ्हाड- मध्यप्रांतांतील वैद्यांस व आयुर्वेदाभिमानी गृहस्थांस महाराष्ट्र, मारवाडी, नागपूर व वऱ्हाड टाईम्स, कर्तव्य, सुबोधसिंधु, मित्र, वऱ्हाड-समाचार, संदेश वगैरे पत्रांतून जाहीर रीतीनें व सुमारें ३०० पत्रें पाठवून खाजगी रीतीनें सूचना दिल्याप्रमाणें श्रीकृष्ण जयंतीचे मुमुहूर्तानें ह्मणजे ता. ९ माहे आगष्ट सन १९१७ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां येथील श्रीकृष्णचिकित्सालयांत वैद्य व आयुर्वेदाभिमानी गृहस्थ यांची सभा झाली. सभेस, देवीदास जयराम उपाध्ये बाळापूर, श्रीधर भाउराव दाणे वैद्य अकोट, नारायण कृष्ण सावरकर वैद्य एलिचपूर, आत्माराम शास्त्री वरणगांवकर वैद्य खामगांव, हरिभाऊ जोशी वैद्य रार्जिदा, प्रयागराज तिवारी वैद्य बार्शीटाकळी, वगैरे बरीचशी वैद्य मंडळी ठिकठिकाणांहून मुद्दाम आली असून येथील ही सर्व वैद्यमंडळी हजर होती. प्रथमतः श्रीयुत परशराम चिंतामण जोगळेकर वैद्य यांनीं, आजच्या सभेचें अध्यक्षस्थान श्री. नरहर धोंडदेव ग्वालेरकर वैद्य यांनीं स्वीकारावें अशी सूचना आणली व तिला श्री. गोपाळराव जोशी वैद्य यांनीं अनुमोदन दिल्यावर अध्यक्ष स्थानापन्न झाले. नंतर मंडळाचे मुख्य चिटणीस हरी शास्त्री पराडकर वैद्य यांनीं आजची सभा कशाकरितां बोलाविली आहे? हें प्रांतिक वैद्यमंडळ स्थापन करण्याचें कारण काय? मंडळाचें महत्व काय आहे? वगैरे सविस्तर रीतीनें सांगून, आजच्या सभेस कांहीं कारणामुळें हजर राहतां येत नसल्याबद्दल व 'मंडळा' चें अभिनंदन करण्याबद्दल गेल्या निखिलभारतवर्षीय-वैद्यसंमेलनाचे अध्यक्ष कोचीनचे महाराज सर रामवर्मा जी. सी. एस्. आय्., जी. सी. आय्. ई., पं. जगन्नाथ प्रसाद शुक्ल नि. भा. वैद्यसंमेलनस्थायीसमितीचे मुख्य चिटणीस अलाहाबाद, वै. पं. कृष्ण शास्त्री कवडे पुणे, डॉ० कुंटे धुळे, वगैरे परप्रांतीय लोकांकडून व लक्ष्मण शास्त्री फणशीकर वैद्य नागपूर, कार्विमंडन वैद्य उमरावती दामोदर गोविंद वराडपांडे वैद्य नागपूर, डॉ मुंजे नागपूर, पंढरीनाथ दामोदर मुळे वैद्य उमरावती, विद्वांस वैद्य उमरावती व यवतमाळ, गणेश मोरेश्वर वैद्य उमरावती, पंडे वैद्य उमरावती, हरीप्रसाद शर्मा वैद्य बऱ्हाणपूर, भालचंद्र गणेश नवाथे वैद्य सागर डॉ० घारपुरे वर्धा, श्री. रामकृष्ण गोविंद मेटे शेगांव, वि. र. मुजुमदार टेंबुर्णी हुषंगाबाद, आयुर्वेदविशारद मासोदकर वैद्य जरुड, गुंडुभट वैद्य टेंबुर्णी, रत्नपारखी वैद्य वरुड, मोहगांवकर वैद्य वरूड. देशपांडे वैद्य पुलगांव, आठल्ये वैद्य खामगांव, पं. दिनानाथ शर्मा एलिचपूर, वगैरे वगैरे वऱ्हाडमध्यप्रांतीय वैद्यवर्गाकडून व आयुर्वेदाभिमानी सद्गृहस्थांकडून आलेल्या पत्रांचा व तारांचा उल्लेख केला. नंतर पहिला— ठराव. या संस्थेचें नांव "वऱ्हाड-मध्यप्रांतीय वैद्य मंडळ" असें असावें व त्याचे उद्देश—

१ आर्यवैद्यकाची उन्नती व प्रसार, खालीं लिहिलेल्या व आणखी ही योग्य व शक्य असतील त्या उपायांनीं करणें.

(अ) आयुर्वेद विद्यालयें काढून शिक्षण देणें.

(आ) आयुर्वेदाचे जुने अमुद्रित हस्तलिखित ग्रंथ मिळविणें व ते प्रसिद्ध करणें.

(इ) आयुर्वेदिक ह्मणजे देशी वैद्यकाचे मोफत दवाखाने (१) म्युनिसिपालिटी व लोकल बोर्ड यांजकडून (२) एखाद्या मोठ्या उदार व श्रीमान् सद्गृहस्थाकडून (३) व एखादा फंड उभारून त्यांतून ठिकठिकाणीं स्थापन करणें.

(ई) वनस्पतींचे बाग तयार करणें.

(उ) ठिकठिकाणीं सभा भरवून व व्याख्यानें देऊन लोकमत आर्यवैद्यकाकडे वळविणें.

२ या "प्रांतीय वैद्यमंडळा" करितां सभासद मिळविणें

(३) जे सद्गृहस्थ वर लिहिलेल्या व आणखी ही योग्य व शक्य असलेल्या उपायांनीं आयुर्वेदाचे उन्नती व प्रसाराविषयीं आस्थापूर्वक कळकळीनें खटपट करतील त्यांस निखिल भारतवर्षीयआयुर्वेदविद्यापीठाकडून प्रशंसापत्र, पदक अगर पदवी देऊन संमानित करण्याविषयीं शिफारस करणें.

४ आयुर्वेदमहामंडळाचे नियमांप्रमाणें व आज्ञेप्रमाणें शक्य ती खटपट करणें. असें असावें व त्याप्रमाणें मंडळानें नेहमीं खटपट करीत असावें. असा ठराव चिटणासांनीं पुढें मांडला व त्यावर बरींच भाषणें व चर्चा होऊन तो सर्वानुमतें पास झाला.

नंतर ठिकठिकाणच्या लोकांनीं समक्ष व पत्रांतून सुचविलेल्या नांवांचा विचार करून आणि सभेंत जमलेल्या मंडळीमध्यें बरीच वाटाघाट करून "खालीं लिहिलेल्या गृहस्थांचें अधिकारीमंडळ निवडण्यांत यावें" असा दुसरा ठराव चिटणीसांनींच पुढें आणला त्यास बाळापुरचे वैद्य दे. ज. उपाध्ये यांनीं अनुमोदन देऊन तो सर्वानुमतें मंजूर झाला.

अध्यक्ष— डॉ. नरहर शिवराम ऊर्फ बाबासाहेब परांजपे. यवतमाळ

उपाध्यक्ष— पं. दामोदरराव देसाई वैद्य— जबलपूर.

" वैद्य— रामकृष्ण सेवाराम दुबे. नागपूर

" वैद्य पंचानन लक्ष्मणशास्त्री फणशीकर नागपूर

" नॉ. यशवंत गोविंद देशपांडे. उमरावती.

" डॉ. चोळकर नागपूर.

चिटणीस व खजिनदार } हरिशास्त्री पराडकर वैद्य अकोला

चिटणीस

" श्रीनिवासशास्त्री हरदास वैद्य. नागपूर.

" हरिप्रसाद शर्मा वैद्य. बऱ्हाणपूर

" पंढरीनाथ दामोदर मुळे वैद्य उमरावती.

" डॉ. सिध्दनाथ कृष्ण काणे. यवतमाळ.

ठराव तिसरा 'या वैद्यमंडळाचें सर्व ठिकाणीं एकसमयावच्छेदेंकरून काम करण्याकरितां ह्मणून एक कार्यकारिमंडळ नेमण्यांत यावें, त्यांत वरील सर्व गृहस्थ व आणखीही कांहीं बरीच मंडळी असून ह्या कामासाठीं आणखाही ज्या सद्गृहस्थांस कार्यकारीमंडळांत घेणें अवश्य वाटेल व ज्यांची काम करण्याची तयारी असेल अशा सद्गृहस्थांस कार्यकारीमंडळांत घेणेचा अधिकार, अधिकारी मंडळास देण्यांत यावा.' असा तिसरा ठराव चिटणिसांनीं पुढें मांडला व त्यास श्री. जोगळेकर यांनीं अनुमोदन देऊन तो ही पास झाला.

चवथा ठराव— या वैद्यमंडळाचे सभासदाची वार्षिक वर्गणी कमींतकमी एक रुपया असावी, हा अध्यक्षांनीं पुढें मांडला व पास झाला.

नंतर चिटणिसांनीं या मंडळाचे सभासद होण्याविषयीं सर्वांस सूचना देतांना असें सांगितलें कीं "या मंडळाचे जितके जास्त सभासद होतील तितके पाहिजे आहेत. कारण ह्या सभासदांपैकीं एक दशांश ह्मणजे शेंकडा दहा सभासद निखिलभारतवर्षीय वैद्यसंमलनाचे स्थायीसमितींत निवडून देण्याचा हक्क प्रांतीय वैद्यमंडळास आठव्या वैद्यसंमेलनांतच मिळालेला आहे. तरी आपल्या वऱ्हाड मध्यप्रांतांतील जितके जास्त सभासद स्थायीसमितींत निवडून जातील त्या मानानें तेथें आपल्या प्रांताचें वजन व दर्जा, जास्त मोठा होणार आहे. ह्मणून सर्वांनीं ह्या मंडळाचें सभासद व्हावें व प्रत्येकानें आणखी सभासद मिळवून देण्याविषयीं खटपट करावी' तेव्हां "सभासद कोणास होतां येते? सभासद होणारा वैद्यच असला पाहिजे कीं काय?" असे कांहीं मंडळीकडून प्रश्न करण्यांत आले. त्याचा चिटणीसाकडून "कोणा ही आयुर्वेदाभिमानी सद्गृहस्थास या वैद्यमंडळाचे सभासद होतां येतें" असा खुलासा झाल्यावर जमलेल्या बहुतेक सर्व मंडळींनीं आपलीं नांवें सभासदाचे यादींत नोंदाविलीं.

नंतर श्री. हरीहर सीताराम जोशी वैद्य रार्जिदेकर यांनीं वैद्यमंडळाचे स्थापनेनिमित्त कांहीं स्वतः नवीन तयार केलेल्या मराठी कविता व आर्यवैद्यकावरील समयोचित

असा एक निबंध वाचून दाखविला.

नंतर अध्यक्षांनीं आंग्लवैद्यक व आर्यवैद्यक यांची तुलना करून आंग्लवैद्यकापेक्षां आर्यवैद्यक कसें व कोणत्या बाबतींत श्रेष्ठ आहे आंग्लवैद्यक किती परतंत्र आहे व आपलें आर्यवैद्यक किती व कसें स्वतंत्र व स्वावलंबी आहे हें मुद्देसूद रीतीनें प्रतिपादन केलें.

नंतर अध्यक्षांचे व जमलेल्या सर्व मंडळींचे आभार मानण्यांत आल्यावर सभेचें काम झालें.

सभासद होण्याबद्दल वर्गणी पाठविणें, आयुर्वेदाचे जुने हस्तलिखित ग्रंथ मिळवून ते पाठविणें व वऱ्हाड मध्यप्रांतीय वैद्यमंडळासंबंधीं कोणता ही पत्रव्यवहार करणें तो खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.

**हरी शास्त्री पराडकर वैद्य.**
चिटणीस वऱ्हाड मध्यप्रांतीय वैद्यमंडळ अकोला वऱ्हाड

---

**वऱ्हाडसमाचार**

अधिक भाद्रपद वद्य १० पिंगल संवत्सर १८३९

## अत्यंत नाजूक परिस्थिति.

सध्या आपल्या देशाची राजकीय स्थिति अत्यंत नाजूक झालेली आहे हें वर्तमानपत्रें वाचणारांस व राजकीय सभांमध्यें हजर राहणारांस सहज दिसून येणार आहे. कांग्रेस मध्यें नेमस्त व जहाल असे जे दोन पक्ष होते त्यांमधले मतभेद नाहींसे होऊन दोन्ही पक्ष लखनौ कांग्रेसचे वेळीं एक झाले. त्या गोष्टीला अजून पुरें एक वर्ष ही झालें नाहीं, तोंच दुसरा एक अत्यंत मोठा मतभेदाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. हिंदुस्थानचा राज्यकारभार येथील लोकांच्या विचारानें चालला पाहिजे असा जोराचा आग्रह धरल्यावांचून आणि त्यासाठीं बराचसा स्वार्थत्याग करण्यास तयार झाल्यावांचून इष्ट सुधारणा घडून यावयाची नाहीं हें तत्व सगळ्या पुढाऱ्यांना मान्य आहे; तथापि या तत्वाचा प्रसार जोरानें केल्याबद्दल व लोकांना त्यांचे नैसर्गिक हक्क कोणते आहेत व ते मिळविण्यासाठीं काय केलें पाहिजे याचें ज्ञान करून देण्याच्या अक्षम्य अपराधाबद्दल मद्रास सरकारानें मिसेस बेझांट प्रभृती पुढाऱ्यांना अटक केली आहे. तेव्हां हिंदुस्थानला कोणतीही हक्काची देणगी देण्याचे अगोदर या पुढाऱ्यांची सुटका सरकारानें केल्याशिवाय हिंदुस्थानच्या लोकांच्या मनाचें समाधान होणार नाहीं येथपर्यंत कोणाचाही मतभेद नाहीं. पण ही सुटका करण्यास सरकार तयार नसेल तर मि. मांटेग्यु यांचें स्वागत हिंदुस्थानानें प्रेमपूर्वक करूं नये, व सरकारी अधिकाऱ्यांशीं कोणत्याही प्रकारची सहकारिता ठेवूं नये, म्हणजे निःशस्त्र प्रतिकाराचें तत्व एकदम अंमलांत आणावें असें तरुण मंडळीचें व त्यांना पाठिंबा देणाऱ्या सर सुब्रह्मण्यम् आयर सारख्या थोड्याशा अनुभववृद्ध पुढाऱ्यांचें म्हणणें आहे. याच्या उलट ना. मि. वाच्छा, मि. व्ही. पी. माधवराव, ना. मि. शास्त्री, ना. मि. केशव पिळे प्रभृति पुढाऱ्यांचें म्हणणें आहे कीं मि. मांटेग्यु सारखे उदार व सहानुभूति प्रेरित अधिकारी प्रत्यक्ष येथील स्थिति अवलोकन करण्यास व येथील लोकनायकांची व अधिकारी वर्गाची सल्लामसलत घेण्यास येणार असतांना त्यांच्याशीं असा रुसवा धरून बसल्यानें आपण आपल्याच हातानें स्वतःच्या पायावर दगड पाडून घेतल्यासारखें होईल. मि. मँटेग्यु यांच्या मनावर आपल्या वर्तनाचा वाईट परिणाम होऊन ते एकतर्फी म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांची तेवढी बाजू ऐकून घेतील व एकतर्फी निकाल देतील आणि सध्या आहे त्यापेक्षां ही अधिकारीवर्ग अधिक शिरजोर होऊन हिंदुस्थानच्या राजकीय प्रगतीला इतका जबरदस्त धक्का बसेल कीं कांग्रेसनें आजपर्यंत केलेले परिश्रम व्यर्थ होऊन हिंदुस्थानची स्थिति आतांपेक्षां ही अधिक वाईट होईल, यासाठी हा हट्ट आपण तूर्त सोडून देऊन मि. मँटेग्यु यांच्याशीं सहकारिता ठेविली पाहिजे व शांतपणा धारण करून त्यांच्यापुढें आपली बाजू मांडली आहे. इतकें ही करून कार्यभाग न होईल तर निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ सुरू करणें प्राप्त आहे असें समजून मग तिचा उपक्रम करणें शहाणपणाचें होईल. यावर तरुण मंडळी व सर सुब्रह्मण्यम् आयर यांचें प्रत्युत्तर असें आहे कीं मि. मँटेग्यु हे पूर्वग्रह विवर्जित मन घेऊन इकडे येत आहेत असा वस्तुतः प्रकार नाहीं. त्यांनीं हिंदुस्थानचें भवितव्य परवाच्या जाहिरनाम्यांत जें दाखविलें आहे त्यांत स्पष्टपणें म्हटलें आहे कीं तें भवितव्य ठरविण्याचें काम स्टेट सेक्रेटरी हिंदुस्थान सरकारच्या विचारानें ठरविणार आहेत. अर्थात् त्यांच्यापासून आम्हा असा कांहीं लाभ प्राप्त होईल अशी अपेक्षां करणें हा केवळ आशाळभूतपणा आहे. शिवाय, हिंदुस्थानच्या लोकांमध्यें सध्याच्या स्थितीमुळें किती क्षोभ उत्पन्न झाला आहे तें त्यांना पूर्णपणें कळेल तरच कांहीं फायदा होईल. खरी स्थिति त्यांच्यापासून लपवून ठेवण्यानें कांहीं एक फायदा व्हावयाचा नाहीं. तिसरी गोष्ट अशी कीं आमच्या हितासाठीं रात्रंदिवस तन मन धन वेंचणाऱ्या आमच्या पुढाऱ्यांच्या हाल अपेष्टा व आमच्या नैसर्गिक हक्काची पायमल्ली सरकारी अधिकारी उघडपणें करीत असतां आह्मी आपला अंतःक्षोभ प्रकट न करितां शांतवृत्ति धारण करावी असा उपदेश करणारे अत्यंत निष्ठुर हृदयाचे असले पाहिजेत; देशहिताविषयीं ते दाखवीत असलेली कळकळ केवळ दांभिकपणाची व स्वतःचा भित्रेपणा छपविण्यासाठीं योजिलेली युक्ति या पलीकडे तिची खरी कांहीं किंमत नाहीं. आह्मी स्वतःची कातडी बचावण्यासाठीं किंवा सरकारी अधिकाऱ्यांची खुशामत करण्यासाठीं आमचे कल्याणार्थ देहकष्ट सोसीत असलेल्या पुढाऱ्यांना अटकेंत तसेच खितपत पडूं दिल्यास आह्मी अत्यंत कृतघ्न ठरूं व स्वतंत्र राष्ट्रें या आमच्या कृतघ्नतेबद्दल आमचा अत्यंत तिरस्कार करतील, आणि आह्मांला जगामध्यें तोंड दाखविण्यास जागा नाहींशी होईल, या ही गोष्टीचा पूर्ण विचार केला पाहिजे. मद्रास प्रांताची विशेष कान्फरन्स नुकतीच भरली होती त्यावेळीं ना. मि. शास्त्री वगैरे पुढाऱ्यांनीं लोकांना मनाची शांतता ठेवण्याविषयीं व निःशस्त्र प्रतिकारापासून तूर्त अलिप्त राहण्याविषयीं जें हस्तपत्रक काढलें होतें त्याचा निषेध भर सभेंत सदर पुढाऱ्यांचे तोंडावर करतांना ना. मि. रामानुजाचार्य यांनीं अशीच सयुक्तिक प्रमाणें पुढें आणून सदरपत्रक काढणारे आमचे खरे पुढारीच नव्हत असें स्पष्टपणें म्हटलें होतें, व ता. ३० आगस्टच्या न्यू इंडिया पत्राचे अंकांत सर सुब्रह्मण्यम् आयर यांनीं त्या पत्रकास जें उत्तर दिलें आहे त्यांतही त्यांनीं ना. मि. रामानुजाचार्य यांच्याच म्हणण्याचा जोरानें अनुवाद केला आहे. अशा रीतीनें आमच्या पुढाऱ्यांत दोन मोठे प्रबळ पक्ष पुनः निर्माण झाले आहेत आणि फूट पडली आहे. प्रामाणिकपणाच्या मतभेदावरून ही फूट पडली आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. तथापि हिचा परिणाम हिंदुस्थानच्या भवितव्यावर कशा प्रकारचा होईल हें सांगणें फार कठीण आहे. मद्रासमध्येंच नव्हे तर प्रत्येक प्रांतांत कमज्यास्त मानानें ही फूट आहे. बंगाल प्रांतांत मात्र निःशस्त्रप्रतिकार आतांच करणें इष्ट आहे असें म्हणणाराची संख्या फार अल्प दिसते, पण इतर सर्व प्रांतांतून उलट स्थिति आहे. ही फूट जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत हिंदुस्थानला कोणताही लाभ होणें अशक्य आहे. निःशस्त्रप्रतिकाराची चळवळ एकीच्या पायावर उभारलेली असते. तो पाया भक्कम नसला तर ती कधीं ही यशस्वी होत नसते. उलट तिचा परिणाम अत्यंत घातुक होतो. ही गोष्ट ध्यानांत धरून सर सुब्रह्मण्यम् आयर सारखे ज्ञानवृद्ध व अनुभववृद्ध पुढारी निःशस्त्रप्रतिकार हातीं घेण्याचा आपला हट्ट तूर्त तरी सोडतील, व उलटपक्षीं ना मि. वाच्छा, शास्त्री प्रभृति पुढारी मिसेस बेझांट प्रभृति पुढाऱ्यांची मुक्तता होईपर्यंत सरकारी अधिकाऱ्यांशीं आह्मांला सहकारिता ठेवतां येत नाहीं, यासाठीं मि. मांटेग्यु यांनीं त्यांना अगोदर तत्काळ सोडून देण्याचा हुकुम करावा अशा विषयीं आपले सोर नैतिक बळ सरकारी अधिकाऱ्यांपाशीं खर्च करून ती गोष्ट घडवून आणतील तर ही तडजोड उत्कृष्ट प्रकारची होऊन पुनः सर्वांमध्यें एकी घडून येईल हें संभवनीय आहे. म्हणून आमची दोन्ही पक्षांच्या पुढाऱ्यांस अशी सविनय विनंति आहे कीं त्यांनीं वर सांगितल्याप्रमाणें तडजोड घडवून आणण्याचे उद्योगास अवश्य लावावें. ना. मि. वाच्छा, शास्त्री प्रभृति निःशस्त्रप्रतिकाराच्या विरुद्ध असलेल्या पक्षानें अटकेंतून मिसेस बिझांट वगैरे पुढाऱ्यांना मुक्त करण्याविषयींच्या विनंतीस मि. मँटेग्यु यांनीं मान दिला नाहीं, तर हिंदुस्थानच्या लोकनायकाशीं सहकारिता ठेवण्याची मि. मँटेग्यु यांची खरी खरी इच्छा नसून केवळ त्यांच्या तोंडाला पानें पुसण्यासाठीं ते इकडे येणार आहेत अशी लोकांची खात्री होऊन त्या धोरणानें लोकांचें पापुढें तसें वर्तन राहील, असेंही स्पष्टपणें मि. मांटेग्यु यांस कळविण्यांत यावें, म्हणजे हिंदुस्थानचें लोकमत अटकेसंबंधानें किती क्षुब्ध झालें आहे याची स्टेट सेक्रेटरी साहेबांना खरी अटकळ करतां येईल व पुढें लोकांनीं त्यांच्याशीं कसें वर्तन ठेवावयाचें तें ही निश्चित करण्यास त्यांना सोपें जाईल.

## हिंदुस्थानची राज्यपद्धति.

मि. मांटेग्यु यांनीं मेसोपोटेमियन कमिशनच्या रिपोर्टावर पार्लमेंट सभेंत भाषण करतांना हिंदुस्थानच्या राज्यपद्धतीसंबंधानें जी कडक टीका केली तिच्या अर्धी कडक टीका त्यांनीं खाजगी गृहस्थाच्या नात्यानें किंवा एखाद्या वर्तमानपत्राचे संपादक म्हणून हिंदुस्थानांत राहून जर केली असती तर त्यांना मिसेस बिझांटबाई सारखें उटीसारख्या एखाद्या ठिकाणची थंड हवा खात पडावें लागलें असतें; पण आश्चर्याची गोष्ट कीं ही टीका केल्यानंतर एका आठवड्याचे आंतच हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीच्या जागीं त्यांची योजना होऊन हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचीं सगळीं सूत्रें एकदम त्यांचे हातांत आलीं! जणूं काय 'हिंदुस्थानचा राज्यकारभार हल्लींच्या प्रधानाला चांगला करतां येत नाहीं तुह्मी म्हणतां, तर तो कसा करावयाचा तें तुह्मीच दाखवा' असें म्हणून प्रधानमंडळानें त्रागा करून तो मि. मांटेग्यु यांच्या हवालीं केला असें एखाद्यास वाटेल. पण खरा प्रकार असा नाहीं. यांत त्रागाचा अर्थाअर्थी संबंध नाहीं. मांटेग्यु यांनीं सांगितलेल्या गोष्टी इतक्या सरळ व स्पष्ट होत्या कीं त्या कोणाला ही पटण्यासारख्या होत्या, व मि. मांटेग्यु यांच्या कर्तृत्वाविषयीं व सहानुभूति प्रेरित राज्यकारभार चालविण्याच्या करामतीविषयीं ब्रिटिश लोकांची—विशेषतः मुख्य प्रधान मि. लॉईड जॉर्ज यांची — इतकी खात्री आहे कीं सध्यासारख्या बिकट प्रसंगीं मि. चेंबर्लेनसारख्या परप्रत्ययनेयबुद्धि स्टेट सेक्रेटरीपेक्षां स्वतःच्या अक्कलहुशारीनें, दूर दृष्टीनें, उदारपणानें, व सहानुभूतिपूर्वक राज्यकारभार हांकूं पाहणाऱ्या मि. मांटेग्युसारख्यांचीच हिंदुस्थानाला विशेष जरूरी आहे ही गोष्ट प्रधान मंडळाला तत्काळ पटली व मि. मांटेग्यु यांची तत्काळ नेमणूक झाली. हिंदुस्थानच्या राज्यपद्धतीवर मि. मांटेग्यु यांनीं अशी टीका तरी कोणती केली होती कीं जिचा प्रधानमंडळावर इतका जलद परिणाम झाला अशी जिज्ञासा चौकस वाचकांचे ठायीं उत्पन्न होणें साहजिक आहे. तिच्या समाधानार्थ मि. मांटेग्यु यांच्या टीकेचा सारांश देणें अवश्य आहे. मि. मांटेग्यु म्हणाले कीं हिंदुस्थानची राज्यपद्धति लाकडासारखी, किंबहुना लोखंडासारखी टणक आहे, तिच्यांत मार्दव नाहीं. ती मनुष्यजातीच्या उत्पत्तीच्या काळाइतक्या जुन्या काळाला शोभणारी आहे. हल्लींच्या सुधारणायुगाला ती मुळींच योग्य नाहीं. या वाक्याचा पुढें त्यांनीं खुलासा केला तो असा- युद्धाचे पूर्वी हिंदुस्थानच्या बजेटावर पार्लमेंटांत चर्चा होई तेव्हां पार्लमेंटांतली बांकें बहुधा रिकामीं असत. चर्चा करणारांत दोन पक्ष असत. एक अधिकारीवर्गाचा व

दुसरा त्यांचेवर टीका करणारांचा. पहिल्यानें दुसऱ्याला 'राजद्रोही भाषण करणारे' असें नांव द्यावें आणि दुसऱ्यानें पहिल्याला 'जुलमी अधिकारी' अशा अर्थाचें नांव द्यावें. बजेटावरच्या चर्चेचा कांहीं एक परिणाम राज्यकारभारावर घडलेला दिसत नसे. अधिकारीवर्ग लोकांना मुळींच जबाबदार नव्हता व अजूनही नाहीं. बाकीच्या सगळ्या स्टेट-सेक्रेटरींचे पगार ब्रिटीश खजिन्यांतून दिले जातात, त्यामुळें विलायतच्या लोकांना त्यांच्या कारभाराकडे बारकाईनें पहावें लागतें. हिंदुस्थानच्या स्टेटसेक्रेटरीचा तेवढा पगार ब्रिटीश खजिन्यांतून दिला जात नाहीं. तो हिंदुस्थानावर पडतो. हिंदुस्थानासंबधानें असा पंक्तिप्रपंच कां असावा? स्टेटसेक्रेटरीच्या कौंसिलची पद्धतही सर्वांहून निराळी असल्यामुळेंच मेसोपोटेमिया प्रकरणासारखे घोटाळे उत्पन्न होतात. इंडिया ऑफिसला जोडून असलेलें स्टोअर्स खातें बंद करण्याची वेळ आली आहे. हिंदुस्थानचे व्हाइसरायला स्वतंत्रपणा असा नाहींच. स्टेट सेक्रेटरीच्या हातांतलें बाहुलें होऊन त्यांनीं रहावयाचें. यामुळें हिंदुस्थानच्या अधिकारी वर्गाचा कारभार कधीं यशस्वी होत नाहीं. लोकांचा त्यांच्या कृत्यावर ताबा राहिल्यास असा प्रकार होणार नाहीं.

मि. मांटेग्यु यांनीं सध्याच्या राज्यपद्धतींत दाखविलेले हेच दोष मिसेस बिझांट बाईनीं दाखविले आणि त्याबद्दल त्यांचेवर सरकारी अधिकाऱ्यांचा रोष झाला आहे, व त्या सरकाराविषयीं लोकांत असंतोष पसरवितात असा त्यांचेवर आरोपही करण्यांत आला आहे!

मि. मांटेग्यु यांच्यामतें हिंदुस्थानच्या सध्याच्या परिस्थितीला अत्यंत योग्य अशी राज्यपद्धति ह्मणजे अमेरिकेंतल्या सारखी संयुक्त राज्यपद्धति अथवा फेडेरल गव्हर्नमेंट ही होय. हें ध्येय एकदम साधतां यावयाचें नाहीं. हळूं हळूं व क्रमाक्रमानेंच तें साधिलें पाहिजे, पण त्याचा उपक्रम तरी आतां केलाच पाहिजे व हें आपलें ध्येय आहे हें सरकारानें आतां जाहिर केलें पाहिजे असें त्यांचें ह्मणणें आहे. हिंदुस्थानला आतां एकदम सगळे स्वराज्याचे हक्क द्या असें कांग्रेस, मुस्लिमलीग किंवा बिझांटबाई तरी कोठें ह्मणत आहेत? त्यांच्या ह्मणण्यांत व मि. मांटेग्यु यांच्या विचारांत आह्मांस तरी कोठें फरक दिसत नाहीं. मि. मांटेग्यु यांची संयुक्त राज्यपद्धतीची कल्पना ही कांहीं नवी नाहीं. सन १९०४ सालीं मुंबईच्या कांग्रेसच्या अध्यक्षपदावरून सर विल्यम वेडरबर्न यांनीं केलेल्या भाषणांत या ध्येयाची छाया प्रतिबिंबित झालेली आहे हें त्या कांग्रेसचा रिपोर्ट काढून पाहिलें असतां कोणास ही दिसून येईल.

हिंदुस्थानांतले इंग्रज अधिकारी व त्यांची पाठ थोपटणारे व सदासर्वकाळ पाठ राखणारे इंग्रज पत्रकार यांच्या विचारांत व मि. मांटेग्यु यांचे विचारांत येवढें जमीन अस्मानचें अंतर कसें पडलें हा प्रश्न सकृत् दर्शनीं मोठा गूढ वाटतो. पण त्याची गुरुकिल्ली 'सहानुभूति' या एका शब्दांत आहे हें निराळें सांगावयास नको

---

## मद्रास सरकार आणि त्यांचे सल्लागार.

मनुष्य उतरणीवरून चालू लागला असतां त्याचा पाय एकदां घसरला ह्मणजे तो एकसारखा घसरतच जातो, आणि गुळगुळीत दगड किंवा भुसभुशीत माती यांची त्याला जोरानें घसरण्यांत मदत होते. मद्रास सरकारची आज जवळ जवळ अशीच स्थिति झालेली आहे. लॉर्ड पेंटलंड यांनीं स्वराज्याच्या चळवळीविषयीं गैरसमजूत करून घेऊन आपल्या भाषणानें लोकांच्या उच्च आकांक्षावर आघात केला ही त्यांची पहिली चूक झाली; त्यानंतर विद्यार्थ्यांच्या संबंधाचे सर्क्युलर, मिसेस बेझांट प्रभृति मंडळीस केलेली अटक वगैरे चुका एका मागून एक त्यांच्या हातून घडत गेल्या. अशा वेळीं तोंडासारखें बोलणाऱ्या व त्या सरकारच्या हातून ज्यास्त चुका घडतील अशी सल्ला देणाऱ्या सल्लागारांच्या सल्ल्यामुळें त्यांच्या हातून घडणाऱ्या चुकांची यादी किती लांबेल व त्यांचा शेवटीं काय परिणाम होईल तें सांगणें कठिण आहे. हे तोंडापुरतें बोलणारे सल्लागार ह्मणजे मद्रास मेल व जस्टिस यांच्या सारखीं पत्रें होत. या सल्लागार मित्रांच्या सल्ल्याच्या गोष्टी ऐकण्यासारख्या आहेत उदाहरणार्थ, मद्रास मेल पत्र ह्मणतें कीं हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत सुधारणा करण्याचें ठरलें आहे. अशा वेळीं जे कोणी निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळींत अंग ठेवतील त्यांना सरकारी नोकरी किंवा कायदेकौंसिलांत जागा मिळणार नाहीं असें सरकारनें जाहिर करावें. जस्टिस पत्राची मजल तर याच्या ही पुढें गेली आहे. होमरूलची चळवळ मुळांतच दबून टाकण्याची हयगय मद्रास सरकारनें केली याबद्दल सरकारला दोष देऊनच हें पत्र स्वस्थ बसलें नाहीं, तर अजून या चळवळीचा समूळ उच्छेद सरकार करणार नाहीं तर खुद्द मद्राससरकारचीच सुधारणा स्टेट सेक्रेटरी साहेबांना करावी लागेल अशी धमकावणी ही या पत्रानें दिली आहे. या सल्लागारांचे कान वेळींच न उपटल्यामुळें त्यांचा धीटपणा किती वाढत गेला आहे हें पहावयाचें असेल तर मद्रास मेलनें खुद्द स्टेट सेक्रेटरी मि. मॅंटेग्यु यांना दिलेली धमकावणी पहावी. या पत्रानें ह्मटलें आहे कीं मि. मॅंटेग्यु जर हिंदुस्थानच्या लोकांना हक्क देऊन डोक्यावर चढूं देतील तर हिंदुस्थानांतला युरोपियन समाज एकजुटीनें त्यांना विरोध करील इतकेंच नाहीं, तर खुद्द स्टेट सेक्रेटरीची जागा त्यांना लाभूं देणार नाहीं. याहून सल्लागाराचा धीटपणा आगखी कोणता असणार? सर सुब्रह्मण्यम् आयर यांनीं मद्रास मेलच्या या लेखाचा सारांश तारेनें मि. मांटेग्यु यांस कळवून त्यांना सावध राहण्याविषयीं सूचना केली आहे. रिपनशाहीच्या वेळच्या इल्बर्ट बिलाची या वेळीं आठवण होते.

---

## पिंवळें संकट.

प्रस्तुतच्या युद्धापासून व्यापरवृद्धीच्या द्वारें जेवढा आर्थिक फायदा करून घेतां येईल तेवढा जपान करून घेत आहे. पण तेवढ्यानें त्याचें समाधान होऊन हिंदुस्थानचा एकेक व्यापार अजीबात बसविण्याची त्याची खटपट चालली आहे. आगपेट्यांची गोष्ट सोडून दिली तरी इतर क्षेत्रांतून शिरकाव करून घेण्याची त्याची धडपड पाहून या पिंवळ्या संकटांचें भय वाटूं लागलें आहे. हिंदुस्थानांत ऊंस पुष्कळ पिकतो व जागजागी साखरेचे कारखाने काढण्यांची सरकारची व लोकांची खटपट चालली आहे हें पाहून जपानी साखरेची पैदास वाढवून तिचा खप इकडे वाढविण्याचा जोराचा प्रयत्न जपाननें सुरूं केला आहे. कापडाच्या गिरण्या हिंदुस्थानांत किफायतीनें चालवितां येतात हें पाहून कापूस खरीदीसाठीं इकडे जागोजागी एजन्सी ठेवून त्यांच्या द्वारें इकडून कापूस नेऊन जपानांत कापड करण्याच्या गिरण्यांची संख्या वाढविण्यांत येत आहे. इकडून पूर्वीं जपनला व चीनला सूत जात असे. जपाननें स्वतः गिरण्या काढून यां सुताचा खप बराच कमी केला आहे. आतां हिंदुस्थानांत स्वस्त दराची साखर पाठवून जाव्हा, मारिशस व खुद्द हिंदुस्थान येथील साखरेचा धंदा बसवून टाकण्याचा त्याचा विचार चालला आहे. त्यासाठीं जावा बेटांत लांब मुदतीच्या ह्मणजे पाऊणशे वर्षांच्या पट्ट्यानें जमीनी मिळवून व तेथें उंसाची लागवड करून साखरेचे कारखाने काढावयाचे व ती साखर स्वतःच्या बोटींनीं हिंदुस्थानांत पाठवून जाव्हा साखरेहून इकडे स्वस्त दरानें विकावयाची असा त्याचा बेत आहे. गेल्या दोन वर्षांत जाव्हा व मॉरिशस येथून येणाऱ्या साखरेची आयात कमी होऊन जपानची वाढली आहे. आतां जाव्हा बेटांत जपानी लोकांना जमीनी देण्याची चूक डच सरकारानें केल्यास हें पिंवळें संकट डच व हिंदुस्थान यांच्या साखरेच्या कारखान्यांना दहावीस वर्षांत खाऊन टाकल्यावांचून राहणार नाहीं.

---

## होमरूल आणि सामाजिक जुलूम.

होमरूलच्या चळवळी विरुद्ध आंग्लोइंडियन पत्रकर्ते व आमच्यांतले ही कित्येक दीड शहाणे असा आक्षेप नेहमी घेत असतात कीं ही चळवळ यशस्वी होऊन हिंदुस्थानच्या लोकांना ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्याचे हक्क मिळाले तर मोठा अनर्थ प्राप्त होईल. कावेबाज ब्राह्मण सगळी सत्ता बळकावून बसतील, आणि अस्पृश्य किंवा मागासलेल्या जातीवर जुलूम करतील हा आक्षेप घेणारे एक गोष्ट मुद्दाम छपवून ठेवतात व त्यामुळें हा त्यांचा आक्षेप सकृत्दर्शनीं हेत्वाभास उत्पन्न करतो. ती गोष्ट ह्मणजे ही कीं हिंदुस्थानांत सुशिक्षित व ह्मणून अधिकार भोगण्यास पात्र अशी एक ब्राह्मणांचीच जात आहे असें नाहीं. मुसलमान, पारशी, जैन, ख्रिस्ती, शीख वगैरे इतर जातींतही ब्राह्मणाच्या इतकेच सुशिक्षित, व कर्तृत्ववान् पुढारी आहेत. या सर्वांची बेरीज केली तर ती सुशिक्षित ब्राह्मणपुढाऱ्यांच्या संख्येहून खात्रीनें मोठी भरेल, आणि हे इतके ब्राह्मणेतर पुढारी ब्राह्मणांनीं चालविलेला जुलूम स्वस्थपणें पाहत बसतील ही गोष्ट शक्य नाहीं. दुसरी गोष्ट स्वराज्याचे हक्क मिळाले ह्मणजे ब्रिटिशांची सत्ता अजीबात उडाली असें मुळींच नाहीं. ब्रिटिशांच्या साम्राज्यांतर्गत स्वराज्यांत जेथें जुलूम चाललेला दिसेल तेथें हात घालून तो नाहींसा करण्याचा अधिकार सार्वभौम ब्रिटिश सरकारला राहीलच. तिसरी गोष्ट अशी कीं जुलूम करण्याची बुद्धि होणें हा कांहीं ब्राह्मणांचा विशेष गुण नाहीं. ब्राह्मण असला कीं तो जुलमी असलाच पाहिजे असें निश्चयात्मक दाखवितां येत असेल तर आह्मी असें ही ह्मणण्यास तयार आहों कीं पाहिजे तर स्वराज्याच्या हक्कांतून ब्राह्मण जातीला वगळा, पण बाकीच्या जातीला तरी तो हक्क मिळूं द्या. प्राचीन काळीं ब्राह्मण अधिकाराच्या बाबतींत व द्रव्यसंबंधानें जसे निरिच्छ होते तसे आतां ही निरिच्छ राहण्याइतके उदार मनाचे ब्राह्मण पुढारी आजच्या काळीं ही आहेत. सारांश, ब्राह्मणांच्या हातून जुलूम घडेल अशी भीति न राहूं देतां नवी राज्यव्यवस्था खुशाल करा, पण स्वराज्याचे हक्क मिळवा येवढेंच आमचें ब्राह्मणेतर बंधूंस सांगणें आहे.

---

## आत्मघातकी सूचना.

इंग्रजी भाषेच्या शिक्षणाचा प्रश्न सिमल्याच्या कान्फरन्सपुढें निघाला असतां बंगालच्या एका दीड शहाण्या रायबहादुरानें अशी सूचना केली कीं प्रत्येक हायस्कुलावर युरोपियन हेड मास्तर नेमल्याखेरीज हायस्कुलांतल्या विद्यार्थ्यांचें इंग्रजी शिक्षण सुधारणार नाहीं. याहून अधिक मूर्खपणाची व आत्मघातकी सूचना आणखी कोणती असेल असें आह्मांस वाटत नाहीं. प्रत्येक हिंदी गृहस्थाला स्वतःची मातृभाषा जशी उत्तम प्रकारें येते किंवा शिकवितां येईल असें नाहीं, तसेंच इंग्रज ह्मटला ह्मणजे तो इंग्रजी भाषेचा उत्तम शिक्षक असेलच असें ह्मणतां येत नाहीं. याच्या उलटच प्रकार बहुधा आढळतो. पुष्कळ बंगाली, मद्रासी व पारशी वगैरे हिंदी गृहस्थ इंग्रजांपेक्षां ही इंग्रजी भाषा अधिक उत्तम प्रकारें बोलतात व लिहितात ही रोजच्या अनुभवांतली गोष्ट आहे. सध्याच्या काळीं लढाईत पुष्कळ चांगले लोक मारले गेल्यामुळें व खुद्द विलायतेंत चांगल्या शिक्षकांची वाण पडल्यामुळें चांगल्याप्रतीचे शिक्षक हिंदुस्थानच्या वाट्याला क्वचितच येणार. अशा स्थितींत केवळ गोरें कातडें पाहून त्याला इंग्रजी भाषेचे शिक्षक नेमल्यानें त्या भाषेचें आमच्या विद्यार्थ्यांचें ज्ञान वाढेल ही कल्पनाच मुळीं चुकीची आहे. रद्दी इंग्रज इकडे लठ्ठ पगार खातील आणि आमच्या विद्यार्थ्यांचा मात्र कांहीं एक फायदा होणार नाहीं यापेक्षां आमच्यांतल्याच तरतरीत विद्वानांना विलायतेस दोन तीन वर्षें ठेवून तिकडून इंग्रजी भाषेंत प्रवीण करून आणिल्यास कमी पगारावर लायक माणसें मिळवून कार्यभाग अधिक चांगला होईल अशी आमची समजूत आहे.

---

## महायुद्धाची प्रगति.

रशियाची अंतःस्थिति व बाह्य संकटें दोन्हीं मित्रराष्ट्रांना चिंता उत्पन्न करणारी आहेत. माजी रशियन जनरल सुकोमिनाफ यानें आपल्या सरकारशीं दगलबाजी के-

आरोपावरून त्याची न्यायमंदिरांत जी चौकशी चालली आहे तींत विलक्षण स्वरूपाच्या गोष्टी बाहेर पडत आहेत. आरोपीनें दारूगोळा तयार करण्याचे कामांत मुद्दाम दिरंगाई केली व त्यामुळें ग्यालीशियामध्यें रशियाची निष्कारण प्राणहानि झाली असें बाहेर आलें आहे. आणखी ही बऱ्याच गोष्टी बाहेर येतील हें संभवनीय दिसतें. मॉस्को येथें कान्फरन्स भरली होती त्याच वेळीं राज्यक्रांतीच्या विरुद्ध चाललेला कट एकाएकी उघडकीला आला व या कटांत बरेच प्रमुख राजकारणी गृहस्थ व अंमलदार यांचें अंग होतें असें कळलें आहे. यांतले कांहीं कैद करण्यांत आले आहेत, पण सध्याच्या स्थितींत त्यांचीं नांवें प्रसिद्ध करणें रशियन सरकारला योग्य दिसत नाहीं. रशियांतल्या इंजिनड्रायव्हरांनीं संप केला होता, पण अधिकाऱ्यांशीं बोलणें चालू असल्यामुळें तूर्त तो त्यांनीं बंद ठेविला आहे. या व इतर गोष्टींवरून रशियाची अंतःस्थिति कशी आहे त्याची कल्पना करतां येते.

## रिगा सोडलें!

रिगाच्या बाजूला जर्मनांचें दडपण फारच पडल्यामुळें अखेर रशियन लोकांनीं रिगा सोडल्याची खबर आली आहे. आज कित्येक दिवसांपासून पेट्रोग्राडवर जर्मन लोकांचा डोळा आहे व तिकडे जाण्यासाठीं रिगाच्या आखाताच्या किनाऱ्यावर जर्मन सैन्य जमा होऊन रशियाला दडपीत नेण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू होता. शेवटीं त्या शहराचें रक्षण करणें अशक्य होऊन रशियन लोक तेथून मागें सरले. जर्मन लोक द्वीना नदी उतरून जागेल नदीपर्यंत जाऊन पोंचले आहेत. आज इतके दिवस तरी जर्मन लोक कां थांबले हा एक गूढ प्रश्न आहे. रशियाच्या राज्यक्रांतीनंतर त्याच्या सैन्यांतली शिस्त बिघडून रशियन शिपाई स्वतःच एकेक पाऊल मागें येऊं लागले होते. त्याचा फायदा जर्मन लोकांनीं घेतला. पण स्वतःच्या दमावर त्यांनीं इतके दिवस पुढें पाऊल कसें टाकिलें नाहीं हा विचार करण्यासारखी गोष्ट आहे. याचें उत्तर असें देतां येतें कीं आस्ट्रियाला मदत करण्याची जर्मनीला अधिक अवश्यकता वाटली. रशियाला ग्यालिशिया व बुकोव्हिनामधून प्रथम घालवून देणें अवश्य होतें. त्या शिवाय रूमानियाची चळवळ बंद पडली नसती. शिवाय दुसरें कारण असें होतें कीं व्हर्डुनपाशीं जर्मनीनें फ्रेंचाकडून व आस्ट्रियानें जनरल काडोर्नो यांचे हातून मार खाल्ला होता; ब्रिटिश सैन्य एकामागून एक विजय संपादीत होतें व यामुळें खुद्द जर्मनीच्या लोकमतांत चलबिचल झाली होती. आणी सबमरीनच्या द्वारें इंग्लंडला जेरीस आणूं अशी जर्मनीनें केलेली प्रतिज्ञा निष्फळ झाली होती. अशा वेळीं जर्मन लोकांच्या तोंडावर विजयाची फुशारकी मारण्यासाठीं कांहीं तरी विजयाचा संभव राखून ठेवणें भाग होते. तो संभव रिगाच्या बाजूला जर्मनीला दिसत होता म्हणून तो इतके दिवस शिल्केंत ठेविला होता. तो यावेळीं जर्मनीच्या उपयोगीं पडल्यामुळें त्याची अब्रू राहिली.

## इटलीची कामगिरी.

ग्यालिशिया व बुकोव्हिना सोडून रशियन लोक निघून गेल्यामुळें जनरल मॅकेनसन यांना विशेष जोर आलेला दिसतो. पण रूमानिया व इटली त्यांना या सोन्याच्या संधीचा फायदा सुखानें घेऊं देत नाहींत हें गेल्या पंधरवाड्यांत घडलेल्या अनेक घटनांवरून चांगलें व्यक्त झालें आहे. जर्मनीचें पाऊल पुढें पडलें आहे हें निर्विवाद आहे, पण त्यासाठीं त्याला जें रक्त खर्ची घालावें लागलें आहे तें पाहिलें तर हा विजय नको आणि तज्जन्य लोकक्षय ही नको असेंच जर्मन लोक म्हणत असतील. ही येवढी जर्मन प्राणहानि होण्याला मुख्य कारण इटली आहे ही गोष्ट दृष्टीआड करतां येत नाहीं. इटालियन लोकांच्या भीतीमुळें तिकडे जर्मनीला आपलें मोठें सैन्य ठेवावें लागलें आहे, व हें सैन्य जितकें मोठें असेल तितकी प्राणहानि ही मोठी, असा प्रकार सध्या चालला आहे. पण असें किती दिवस चालणार ?

## पश्चिम रणक्षेत्र.

गेल्या आठवड्यांत पश्चिम रणक्षेत्रावरील हवेनें मान बिघडलें असल्यामुळें लढाईला विशेषसा रंग आला नव्हता. तथापि ज्या थोड्याशा चकमकी झाल्या त्यांत ब्रिटिशच यशस्वी झाले. लान्सच्या नैर्ऋत्येला त्यांनीं एके ठिकाणीं शत्रु चाल करून आला असतां त्याला पिटाळून लाविलें. यिप्रेसपाशीं तोफखान्यांचा गडगडाट चालला आहे याशिवाय दुसरी कांहीं म्हणण्यासारखी गोष्ट मार्शल हेग यांच्या रिपोर्टांत दिसत नाहीं. पण जनरल मॉरिस हे वेळोवेळीं एकंदर लष्करी स्थितीचा आढावा प्रसिद्ध करीत असतात तो पाहिला तर असें दिसतें कीं जर्मन लोकांचें मनुष्यबळ थकत चाललें आहे. गेल्या जुलैपासून आतां पर्यंत इंग्रजांनीं रणभूमीवर जेवढें सैन्य आणिलें त्याच्या दुप्पट सैन्य जर्मनीला आणावें लागलें व युद्धांत प्राणहानि ही त्याच प्रमाणांत झाली. यावरून जर्मनीला लागलेला क्षयरोग कसा झपाट्यानें वाढत चालला आहे तें दिसून येईल.

## बाल्कन रणक्षेत्र.

याचें अलीकडे नांव ही ऐकूं येत नाहीं. पण त्यावरून तिकडे शांतता आहे असें मात्र समजूं नये. सर्बियन लोक स्वस्थ बसलेले नाहींत बलगेरियाचे कित्येक हल्ले त्यांनीं परतविले आहेत; आणि ग्रीक सरकारांत मॉ. वेनेझुलेस हे गेल्यापासून तें शुद्धीवर येऊन स्वातंत्र्याप्रीत्यर्थ चाललेल्या प्रस्तुतच्या युद्धांत मित्रराष्ट्रांना शक्य तेवढें साह्य करण्याचा ठराव त्या सरकारानें केला आहे. त्याचप्रमाणें सर्वियाशीं सख्य ठेवण्यास ही त्यानें स्वतःस करारबद्ध करून घेतलें आहे. ग्रीसचीं राज्यसूत्रें वेनेझुलेसच्या हातीं आहेत तोंपर्यंत हा करार अक्षरशः पाळला जाईल अशी मित्रराष्ट्रांची पूर्ण खात्री असल्यामुळें ग्रीसच्या साह्याच्या भरंवशावर तें रणक्षेत्र निर्भय आहे असें मानण्यास हरकत नाहीं.

## इतर बातम्या.

अमेरिकेच्या प्रेसिडेंटांनीं पोपच्या तहासंबंधाच्या खलित्यास पाठविलेल्या उत्तरानें जर्मनींत वरीच आग लावून सोडली आहे. तेथील लोक लोकसत्तेची वाढ करा अशी मागणी जोरानें करूं लागले आहेत.

१९१८ सालीं अमेरिकेकडून प्रचंड सैन्य फ्रान्सच्या रणभूमीवर उतरणार आहे. त्याची तजवीज आतांपासून सुरू झाली आहे. अमेरिकन वैमानिकांची एक जंगी क्यांप तयार व्हावयाची असून या ठिकाणीं १०००० नवशिक्या वैमानिकांची सोय करण्यांत येईल. ही क्यांप कित्येक चौरस मैल जागा व्यापणार असून ती तयार करण्यासाठीं फ्रेंच सरकारजवळून हजारों जर्मन कैदी मागून घेण्यांत येतील. अमेरिकन लोक आतांपासून फ्रेंच भाषेचा अभ्यास करूं लागले आहेत.

म्हैसूर सरकारचे जनरल सेक्रेटरी मि. नरसिंगराव यांना नाभा संस्थानची दिवाणगिरी मिळाली व तिकडे ते रवाना झाले.

मध्यप्रांताच्या सरकारानें तुपाच्या भेसळीसंबंधानें निर्बंध घालणारें बिल कौंसिलापुढें आणण्याची परवानगी हिंदुस्थान सरकाराकडे मागितली आहे.

मि. मॉंटेग्यु नोवेंबर महिन्यांत हिंदुस्थानांत येणार असल्या कारणानें सत्याग्रहाची चळवळ लांबणीवर टाकण्यांत यावी असा ठराव मुंबईच्या कांग्रेस कमिटीनें मंजूर केला. रा. टिळक यांनीं ही या ठरावाला मान्यता दिली असें कळतें.

अलवर ( राजपुताना ) येथें झालेल्या शाळेच्या बक्षीस समारंभाचे प्रसंगीं भाषण करतांना तेथील महाराजांनीं होमरूल व सेल्फ गव्हर्नमेंट यांच्या संबंधाच्या प्रश्नांचा उल्लेख करून या महत्वाकांक्षा नुसत्या मनांत वागवून स्वस्थ बसूं नका, तर तुम्ही वयांत येऊन नागरिकत्वाचीं कर्तव्यें करूं लागाल तेव्हां तीं आपणांस चांगल्या प्रकारें करतां येऊन वरील ध्येय साध्य करून घेतां येईल अशी तयारी आतांपासून करूं लागा असा तरुण विद्यार्थ्यांना उपदेश केला.

हिंदुस्थानांतून बाहेर देशीं चांदी पाठविण्याविषयीं हिंदुस्थान सरकारकडून मनाई हुकुम करण्यांत आला आहे.

**शेवटचा अंकुर**—शेवटचे बाजीराव पेशवे ब्रह्मवर्तास गेल्या नंतर झालेली कन्या श्री. गं. भा. बयाबाई साहेब आपटे यांस काशी येथें अलीकडे देवाज्ञा झाली म्हणून व त्यांच्या बरोबर पेशव्यांचा शेवटचा अंकुर नष्ट झाला म्हणून संदेशकर्त्यांनीं एका अंकांत कविदृष्टीनें या मृत्यूचा विचार केलेला आहे व महाराष्ट्रीय म्हणवून घेण्यांत किती तरी अभिमान वाटला पाहिजे याची चांगली आठवण दिलेली आहे.

## ✓ वैचित्र्य.

वैचित्र्यांत काय स्वारस्य आहे व त्याचा शिक्षणद्वारां मुलांना किती तरी लाभ होत असतो याची कल्पना अलिकडच्या विद्याखात्यांतून नष्ट होत चालली आहे असें दिसतें. यंत्रांतून जसे ठोकळे एका साच्याचे निघतात तसे विद्यार्थी पुस्तकांच्या साच्यांतून काढावयाचे; इतकेंच नाहीं तर त्यांचा बाह्य पोशाखही एकसारखा असला पाहिजे अशी कांहीं प्रांतिक शाळांतून योजना चालू आहे. संयुक्त प्रांतांतील मैनपुरी येथील मिशनरी हायस्कुलाचे मुख्य अध्यापक राजश्री मिचल यांनीं तर असा हुकूम काढला कीं विद्यार्थ्यांनीं कपाळावर गंधाचा टिळकही लावूं नये. हा प्रकार कागदोपत्रीं हास्यास्पद वाटतो; पण आम्हाला कधीं कधीं असेंही अधिकारी भेटतात कीं त्यांना गंध लावणें म्हणजे साहेबांच्या नाखुशींत उतरण्याचा अपराध होय असें वाटतें. सभाबंदीच्या सार्कीकरानें विद्यार्थ्यांचीं मनें इतकीं बिथरलेलीं दिसतात कीं त्यांच्या मानसिक वैचित्र्यामुळें त्यांच्या कृतीमध्यें प्रस्तुतची राजकीय स्थिती फार विलक्षण रितीनें प्रतिबिंबित झालेली आहे आणि अशा वेळीं त्यांना त्यांच्या चंचल व कोमल स्थितींत वडीलधान्या मंडळीचें वचनामृत पिण्यास मिळणार नाहीं तर सरकारी सर्क्युलरामुळें अनर्थीचें वैचित्र्य मात्र दृष्टीस पडेल.

## आकोला हायस्कूल आणि विद्यार्थ्यांची नीति.

✓हल्लीं हिंदुस्थान देशांतील सुशिक्षित लोकांचे शील पाश्चात्य देशांतील सुशिक्षितांच्या शीलाच्या बरोबरीचें नाहीं व हिंदी विश्वविद्यालयांतून बाहेर पडलेले पदवीधर अर्धकचे असतात अशा तऱ्हेचे आक्षेप आपल्या विद्यार्थ्यांवर उच्च अधिकाऱ्याकडून घेण्यांत येत असतात. ह्या आक्षेपांत तथ्य कितपत आहे ह्याचा विचार करण्याचें तूर्त सोडून देऊन वरील आक्षेप सत्य आहेत असें गृहीत धरून त्यांस जागा राहूं नये एतदर्थ आपल्या विद्याधिकाऱ्याकडून कोणते व कसे प्रयत्न केले जात आहेत इकडे बारकाईनें पहाणें जरूर आहे. ✓आपल्या देशांत हल्लींच्या स्थितींत सर्वच गोष्टी सरकारच्या हातांत पूर्णपणें असल्यामुळें पालकांना आपल्या मुलांवर व त्यांच्या वर्तनावर नजर ठेवण्यास व त्यांस योग्य वळण लावण्यास क्वचितच अवसर सांपडतो. मुलांस योग्य वळण लावण्याचे विद्याधिकाऱ्यांना पसंत पडणारे मार्ग व पालकांना इष्ट वाटणारे मार्ग हे दुर्दैवानें सारख्या स्वरूपाचे नाहींत देशांतील विचारी व विद्वान् पुढाऱ्यांनीं अत्यंत परिश्रमानें अनुभवानें व विचारानें ठरविलेल्या देशोन्नतीच्या मार्गाचें ज्ञान मुलांचे कोमल अंतःकरणावर ठसवून त्यांना निराश साहसी व आततायी होण्याची संधीही देऊं नये असें एकपक्षी वाटतें तर वडील पिढीच्या न्याय्य व योग्य आकांक्षाचें वारेंही नवीन पिढीस लागूं नये असा परिणाम होणारे हुकूम नानाप्रकारच्या सबबीवर विद्याधिकाऱ्याकडून सोडण्यांत येतात. ते कसेही असो. जेथें सरकार व लोकपक्ष ह्यांत मतभेद असेल तेथें सरकारच्याच मताप्रमाणें गोष्टी होणें अपरिहार्य आहे, परंतु सरकार व लोकपक्ष ह्यांचें एकमत पाहून मुलांस योग्य वळण लावण्याचे मार्ग अमलांत आणणें फार जरूरीचें आहे.

येथील सरकारी हायस्कुलांतील कांहीं

दुसरा त्यांचेवर टीका करणारांचा. पहिल्यानें दुसऱ्याला 'राजद्रोही भाषण करणारे' असें नांव द्यावें आणि दुसऱ्यानें पहिल्याला 'जुलूमी अधिकारी' अशा अर्थाचें नांव द्यावें. कनेटावरच्या चर्चेचा कांहीं एक परिणाम राज्यकारभारावर घडलेला दिसत नसे. अधिकारीवर्ग लोकांना मुळींच जबाबदार नव्हता व अजूनही नाहीं. बाकीच्या सगळ्या स्टेटसेक्रेटरींचे पगार ब्रिटीश खजिन्यांतून दिले जातात, त्यामुळें विलायतच्या लोकांना त्यांच्या कारभाराकडे बारकाईनें पाहावें लागतें. हिंदुस्थानच्या स्टेटसेक्रेटरीचा तेवढा पगार ब्रिटीश खजिन्यांतून दिला जात नाहीं. तो हिंदुस्थानावर पडतो. हिंदुस्थानासंबधानें असा पंक्तिप्रपंच कां असावा? स्टेटसेक्रेटरीच्या कौंसिलाची पद्धतही सर्वांहून निराळी असल्यामुळेंच मेसोपोटेमिया प्रकरणासारखे घोटाळे उत्पन्न होतात. इंडिया ऑफिसला जोडून असलेलें स्टोअर्स खातें बंद करण्याची वेळ आली आहे. हिंदुस्थानचे व्हाइसरायला स्वतंत्रपणा असा नाहींच. स्टेट सेक्रेटरीच्या हातांतलें बाहुलें होऊन त्यांनीं राहावयाचें. यामुळें हिंदुस्थानच्या अधिकारी वर्गाचा कारभार कधीं यशस्वी होत नाहीं. लोकांचा त्यांच्या कृत्यावर ताबा राहिल्यास असा प्रकार होणार नाहीं.

मि. मांटेग्यु यांनीं सध्याच्या राज्यपद्धतींत दाखविलेले हेच दोष मिसेस बिझांट बाईंनीं दाखविले आणि त्याबद्दल त्यांचेवर सरकारी अधिकाऱ्यांचा रोष झाला आहे, व त्या सरकाराविषयीं लोकांत असंतोष पसरवितात असा त्यांचेवर आरोपही करण्यांत आला आहे!

मि. मांटेग्यु यांच्यामतें हिंदुस्थानच्या सध्याच्या परिस्थितीला अत्यंत योग्य अशी राज्यपद्धति ह्मणजे अमेरिकेंतल्या सारखी संयुक्त राज्यपद्धति अथवा फेडेरल गव्हर्नमेंट ही होय. हें ध्येय एकदम साधतां यावयाचें नाहीं. हळूं हळूं व क्रमाक्रमानेंच तें साधिलें पाहिजे, पण त्याचा उपक्रम तरी आतां केलाच पाहिजे व हें आपलें ध्येय आहे हें सरकारानें आतां जाहिर केलें पाहिजे असें त्यांचें ह्मणणें आहे. हिंदुस्थानला आतां एकदम सगळे स्वराज्याचे हक्क द्या असें कांग्रेस, मुस्लीमलीग किंवा बिझांटबाई तरी कोठें ह्मणत आहेत? त्यांच्या ह्मणण्यांत व मि. मांटेग्यु यांच्या विचारांत आह्मांस तरी कोठें फरक दिसत नाहीं. मि. मांटेग्यु यांची संयुक्त राज्यपद्धतीची कल्पना ही कांहीं नवी नाहीं. सन १९०४ सालीं मुंबईच्या कांग्रेसच्या अध्यक्षपदावरून सर विल्यम वेडरबर्न यांनीं केलेल्या भाषणांत या ध्येयाची छाया प्रतिबिंबित झालेली आहे हें त्या कांग्रेसचा रिपोर्ट काढून पाहिलें असतां कोणास ही दिसून येईल.

हिंदुस्थानांतले इंग्रज अधिकारी व त्यांची पाठ थोपटणारे व सदासर्वकाळ पाठ राखणारे इंग्रज पत्रकार यांच्या विचारांत व मि. मांटेग्यु यांचे विचारांत येवढें जमीन अस्मानचें अंतर कसें पडलें हा प्रश्न सकृत् दर्शनीं मोठा गूढ वाटतो. पण त्याची गुरुकिल्ली 'सहानुभूति' या एका शब्दांत आहे हें निराळें सांगावयास नको

---

## मद्रास सरकार आणि त्यांचे सल्लागार.

मनुष्य उतरणीवरून चालू लागला असतां त्याचा पाय एकदां घसरला ह्मणजे तो एकसारखा घसरतच जातो, आणि गुळगुळीत दगड किंवा भुसभुशीत माती यांची त्याला जोरानें घसरण्यांत मदत होते. मद्रास सरकारची आज जवळ जवळ अशीच स्थिति झालेली आहे. लॉर्ड पेंटलंड यांनीं स्वराज्याच्या चळवळीविषयीं गैरसमजूत करून घेऊन आपल्या भाषणानें लोकांच्या उच्च आकांक्षावर आघात केला ही त्यांची पहिली चूक झाली; त्यानंतर विद्यार्थ्यांच्या संबधांचें सक्युर्लर, मिसेस बेझांट प्रभृति मंडळीस केलेली अटक वगैरे चुका एका मागून एक त्यांच्या हातून घडत गेल्या. अशा वेळीं तोंडासारखें बोलणाऱ्या व त्या सरकारच्या हातून ज्यास्त चुका घडतील अशी सल्ला देणाऱ्या सल्लागारांच्या सल्लयामुळें त्यांच्या हातून घडणाऱ्या चुकांची यादी किती लांबेल व त्यांचा शेवटीं काय परिणाम होईल तें सांगणें कठीण आहे. हे तोंडापुरतें बोलणारे सल्लागार ह्मणजे मद्रास मेल व जस्टिस यांच्या सारखीं पत्रें होत. या सल्लगार मित्रांच्या सल्लयाच्या गोष्टी ऐकण्यासारख्या आहेत उदाहरणार्थ, मद्रास मेल पत्र ह्मणतें कीं हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत सुधारणा करण्याचें ठरलें आहे. अशा वेळीं जे कोणी निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळींत अंग ठेवतील त्यांना सरकारी नौकरी किंवा कायदेकौंसिलांत जागा मिळणार नाहीं असें सरकारनें जाहिर करावें. जस्टिस पत्राची मजल तर याच्या ही पुढें गेली आहे. होमरूलची चळवळ मुळांतच दबून टाकण्याची हयगय मद्रास सरकारनें केली याबद्दल सरकारला दोष देऊनच हें पत्र स्वस्थ बसलें नाहीं, तर अजून या चळवळीचा समूळ उच्छेद सरकार करणार नाहीं तर खुद्द मद्रासकारचीच सुधारणा स्टेट सेक्रेटरी साहेबांना करावी लागेल अशी धमकावणी ही या पत्रानें दिली आहे. या सल्लगारांचे कान वेळींच न उपटल्यामुळें त्यांचा धीटपणा किती वाढत गेला आहे हें पाहावयाचें असेल तर मद्रास मेलनें खुद्द स्टेट सेक्रेटरी मि. मॅंटेग्यु यांना दिलेली धमकावणी पहावी. या पत्रानें ह्मटलें आहे कीं मि. मॅंटेग्यु जर हिंदुस्थानच्या लोकांना हक्क देऊन डोक्यावर चढूं देतील तर हिंदुस्थानांतला युरोपियन समाज एकजुटीनें त्यांना विरोध करील इतकेंच नाहीं, तर खुद्द स्टेट सेक्रेटरीची जागा त्यांना लाभूं देणार नाहीं. याहून सल्लागाराचा धीटपणा आणखी कोणता असणार? सर सुब्रह्मण्यम् आयर यांनीं मद्रास मेलच्या या लेखाचा सारांश तारेनें मि. मांटेग्यु यांस कळवून त्यांना सावध राहण्याविषयीं सूचना केली आहे. रिपन शाहीच्या वेळच्या इल्बर्ट बिलाची या वेळीं आठवण होते.

---

## पिंवळें संकट.

प्रस्तुतच्या युद्धापासून व्यापरवृद्धीच्या द्वारें जेवढा आर्थिक फायदा करून घेतां येईल तेवढा जपान करून घेत आहे. पण तेवढ्यानें त्याचें समाधान होऊन हिंदुस्थानचा एकेक व्यापार अजीबात बसविण्याची त्याची खटपट चालली आहे. आगपेट्यांची गोष्ट सोडून दिली तरी इतर क्षेत्रांतून शिरकाव करून घेण्याची त्याची धडपड पाहून या पिंवळ्या संकटाचें भय वाटूं लागलें आहे. हिंदुस्थानांत ऊंस पुष्कळ पिकतो व जागजागी साखरेचे कारखाने काढण्यांची सरकारची व लोकांची खटपट चालली आहे हें पाहून जपानी साखरेची पैदास वाढवून तिचा खप इकडे वाढविण्याचा जोराचा प्रयत्न जपाननें सुरूं केला आहे. कापडाच्या गिरण्या हिंदुस्थानांत किफायतीनें चालवितां येतात हें पाहून कापूस खरेदीसाठीं इकडे जागोजागी एजन्सी ठेवून त्यांच्या द्वारें इकडून कापूस नेऊन जपानांत कापड करण्याच्या गिरण्यांची संख्या वाढविण्यांत येत आहे. इकडून पूर्वीं जपानला व चीनला सूत जात असे. जपाननें स्वतः गिरण्या काढून यां सुताचा खप बराच कमी केला आहे. आतां हिंदुस्थानांत स्वस्त दराची साखर पाठवून जाव्हा, मारिशस व खुद्द हिंदुस्थान येथील साखरेचा धंदा बसवून टाकण्याचा त्याचा विचार चालला आहे. त्यासाठीं जावा बेटांत लांब मुदतीच्या ह्मणजे पाऊणशे वर्षांच्या पट्ट्यानें जमीनी मिळवून व तेथें उंसाची लागवड करून साखरेचे कारखाने काढावयाचे व ती साखर स्वतःच्या बोटींनीं हिंदुस्थानांत पाठवून जाव्हा साखरेहून इकडे स्वस्त दरानें विकावयाची असा त्याचा बेत आहे. गेल्या दोन वर्षांत जाव्हा व मॉरिशस येथून येणाऱ्या साखरेची आयात कमी होऊन जपानची वाढली आहे. आतां जाव्हा बेटांत जपानी लोकांना जमीनी देण्याची चूक डच सरकारानें केल्यास हें पिंवळें संकट डच व हिंदुस्थान यांच्या साखरेच्या कारखान्यांना दहावीस वर्षांत खाऊन टाकल्यावांचून राहणार नाहीं.

---

## होमरूल आणि सामाजिक जुलूम.

होमरूलच्या चळवळी विरुद्ध आंग्लोइंडियन पत्रकर्ते व आमच्यांतले ही कित्येक दीड शहाणे असा आक्षेप नेहमी घेत असतात कीं ही चळवळ यशस्वी होऊन हिंदुस्थानच्या लोकांना ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्याचे हक्क मिळाले तर मोठा अनर्थ प्राप्त होईल. कावेबाज ब्राह्मण सगळी सत्ता बळकावून बसतील, आणि अस्पृश्य किंवा मागासलेल्या जातीवर जुलूम करतील हा आक्षेप घेणारे एक गोष्ट मुद्दाम छपवून ठेवतात व त्यामुळें हा त्यांचा आक्षेप संकृत्दर्शनीं हेत्वाभास उत्पन्न करतो. ती गोष्ट ह्मणजे ही कीं हिंदुस्थानांत सुशिक्षित व ह्मणून अधिकार भोगण्यास पात्र अशी एक ब्राह्मणांचीच जात आहे असें नाहीं. मुसलमान, पारशी, जैन, ख्रिस्ती, शीख वगैरे इतर जातींतही ब्राह्मणाच्या इतकेंच सुशिक्षित, व कर्तृत्ववान् पुढारी आहेत. या सर्वांची बेरीज केली तर ती सुशिक्षित ब्राह्मणपुढाऱ्यांच्या संख्येहून खात्रीनें मोठी भरेल, आणि हे इतके ब्राह्मणेतर पुढारी ब्राह्मणांनीं चालविलेला जुलूम स्वस्थपणें पाहत बसतील ही गोष्ट शक्य नाहीं. दुसरी गोष्ट स्वराज्याचे हक्क मिळाले ह्मणजे ब्रिटिशांची सत्ता अजीबात उडाली असें मुळींच नाहीं. ब्रिटिशं साम्राज्यांतर्गत स्वराज्यांत जेथें जुलूम चाललेला दिसेल तेथें हात घालून तो नाहींसा करण्याचा अधिकार सार्वभौम ब्रिटिश सरकारला राहीलच. तिसरी गोष्ट अशी कीं जुलूम करण्याची बुद्धि होणें हा कांहीं ब्राह्मणांचा विशेष गुण नाहीं. ब्राह्मण असला कीं तो जुलमी असलाच पाहिजे असें निश्चयात्मक दाखवितां येत असेल तर आह्मी असें ही ह्मणण्यास तयार आहों कीं पाहिजे तर स्वराज्याच्या हक्कांतून ब्राह्मण जातीला वगळा, पण बाकीच्या जातीला तरी तो हक्क मिळूं द्या. प्राचीन काळीं ब्राह्मण अधिकाराच्या बाबतींत व द्रव्यसंबंधानें जसे निरिच्छ होते तसे आतां ही निरिच्छ राहण्याइतके उदार मनाचे ब्राह्मण पुढारी आजच्या काळीं ही आहेत. सारांश, ब्राह्मणांच्या हातून जुलूम घडेल अशी भीती न राहूं देतां नवी राज्यव्यवस्था खुशाल करा, पण स्वराज्याचे हक्क मिळवा येवढेंच आमचें ब्राह्मणेतर बंधूंस सांगणें आहे.

---

## आत्मघातकी सूचना.

इंग्रजी भाषेच्या शिक्षणाचा प्रश्न सिमल्याच्या कान्फरन्सपुढें निघाला असतां बंगालच्या एका दीड शहाण्या रायबहादुरानें अशी सूचना केली कीं प्रत्येक हायस्कुलावर युरोपियन हेड मास्तर नेमल्याखेरीज हायस्कुलांतल्या विद्यार्थ्यांचें इंग्रजी शिक्षण सुधारणार नाहीं. याहून अधिक मूर्खपणाची व आत्मघातकी सूचना आणखी कोणती असेल असें आह्मांस वाटत नाहीं. प्रत्येक हिंदी गृहस्थाला स्वतःची मातृभाषा जशी उत्तम प्रकारें येते किंवा शिकवितां येईल असें नाहीं, तसेंच इंग्रज ह्मटला ह्मणजे तो इंग्रजी भाषेचा उत्तम शिक्षक असेलच असें ह्मणतां येत नाहीं. याच्या उलटच प्रकार बहुधा आढळतो. पुष्कळ बंगाली, मद्रासी व पारशी वगैरे हिंदी गृहस्थ इंग्रजांपेक्षां ही इंग्रजी भाषा अधिक उत्तम प्रकारें बोलतात व लिहितात ही रोजच्या अनुभवांतली गोष्ट आहे. सध्याच्या काळीं लढाईत पुष्कळ चांगले लोक मारले गेल्यामुळें व खुद्द विलायतेंत चांगल्या शिक्षकांची वाण पडल्यामुळें चांगल्याप्रतीचे शिक्षक हिंदुस्थानच्या वाट्याला क्वचितच येणार. अशा स्थितींत केवळ गोरें कातडें पाहून त्याला इंग्रजी भाषेचे शिक्षक नेमल्यानें त्या भाषेचें आमच्या विद्यार्थ्यांचें ज्ञान वाढेल ही कल्पनाच मुळीं चुकीची आहे. रद्दी इंग्रज इकडे लठ्ठ पगार खातील आणि आमच्या विद्यार्थ्यांचा मात्र कांहीं एक फायदा होणार नाहीं यापेक्षां आमच्यांतल्याच तरतरीत विद्वानांना विलायतेस दोन तीन वर्षे ठेवून तिकडून इंग्रजी भाषेंत प्रवीण करून आणिल्यास कमी पगारावर लायक माणसें मिळवून कार्यभाग अधिक चांगला होईल अशी आमची समजूत आहे.

---

## महायुद्धाची प्रगति.

रशियाची अंतःस्थिति व बाह्य संकटें दोन्हीं मित्रराष्ट्रांना चिंता उत्पन्न करणारीं आहेत. माजी रशियन जनरल सुकोमिनाफ यानें आपल्या सरकारशीं दगलबाजी के-

विद्यार्थी एका नाटकाचा प्रयोग करणार आहेत असें समजल्यावरून वरील विचार सुचले. हायस्कूल मधील विद्यार्थी प्रायः कोंवळ्या वयाचे असतात. त्यांचें शील तयार व्हावयाचें असतें. तरुण वयांत जे संस्कार घडतात त्यांचा मनुष्याच्या चारित्र्यावर फार परिणाम घडतो हें कोणीहि कबूल करील. नाटकांत तरुण मुलांनीं कामें करण्यापासून त्यांच्या चांगल्या गुणांचा विकास होण्यापेक्षां त्यांना वाईट संवई जडण्याचा जास्त संभव आहे. मनुष्याचें मन स्वभावतः वाईट मार्गाकडे जास्त कलणारें आहे. शिवाय तरुण वयांत कोणत्या गोष्टीकडे जास्त लक्ष द्यावें व कोणती गोष्ट त्याज्य मानावी ह्याचा सारासार विचार नसतो. तरुण मुलांनीं बायकांचीं सोंगें घेणें व तदनुरूप वर्तन करण्यास शिकणें ह्यापासून मुलांमध्यें खात्रीनें दुर्वर्तन वाढेल.

नाटक करावयाचें ह्मणजे त्याची तयारी करण्यास बराच वेळ लागणार. जरी नाटकांत सोंग घेणारीं मुलें थोडी असलीं तरी तो एक महत्वाचा विषय होऊन बसल्यामुळें सर्व मुलांचें लक्ष तिकडे वेधणें अपरिहार्य आहे. वेळ फावेल तेव्हां नाटकामुळें संगीत तालीम करणार, आपापलीं भाषणें पाठ करणार, एकमेकांशीं थट्टा करतांना नाटकांतलि भाषा व प्रसंग ह्यांचा उल्लेख करणार. अशा रितीनें शाळा व शाळेसभोंवतालचें सर्व वातावरण नाटकानें दुमदुमून जाणार. त्यामुळें वर लिहिलेले दुष्परिणाम फक्त सोंगें घेणारावरच घडणार नसून शाळेंत जाणारा प्रत्येक मुलगा त्यांस बळी पडणार.

आपल्या आकोला हायस्कूलची परिस्थिती लक्षांत घेतां अभ्यासाच्या दृष्टीनेंहि मुलांचा वेळ नाटकांत जाणें अत्यंत नुकसानकारक होणार आहे. येथें १।२ वर्षापासून प्लेग दरसाल होत असल्यामुळें प्लेगांत मुलांचे अभ्यासाची फार हेळसांड होते शिवाय यंदा खेळानिमित्त एक महिनापर्यंत रोज ४० मिनिटें प्रमाणें अभ्यासाचा वेळ कमी करण्यांत आला आहे असें ऐकतों. यंदा ही प्लेग होण्याचा व त्यामुळें मुलांच्या अभ्यासांत व्यत्यय येण्याचा संभव डोकावतोच आहे. अशा स्थितींत मुलांनीं नाटक करण्यापासून त्यांचा फायदा होईल कीं नाहीं ह्याचा विचार मुलांनीं केला नसला तरी हायस्कूलचे मास्तर—विशेषतः हेड मास्तर— ह्यांनीं व पालकानीं करणें जरूर आहे अमचे असें ऐकण्यांत आलें आहे कीं, हेडमास्तर साहेब व पुष्कळ पालक मुलांनीं नाटक करण्याचे विरुद्ध आहत असें असेल तर यांनीं नाटकाचा बेत तावडतोब हाणून पाडला पाहिजे. जरी कांहीं पालकांना आपल्या मुलांनीं नाटकांत नाचणें ह्यांत कांहीं वावगें दिसत नसलें तरी वर लिहिल्याप्रमाणें त्यांच्या नाचानें इतर मुलांचें नुकसान होणार असल्यामुळें अशा पालकांचे इच्छेविरुद्ध किंवा त्यांची इच्छा काय आहे हें त्यांस न विचारतां त्यांचे मुलांभोंवती नाटकी व घातक वातावरण उत्पन्न करून त्यांचे नुकसान करण्याचा हक्क इतरांस पोंचत नाहीं. आमची अशी खात्री आहे कीं आपल्या तरुण मुलांना नाटकांत नाचविण्याशिवाय त्यांच्या गुणांचा विकास होर होणार नाहीं अशा विचाराचे लोक आकोल्यांत फारसे निघणार नाहींत. सबब मेहेरबान हेड मास्तर साहेब व पालक ह्यांनीं मिळून हें आकोल्यांत उत्पन्न होऊं पहाणारें घातुक व दुष्परिणामी संकट वेळींच नष्ट करावें ह्मणजे त्याच्या सुधारून वाढविलेल्या आवृत्त्या हायस्कुलांत व लहान मुलांसाठीं संकलित करून काढलेल्या आवृत्त्या मराठी व मिडल स्कूल मधून निघण्याचा संभव राहणार नाहीं.

## जृम्भक.

( राष्ट्रीय आत्मिक विद्युत् )

इंडिया डिफेन्स अॅक्ट ह्मणजे सरकारी जृम्भकास्त्रच होय. राजकीय क्षेत्रांत त्या त्या व्यक्तींना निर्व्यापार करण्याला सरकारपाशीं हें महा दांडगें शस्त्र आहे खरें; पण श्रीमती बिझांटबाईवर या अस्त्राचा प्रयोग केल्या दिवसापासून सर्व हिंदुस्थान देश सव्यापार होऊन खडबडून उठल्यासारखा झाला आहे. सरकारी प्रयोग झाला एक आणि त्याचा परिणाम अगदीं त्याच्या उलट अनतपटीनें सर्व राष्ट्रभर सौदामिनीसारखा वाढत चलला आहे. दडपशाहीनें सर्व राष्ट्र सजीव व चेतनायुक्त झालें आहे असें पहूनच कीं काय वरिष्ठ सरकारच्या कौंसिलांत हें अस्त्र परत घेण्याचा विचार नामदार जीना यांच्या प्रश्नाला उत्तर देतांना प्रसिद्ध करण्यांत आला आहे. फक्त शर्त एवढीच घातलीं आहे कीं बेसनदशीर किंवा उलथापालथी करणारीं संभाषणें मात्र होतां कामा नये. आमच्या दृष्टीनें या शर्तीचें कोणींच अटकेंत ठेवलेल्या थोर गृहस्थांनीं उल्लंघन केलेलें नाहीं कसें ही असो आनंदाची गोष्ट कीं दडपशाहीचें पाऊल सरकार मागें घेत आहे आणि मि. मांटेग्यु यांच्या पुढचा रस्ता साफसूफ करून ठेवीत आहत तेव्हां लोकांची ही आत्मिकसौदामिनी स्वराज्याचा प्रदेश प्रकाशमय करून सोडील.

## स्वराज्याची ध्वजा.

कोइम्बतूर येथें जा तुरुंग— दर्शनी बंगला आहे त्याला श्री बिझांटबाई तेथें गेल्यापासून "व्यास विलास" हें नांव देण्यांत आलें आहे. तेथें त्यांनीं स्वराज्याची ध्वजा उभारली ह्मणून त्या जिल्ह्यांतील अधिकाऱ्यांनीं आकाशपाताळ एक करून सोडलें आहे. तेथील जिल्हा कोर्टांत हें ध्वजेचें प्रकरण सध्या चालू आहे व साक्षी पुरावा होऊन मॅजिस्ट्रेटचा निकाल देण्यावर प्रकर्ण तहकूब आहे.

आमच्या प्रांतांत ही मुख्य मुख्य शहरीं हिरव्या व तांबड्या मिश्र निशाणांच्या पताका तयार करण्याचा विचार चालू आहे. पण त्याच्यांत ही विशेष इतकाच कीं त्यावर श्रीमान जॉर्ज बादशहाचा मुखवटा छापून नंतर त्या ध्वजा उभारण्यांत येणार आहेत

## कार्य मापन.

( लॉर्ड चेम्सफर्ड यांचा प्रकाश )

गेल्या बुधवारीं व्हाइसरॉयचे कायदे कौंसिल भरलें होतें तेव्हां प्रश्नोत्तरें झाल्यावर लॉर्ड चेम्सफर्ड यांनीं एक दांडगें संभाषण केलें आहे. त्यामध्यें सांप्रतच्या राजकीय स्थितीचें सिंहावलोकन असून सरकारी भावी संकल्पही प्रकाशित केलेले आहेत. लॉर्ड चेम्सफर्ड यांना शद्वपांडित्य लागत नाहीं असें ते ह्मणतात. अभिवचनें देऊन आशा समुत्पन्न करण्याकडे त्यांचा कल नाहीं. त्यांचा मुख्य रोख असा कीं लोकांनीं आपली कारकीर्द कृतीच्या दृष्टीनें मापावी. कार्यमापन ही त्यांच्या दृष्टीनें सद्गुणांची कसोटी होय आणि ह्मणूनच त्यांनीं आपल्या भाषणांत पुष्कळशीं वचनें देण्याचा प्रसंग टाळलेला आहे. आह्मालाही लॉर्ड चेम्सफर्ड हे कर्तृत्ववचन पाहिजेत आणि ज्या सत्कृतींनीं ते इंडियाला स्वराज्य समीप करून देतील त्याच कृतीबद्दल आह्मी त्यांची धन्यता गाऊं. नाहींतर म्युनिसिपालिट्या लोकल बोर्ड व कायदे कौंसिल यांच्यातील अधिकारदानानें लोक संतुष्ट होण्यासारखे नाहींत. त्यांना खरी सत्ताश्री पाहिजे आणि ती कोणत्याही तात्पुरत्या दानानें प्राप्त होणारी नाहीं. इंडियाच्या आत्मशक्तीचा जसजसा हा विकास होत जाईल तसतशी आमच्या राज्यकर्त्यांच्या हातांतली सत्ताश्री लोकांच्या हातीं गेल्याशिवाय राहाणार नाहीं, आणि प्रस्तुतच्या काळीं राज्यकर्त्यांना हीच सत्ताश्री लोकांच्या बरोबर विभागून आनंदवृद्धी करण्यास शिकलें पाहिजे. गेल्या सहा महिन्याच्या अनुभवानंतर सरकारी दृष्टिकोन बदलला आहे असें या संभाषणाचें अंतरंग जाणणाऱ्या मर्मज्ञांनीं ध्वनित केलें आहे हे दृष्टिकोन विजेप्रमाणें एकसारखे बदलत राहिले तर कार्यमापनाची कसोटी लावणें मोठें संकटमय होईल. तथापि या काळ्या कुट्ट अंधाऱ्या राजकीय स्थितींत लॉर्ड चेम्सफर्ड हे आपला अंतःकरणाचा प्रकाश पाडीत आहेत आणि लोकांच्या आशा पुनः उज्वल होत आहेत ही आनंदाची गोष्ट होय.


# उच्च भवितव्य

## ( साम्राज्याची पुण्यश्री )

पुनश्च

### श्री बिझांटचें 'स्वराज्य'

**ब्रिटिश साम्राज्याची पुण्यश्री फार लोकोत्तर होय! त्याचीं उदात्त ध्येयें, पिढीजात न्यायबुद्धि, आणि संकटामुळें प्रकाशमय होणारी तेजोवृत्ति हींच आमच्या हिंदी लोकांची खरी धन दौलत होय. श्री बिझांट देवी व त्यांचे सद्भक्त बंधमुक्त होतात इतकेंच नाहीं तर आमच्या 'स्वराज्या'चा गंगाप्रवाह सर्व राष्ट्रालाच काय तर साम्राज्याला देखील कसा पुनीत व पावन करीत चालला आहे पहा!**


# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—या सप्तकांत पाऊस पुन्हां चांगला झाला आणि आतां उघाडी पडत आहे. तेव्हां पिकांची समृद्धी होऊन लोक [illegible] वाटते. आसपासच्या खेडेगांवामध्यें प्लेग आहे खरा; पण त्याची कालमर्यादा संपत आली आहे असें दिसतें.

**महापूर**—गेल्या शुक्रवारीं येथील मोर्णा नदीला १८८६ च्या पुरापेक्षां लहान पण १९०४ च्या पुरा येवढाच महापूर येऊन येथील पुलाच्या मत्थ्यावर लाटा खूब जोरानें आदळत होत्या आणि नदी काठच्या खोलेश्वराच्या बाजूला आणि नबाबपुऱ्यांतील बाजूला घरोंवर पाणी झालें होतें. हा पूर दिवसाचे ८ वाजल्यानंतर सुमारें १२ वाजेपर्यंत एकसारखा चढत होता. पण प्राणहानि कांहीं झाली नाहीं. नदीच्या पुरानें वाहून जाणारा आकोल्याचा वस्तीचा भाग कायमचा मोकळा करण्यांत येईल तर विशेष बरें.

**कर्मणुकीचा नाटक प्रयोग**—श्री आकोला सोशल क्लब, नांवाचा कांहीं तरुण मंडळीचा एक समाज आहे. त्यांनीं गेल्या गुरुवारीं 'जातिवंत मराठा वीर' हें नाटक करून दाखविलें हा प्रयोग बरा झाला आणि हैबत्य, चंद्रा, शंभुसिंग, नूरनिहार, सुमंत, चंद्रसेन इत्यादिकांचीं कामें पाहून मंडळीचा हा कर्मणुकीचा नमुना प्रशंसनीय वाटेल.

**अभिनंदन**—गेल्या ३१ व्या तारखेला वऱ्हाडच्या तिन्ही नव्या नामदारांना उमरावतीस जाहिर पानसुपारी देण्यांत आली. आमची आकोल्याची मंडळी त्यांचें काम पाहून ३ वर्षानंतर योग्य तो आदरसत्कार करतील. कार्यमापनाची प्रशंसा खरी होय.

**सर्पविष**— सरगुजा चे महाराज बहादुर रघुनाथ सारसिंग देव यांनीं सर्पदंशावर उत्तम औषधी शोधून काढली आहे, तेव्हां तिचा प्रसार सर्व प्रांतिक दवाखान्यांतून करण्यांत येईल तर बरें.

**जाहीर व्याख्यान**—गेल्या गुरुवारीं येथील राजेश्वर मंदिरांत स्वराज्यसंघातर्फें उमरावतीचे वक्ते रा. रा. वामन गोपाळ जोशी "राक्षसी महत्वाकांक्षे"चे नाटककर्ते यांनीं स्वराज्यावर फार सुंदर वक्तृत्वपूर्ण व जोमदार असें व्याख्यान दिलें.

**पैसाफंड**—येथील नूतन संगीत नाटक मंडळीच्या नाटकाच्या दिवशीं ५ वेळां पैशाची पेटी फिरवून राजश्री रत्नाकर व त्यांच्या भगिनी यांनीं ९॥=॥ गोळा केले आहेत.

**मोफत वाचनालयः**— राजश्री शंकरराव खाडिलकर हे आकोल्यास मोफत वाचनालय काढण्याकरितां खटपट करीत आहेत. त्यांनीं फुकट टेबल खुर्च्यांची व जागेची मागणी करीत बसण्यापेक्षां येथील लायब्ररीच्या व्यवस्थापकाकडे लोकांची ही हार्दिक इच्छा कळविल्यास तेथें ही त्यांच्या इच्छेप्रमाणें लौकर व्यवस्था होईल.

आह्मास कळविण्यास दुःख वाटतें कीं रा. रा. नामदेव पंढरीनाथ खिळकर कारभारी पाटील चिमकर्दी यांस गेल्या मंगळवारी प्लेगानें देवाज्ञा झाली. यांनीं सरकारी काम चांगलें सांभाळून 'वतनदार' छापखानाही ऊर्जित दशेला आणून आपल्या वडिलांना पुष्कळ मदत दिली. पण मृत्युपुढें काय इलाज!

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येते कीं, वि० सिनिअर सबजज्य सो० कोर्ट आकोला यांचे फैलावर तुळसाई मर्द किसन रा० दहिहांडा ता० आकोट ईनें मयत नवरा किसन हनवती याचे सक्सेशन सर्टिफिकीट मिळण्याकारितां. स. सर्टिफिकेट नं. १४/१७ चा अर्ज दाखल केला आहे व चौ० ता० २०।१०।१९१७ नेमली आहे. तरी यांत कोणाची कांहीं हरकत अगर सांगणें असल्यास सदरहू तारखेवर हाजर व्हावें व आपली तकरार सांगावी हे कळावें.

N. G. Subhedar
Senior Sub Judge
Akola

Dated 27-8-17

नो० नं० ३९०

## जाहिर नोटीस

सर्वत्र साहू सावकार मंडळीस या जाहीर नोटिशीनें खाली सही करणार कळवितो कीं माझा मुलगा बाबूराव वा नागो कासार रा० केळी हा दुर्व्यसनी निघाला असून लोकांच्या जवळून कर्ज वगैरे काढीत आहे. तरी कोणी माझे नावांवर त्यास कर्ज देऊं नये. दिल्यास मी अगर माझी स्थावर जंगम जिनगी जबाबदार राहणार नाहीं. कोणी त्याला कर्ज देऊन फसूं नये सबब आगाऊ कळविलें आहे कळावें ता० १।९।१७

सही
नागो वा माहादाजी कासार द० खुद

नो० नं० ३९१

## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

**या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.**

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

ता. १ जुलै पासून पुढें आणखी प्रसिद्ध होईपर्यंत व्याज दरसाल दर शेकडा ४ रुपये याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } Lyon Scott एजंट

नो नं १

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारांस वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १४८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८

**बाटलीवाल्यांचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनखी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H. L. Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 6 Dadar Bombay

## अनुभवानें खात्री



पटेल !! जर आपणास आपले हारमोनीयम अगदीं वाईट स्थितिंतील नव्या प्रमाणें माफक दरांत दुरुस्त करून घेणें असेल तर आजच खालीं लिहिलेल्या पत्यावर व्यवहार करा. अनुभवानें खात्री पटेल. शिवाय नव्या पेट्या आमचे जंगी कारखान्यांत ऑर्डर प्रमाणें अडव्हान्स आल्यास तयार मिळतात. त्याचे दर–हात पेटी सिंगल रीड २० ते २५

" डबल रीड ३०-३५-४०-५०

तीनलाइनी क्याझरेल सूराची किं. रु. ९५

पाय पेटी सतक ३। ६० ते ८० रु.
" " " ३॥ ८५ ते९५ रु.
" " " ३॥। १०४-११५ रु)
" " " ३॥। तीन लाइनी

क्याझरेल सुराची १८० ते २१० रु.

पत्ता—रामचंद्र बीसनसा हार्मोनियम मेकर व रिपेअरर नांदुरा जि० ( बुलडाणा

नो. नं. २८४

# लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आम्ही येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान, दळण्याच्या गिरण्या **जीन व प्रेसचें सामान** वगैरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठावितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारे सर्व सामान मोटारचे व घोडे गाडीचे गाद्यांचे कापड, व दुसरे लागणारे सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरे विजेचे सामान, ल्यांपस् वगै माल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन

कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट मुंबई नंबर २

नो. नं. ३९८

**गरीबांस फुकट**

# रामबाण मलम

( कोणत्याहि त्वग्रोगावर )

गुणकारी किं. ६ आणे.

# केशनाशक पूड.

( ९ आणे )

(क्याटलॉग फुकट) पत्ता. व्ही. आर मुळे नांदुरा. G. I. P.

नो० नं० ३७०

## रोल्डगोल्ड सोन्याचे

**कधींच काळे न पडणारे दागिने**

चंद्रहार किं. ४. ३–४; गोट जोडी २–२॥; पाटल्या जडी २–२॥; बजरटीका ३–४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४–९. शिंप्याचें मोतीं लहान मोठें बाटेल तसें. सराची २–३–४; अंगठी १; सल्ले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २–२॥. सरी ४

**केंस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाकसची किं. १॥ रु.

पत्ता— मगनलाल के. आणि कंपनी गिरगांव— मुंबई

नो० नं० ९

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिवृद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भासंबंधी मुलांचे विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट [illegible], मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व लढाज भरपूर पचूं लागतें. यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नमून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ६ आणे पडेल दर एकदम ३६ गो० १ रु० ७६ गो० २ रु० ११९ गो० ४ रु० २७२ गो० ६ रु० ५१० गो० १० रुपये.

१. अपूर्व नेत्रांजन—यानें वडस, सारा, फुलें, **धुरळा,** बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. परम्यावर अपूर्व मिश्रण—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तीडक, मुत्राची लाळा, संकोच, पूयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका वटकत जाते. असें रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नमून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, योक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागाविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी

नो० नं० २२

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यानीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd. N. No. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला—सोमवार तारीख १७ माहे सप्टेंबर सन १९१७ ई० [अंक ३७

काश्मीरी केशर.

पवित्र आणि अस्सल १८८ उत्तम कस्तुरी ३९, शुद्धशिलाजीत ८८ सुर्मा ममीरा १ तो. अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १= कागदी बादाम ८९ पौंड, सेबाचा मुरब्बा २ पौं. टिन १।

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९**

नो० नं० ९

## नोटीस.

विद्यमान ॲ. मुनसफ कोर्ट खामगांव

दि. मु. नं. २७१ सन १९१७

ने, ता. ९।१०।१७

वादी

मारुती रंभाजी रा. पिंपराळे तालुके खामगांव वगैरे इसम ५

प्रतिवादी

पुंजाजी हरी कुणबी रा पिंपराळे तालुके खामगांव

दावारुपये

१ मारुती रंभाजी, २ नामदेव जैराम, ३ बाबन विठोबा, ४ मिराजी रामजी व ५ नारायण उदेभान हे पिंपराळे तालुके खामगांव या गांवाचे पंच आहेत. त्यांनीं मारुतीचे देऊळ व मढी बांधण्याकरितां सर्व हिंदू गांवकरी लोकांत वर्गणी करता जमा झालेली रक्कम रुपये ३०० तिनशें प्रतिवादी पुंजाजी याजजवळ अनामत ठेविली होती. त्यांतून त्यानें मारुतीच्या देवळाची मढी बांधण्या करतां अंदाज रुपये १०० शंभर खर्च केला. नंतर बाकीचे दुसरे कांहीं काम केले नाहीं. सबब झालेल्या कामाच्या खर्चाचा हिशेब व बाकीची रक्कम मागितली असतां त्यानें हिशेब दिला नाहीं व रक्कम ही देण्याचे साफ नाकारलें. सबब वरील पंचांनीं सर्व हिंदू गांवकऱ्यांतर्फे ह्मणून सदर्हू हिशेब व बाकीची रक्कम मिळण्याकरितां प्रतिवादीवर वरील नंबरचा दावा केला आहे. त्याची तारीख ९।१०।१९१७ नेमली आहे तरी यासंबंधीं कोणाची कांहीं तक्रार असल्यास त्यांनीं ती ता. ९।१०। १९१७ रोजीं कोर्टांत हजर रहून कळवावी. कळावें. आज ता. ६।९।१९१७

सही

N. M. Joshi
Pleader for the plffs.

N. N. 392

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं केशरबाई भ्रतार हिरालाल वस्ती मौज हरणखेड तालुका मलकापूर इनें आमचे कोर्टांत किं. मु. नं. २ सन १९१७ चा अर्ज वारसाचें सर्टिफिकीट ( Succession certificate ) मिळणें बद्दल अर्ज दिला आहे व त्या अर्जाची चौकशी तारीख १०-१०-१७ इ रोजीं आहे. सदरहु प्रकर्णांत ज्याच्या कांहीं तक्रारी असतील त्यांनीं वरील तारखेचे आंत दाखल कराव्यांत कळावें ता० ५-९-१९१७ इ० सही

N. K. Mohogaonkar
Sub Judge
Malkapur

नो० नं० ३९३

## जाहीर नोटीस

खालीं सही करणार याजकडून सर्वत्र साहुसावकार लोकांस:—

जाहीर नोटिसीनें कळविण्यांत येते कीं माझा मुलगा नामे लक्ष्मण हा नुकताच वयांत (सज्ञान) झालेला आहे. तो नादी लागून व्यसनी झालेला आहे तो माझे मताशिवाय सावकाराकरून कर्ज काढून वाटेल तसे व्याज कबूल करितों. त्यामुळें माझे स्वसंपादीत मिळकती पुढें कोणतेही प्रकारचा धोका झाल्यास विनाकारण नुकसान होण्याचा संभव आहे. हल्लीं माझा मुलगा हा मला नकळत माझे घरांतील सामानाची व दागदागिन्याची उडवा उडव करून कमी भावानें लोकांस विकतो. त्यामुळें माझें नुकसान होऊं पाहातें. ते होऊं नये याजकरितां जाहीर नोटिशीनें सर्वत्रांस कळविण्यांत येते कीं यापुढें माझे मुलास कोणी कर्ज देऊं नये अगर माझी स्वसंपादीत मिळकत त्याजपासून कोणतेही लेखानें गुंतून घेऊं नये. जर कोणी त्याच्याशी व्यवहार करील तर त्याचे पैशाबद्दल मी जबाबदार नाहीं. अगर त्याजपासून कोणी सामान अगर दागदागिना विकत घेऊं नये. जो कोणी त्याजपासून सामान अगर दागदागिना विकत घेईल तर तो फौजदारी गुन्ह्यास पात्र होईल. करितां त्याच्याशी व्यवहार करण्यासंबंधानें सर्वत्रानीं सावध राहावे ही नोटीस दिली सही तारिख ८ सप्टेंबर सन १९१७ इा द० पांडुरंग विठ्ठल पातूरकर रा. दर्यापूर

सही

१ नीा पुनाजी वाा पुंजाजी बोकसे
कुणबी रा. वडनेर गंगाई याचा
आंगठा द० पांडुरंग

नो० नं० ३९४

## जाहीर नोटिशीचें उत्तर.

रा. रा. यशवंतराव गोविंदराव देशमुख राहणार हातरुण तालुके बाळापूर

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिशीचे उत्तर देण्यांत येते कीं, आपली नोटिस ता. ३१।८।१९१७ इसवीची पावली. त्या नोटिशींत लिहिल्याप्रमाणें तुह्मी सन १९१७-१९१८ साला करितां माझा बंधु नारायणसिंग तानसिंग याजला जमीन लाऊन काढली त्याचा तपशिलः—

१ कवठ्या रस्त्याची पट्टी
२ बोरबनचे पांच नंबर
३ घेंगीचे पांच नंबर
४ आडावाले शेत
५ महमद खानाचे शेत

एकूण शेतें १३ लावून काढलीं. त्या शेता पैकीं माझा बंधु नारायणसिंग तानसिंग यानें बोरबनचे पांच नंबर १ रावज्या वाा मुक्या महार १ काल्या वाा बनशा महार १ जन्या वाा झींग्या १ बन्या वाा बुध्या याना बटाईनें दिले होते. कवठे रस्त्याची पट्टी खंड्या वाा चीध्या महार याजला लाऊन काढली होती आणि बाकीचीं शेतें घरीं ठेविली होती. उन्हाळ वाही करून सर्व जमीन तयार झाल्यानंतर ता. १२।६।१९१७ इसवी रोजीं नारायणसिंग तानसिंग हा मरण पावला. मी त्याची सखी बहीण असल्यामुळें कायदेशीर वारस सरकारनीं मजला ठरविलें. असें असतां तुह्मी खालीं जमीन मजकडून व नारायणसिंगचे वहीतदाराकडून हिसकाऊन घेऊन मारोतीसिंग वाा श्यामसिंग व गेदसिंग वाा श्यामसिंग या उभयतास आमचे हक्क न जुमानता लाऊन काढली व ती त्यानीं ह्मणजे तुमचे नवीन वहितदारानीं पेरून घातली त्या जमिनीशीं माझा व नारायणसिंगचे वहितदाराचा अर्थाअर्थीं संबंध राहिला नाहीं. तुमची नुकसानी भरून देण्यास मी किंवा नारायणसिंगची जिनगी कायद्याप्रमाणें जबाबदार नाहीं. जमीन तुमचे कबज्यांत आहे ती पडीत तुह्मी मुद्दाम ठेविल्या. त्याजबद्दलची तोसीस तुह्मास सोसणें भाग आहे. हें नोटिशीचें उत्तर दिले सही आकोला ता. ७।९।१९१७

सही

१ चुन्नी मर्द गोपाळसिंग रजपुत रा.
हात निशानी खुद दस्तुर गणेश
जोशी हातेकर पोष्ट निंभ

नो० नं० ३९५

## नोटीस

रा० रा० सिताराम वाा परशराम काकड रा० मोरगांव काकड हल्लीं आकोला तालुके व जि० आकोला

यांसी:—

खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमचे जवळ सुमारे दोन वर्षापासून मुखत्यारीचे कामावर नोकर होता. आह्मी तुमच्यावर भरंवसा ठेवून सर्व कामाची तुमचेवर जबाबदारी सोपविली होती परंतु तुह्मी आजपर्यंत जे काम केले ते अगदीं अविश्वासनीय केले. तुमच्या वागण्यावरून तुमचेवर मुळींच भरवसा ठेवतां येत नाहीं अशी तुमची वागणूक आहे. तुह्माला आह्मी कोर्टाचे कामाकरितां वगैरे ह्मणून तुह्माला आह्मी वारंवार रकमा दिल्या त्याचा हिशेब मुळींच दिला नाहीं. व उमरावती कोर्टांत अपिलाचे कामामध्यें तुह्मी मि. आबदुल कादर साहेब यास दररोज पन्नास रुपयाप्रमाणें ठरवून त्यांचें वकीलपत्र दाखल केले ह्मणून मला खोटीच थाप देऊन माझ्या जवळून तुह्मी त्याला देण्याकरितां ह्मणून पैसे घेऊन गेले परंतु तुह्मी त्याचे मुळींच वकीलपत्र दिलें नाहीं असें तपास करतां आढळून आले याशिवाय आकोले येथील घर हरास होऊन कोर्टांत रकम जमा असलेली तुह्मी उचलून घेतली परंतु त्याचा हिशेब आह्माला दिला नाहीं व रुपये उचलून घेतलेबद्दल आह्माला कळविले ही नाहीं व तुह्मी आमची मुळींच भेट ही घेत नाहीं. आह्मी तुमचे शोधा करितां फिरतो परंतु तुह्मी मुळींच आह्माला भेटत नाहीं व आमचे काम न करितां तुह्मी आपले स्वतःचे कामामध्यें नेहमीं फिरतां. करितां तुह्मास आतां मुद्दाम या नोटिशीनें कळविले जाते कीं आज तारखे पासून तुमचे जनरल मुखत्यार पत्र रद्द केले आहे. तुह्मी आमचे तर्फे कोणते ही दिवाणी किंवा फौजदारी मुलकी कामांत किंवा अपिलांत कोणते ही प्रकारें काम चालवूं नये व आजपर्यंत आमचे जवळून ज्या ज्या वेळीं रकमा घेऊन गेले त्याचा हिशेब ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे अंत देऊन आमचा निकाल करावा व आमची पावती ध्यावी. तसे न केल्यास आह्मी रितीप्रमाणें तजवीज करूं व सर्व रकमा व या नोटिसीचा खर्च तुमचेकडून भरून घेऊं ही नोटीस दिली सही आज तारीख २-९-१९१७ इसवी

ताजाकलम—

तुह्मी आमचे जातीचे असून शिवाय आमचे जवळचे नातेवाईक असलेमुळें तुमचेवर आम्ही विश्वास ठेऊन तुम्हाला मुखत्यार पत्र दिले परंतु तुम्ही आमचा विश्वासघात करून आमचे कामाचा सर्व घोटाळा केला सबब तुमचे मुखत्यार पत्र रद्द केलें आहे.

सही

सखाराम वाा विठोबा पाटील कुणबी
रा० धामोडी तालुके दर्यापूर
नि० खु० आंगठा

नो० नं० ३९६

## नोटीस

नोटीस बेशमी मोहंनसिंह रुपसिंह रा० मलकापूर

यांसः —

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं तुह्मांस आह्मी अ० नं० ३९ बुक नं. ४ भग ९ पान १२९ ता० २७ आगष्ट १९१० रोजीं कुलमुकत्यार पत्र करून दिलें होते तें मुखत्यार पत्र आज मित्ति पासून रद्द करण्यांत आले आहे, ह्मणजे तुह्माला त्या मुकत्यार पत्रावरून आज मित्तीपासून आमचे करितां कोणत्याही प्रकारचा व्यवहार करतां यावयाचा नाहीं तें तुह्मांस कळावें ता० ३-९-१७ इ.

सही

बीरदीचंद अनराज दुकानचे मालक गुलाबचंद बिरदीचंद मलकापूर (बुलडाणा)

नो० नं० ३९७

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं मोहनसिंग रुपसिंग यास आह्मी मुखत्यार नेमलें होतें तें कुलमुखत्यारपत्र आह्मीं रद्द केलें आहे. आमचे करितां त्याजसी कोणतेही प्रकारचा केलेला व्यवहार तो आज मित्तीपासून बेकायदेशीर होईल कळावें तारीख ३-९-१७ इ.

सही

बीरदीचंद अनराज दुकानचे मालक गुलाबचंद बिरदीचंद मलकापूर

नो० नं० ३९८ (बुलडाणा)

## पत्रव्यवहार

रा. रा. वऱ्हाडसमाचार पत्र कर्ते यांसः—

आज सिताबर्डीवर राजाराम लायब्ररींत कर्नल डा० बुकॅनन यांचे अध्यक्षते खालीं प्लेग प्रतिबंधक उपायाचे योजनेबद्दल सार्वजनिक सभा भरली होती. डा. बुकॅनन यांनीं उंदीर मारल्यानें प्लेगाची वाढ कमी कशी होते. याबद्दल पंधरा वर्षाचे प्लेगापासून झालेल्या मृत्युसंख्येचे आकडे लोकांपुढे मांडून फार उत्तम तऱ्हेनें समजून दिले. नागपुरास डा० बुकॅनन असतां १९०७ सालीं उंदीर मारण्याचा दीर्घ प्रयत्न झाला होता व तेव्हां मृत्युसंख्या फार कमी होऊन प्लेगचा फैलाव कमी झाला होता. रा. भवानी शंकर वकील यांनीं निरनिराळ्या प्लेग प्रतिबंधक उपायांची अपूर्णता दाखवून मूषक हननाचाच उपाय विशेष यशस्वी होईल असें सांगितलें. डा. बुकॅनन यांनीं सागर येथें या उपायांची योजना पूर्णपणें केल्यामुळें तेथें तीन वर्षांत प्लेग झाला नाहीं. तेथील लोकांनीं अशा बद्दल डाक्टर साहेब यांस धन्यवादपर सरटीफिकीट ही दिलें आहे मूषक हननाचे तीन उपाय आहेत. एक मांजर बाळगून, सापळ्यांतून पकडणें अथवा विषारी गोळ्या टाकून. हे उपाय योजून लोकांस मदत करण्याबद्दल म्युनिसिपालिटीकडे पाठविण्याकरितां ठराव पास केला. घरांत मांजरें येऊन उंदरास मारतील अशा रीतीची धान्याच्या कोठीस भोकें ठेवण्याची त्यांची युक्ती फार चांगली आहे. ते सर्वांस मांजरें पाळण्या विषयीं सुचवितात. परंतु चांगलीं मांजरें जीं दिसण्यांत खबसुरत व चलाख असतात अशी मिळत नाहींत. तीही म्युनिसिपालीटीकडून मिळतील तर चांगले होईल. चांगली जात मिळण्याकरितां मांजरांचीं प्रदर्शनें ठिकठिकाणीं म्युनिसिपालिटीनें भरविल्यास ठीक होईल. कर्नल डा० बुकॅनन यांचा उद्योग फार स्तुत्य आहे. त्यांचे मनांत एखादी गोष्ट आली ह्मणजे ते त्या गोष्टीचा पिच्छा पुरवितात हा त्यांचा गुण आहे. मूषक हननाचा हा उपाय दिसण्यांत अगदीं क्षुल्लक असा वाटतो तरी फार महत्वाचा आहे हें सहज समजण्यासारखें आहे ता. ९।९।१७

मराठे

---

वऱ्हाडसमाचार

भाद्रपद शुद्ध १ पिंगल संवत्सर १८३९

## नवयुगाचा प्रारंभ.

प्रस्तुत युद्धामुळें हिंदुस्थानाविषयींचा इंग्रजी मुत्सद्यांचा दृष्टिकोण बदलला आहे अशी भाषा आतांपर्यंत पुष्कळ वेळां वापरण्यांत आली आहे, तथापि या ह्मणण्यांत खरोखर तथ्य किती आहे याविषयीं लोक अद्याप बरेच साशंक होते. इंपीरियल कान्फरन्समध्यें हिंदुस्थानातर्फे सरकारनियुक्त प्रातिनिधि घेण्यांत आले, तरी लोकांची शंका दूर झाली नाहीं. कारण, एक तर ते हिंदुस्थानच्या लोकांनीं निवडलेले प्रातिनिधि या नात्यानें गेले नव्हते, व शिवाय दुसरी गोष्ट त्यांच्या जाण्यानें कानडासारख्या वसाहतसरकारच्या प्रातिनिधींच्या हिंदी लोकांविषयींच्या विरोधाची तीव्रता थोडी बहुत कमी झाली आणि त्यांनीं हिंदी लोकांना इतर एशियाटिक लोकांच्या बरोबरीनें वागाविण्याची कबूली दिली असली, तरी ब्रिटिश प्रजा या नात्यानें त्यांना जे विशेष हक्क मिळावयास पाहिजे ते न मिळतां जपानी, चिनी वगैरे तिऱ्हाइताप्रमाणें वागाविण्यांत येईल येवढेंच काय तें त्या कान्फरन्सपासून निष्पन्न झालें, आणि विशेष समाधान मानण्यासारखें यांत कांहीं आहे असें कोणी ह्मणणार नाहीं. पण गेल्या दोन तीन आठवड्यांत मि. मांटेग्यु यांचा हिंदुस्थानांत येण्याचा नक्की विचार, ब्रिटिश अंमलाखालीं हिंदुस्थानाला पुढें मागें स्वराज्याचे हक्क देण्याचें सरकारचें ध्येय आहे असा जाहिरनामा व हिंदुस्थानच्या लोकांना सैन्यांत अंमलदारीच्या जागा देण्याचे कामीं आड येणारे निर्बंध काढून टाकण्याची सरकारची तयारी इ. ज्या गोष्टी घडून आल्या त्यांच्या योगानें लोकांच्या शंकेचा हळूं हळूं निरास होऊं लागला आहे. त्यानंतर गेल्या आठवड्यांत ना. व्हाइसराय साहेबांनीं वरिष्ठ कौंसिलपुढें केलेल्या भाषणाची सौम्यता, व 'तिळगूळ घ्या आणि गोड बोला' अशा स्वरूपाची हिंदी प्रातिनिधींशीं सलोख्यानें वागण्याची व हिंदी लोकांच्या महत्त्वाकांक्षा केवळ असाध्य न समजतां फार तर आतांच्या घटकेला दुःसाध्य असल्या तरी अंशतः त्या साध्य होतील अशा प्रकारची आशोत्पादक भाषण शैली इ. गोष्टींचा विचार केला ह्मणजे वरील शंकेचें बहुतेक निरसन होतें, आणि नवयुगाला खरोखर प्रारंभ झाला आहे अशी खात्री वाटूं लागते.

ना. व्हाइसराय साहेबांचें भाषण येवढें मोठें आणि व्यापक आहे कीं त्यांतल्या ठळक मुद्यांचेंच विवेचन येथें करणें शक्य आहे. त्यांनीं आपल्या या भाषणांत आपल्या आतांपर्यंतच्या कारकीर्दीचा आढावाच काढला आहे असें ह्मटलें तरी चालेल. लॉर्ड चेम्सफोर्ड यांचीं या पूर्वींचीं भाषणें व हें आतांचें भाषण याच्या स्वरूपांत जमीन अस्मानाचें अंतर आहे, इतकें सांगितलें ह्मणजे लॉर्ड पेंटलंड, सर मायकेल ओडवार, प्रभृति प्रांताधिपतींच्या स्वराज्याच्या चळवळी विषयींच्या उद्गारांचा उग्रपणा, दडपशाही सुरू करण्याचा धाक, लोकांच्या हक्क संपादनाच्या यत्नाविषयींचें तिरस्कार प्रदर्शन वगैरे दुर्गुणापासून हें भाषण सर्वथा अलिप्त आहे हें निराळें सांगावयास नकोच. नामदार साहेबांच्या भाषणांत पहिली महत्वाची गोष्ट ह्मणजे लष्करी लोकांच्या सोयीकडे अधिक लक्ष देऊन केलेल्या सुधारणा ही होय हिंदी लष्करी आफिसर, स. अ. सर्जन व नॉन कमिशन्ड ऑफिसर यांचे पगार वाढवून त्यांच्या पगारांत शें. ३० इतकी भर पडेल अशा दुसऱ्या ही कित्येक सवलती देण्यांत आल्या, व लढाईत मर्दुमकी करून दाखविणारांना इनामी जमीनी ही देण्याचा सरकारचा विचार आहे. हिंदी ऑफिसरांच्या मुलांच्या शिक्षणासाठीं एक स्वतंत्र शाळा ही काढण्यांत येणार आहे शिपायांच्या औषधपाण्याची ही व्यवस्था अधिक चांगली करण्याची योजना सरकारपुढें आहे मेसोपोटेमिया कमिशनच्या रिपोर्टांतल्या कडक टीकेचा हा परिणाम आहे ही गोष्ट सकृद्दर्शनीं कोणाच्याही मनांत येईल. यावरून साधार व निर्भीडपणाच्या टीकेचा परिणाम न होण्याइतकें हिंदुस्थान सरकार निष्ठुर मनाचें नाहीं ही गोष्ट उत्तम प्रकारें व्यक्त होते. मिसेस बिझांट बाईच्या व अटक भोगीत पडलेल्या इतर दुर्दैवी व्यक्तींच्या संबंधानें वर्तमानपत्रांतली टीका ही निष्फळ झाली नाहीं. तिचा ही परिणाम झालेला आह ही अत्यंत समाधानाची गोष्ट ह्मटली पाहिजे. हिंदी संरक्षक सैन्यांत फार थोडे लोक भरती झाले आहेत या बद्दल व्हाइसराय साहेबांनीं खेद प्रदर्शित केला तो वाजवी आहे. पण याही बाबतींत हिंदी पत्रकर्त्यांनीं दाखविलेल्या अडचणीचा योग्य विचार सरकारनें केला असता, तर खेदाची जागा आनंद व अभिनंदन यांनीं पटकाविली असती अशी आमची खात्री आहे. अजून ही सरकार या बाबतींत अधिक उदारपणाचें धोरण स्वीकारील तर ब्रिटिश राज्यासाठीं हवा तेव्हा स्वार्थत्याग करण्यास हिंदी तरुण मागें सरणार नाहींत. सरकारनें हवी तर या बाबतींत लोकांची परीक्षा पहावी असें आह्मी नम्रपणें सुचवितों. हिंदी लोकांना लष्करांत अमलदारीच्या जागा देण्याविषयींची सरकारची साग्र योजना अद्याप प्रसिद्ध व्हावयाची असल्यामुळें या विषयासंबंधानें आज कांहीच लिहितां येत नाहीं. हत्याराच्या कायद्याची लवकरच सुधारणा व्हावयाची आहे व ती करतांना वर्णभेद ठेवण्यांत येणार नाहीं येवढें आश्वासन तूर्त व्हाइसराय साहेब देत आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. पण या कामांत मनस्वी अडचणी आहेत असें जें मोघम विधानें त्यांनीं केल्या आहे त्याचा अर्थ कळत नाहीं. या अडचणी कोणत्या व कोण आणीत आहेत, फ्रान्स, व रशिया सारख्या मित्र राष्ट्रांना आपल्या प्रजेला हत्यारें वापरण्याची परवानगी देतांना ज्या अडचणी वाटत नाहींत त्या ब्रिटिश सरकारला व ज्यांची राजनिष्ठा प्रस्तुत युद्धांत उत्तम प्रकारें कसोटीला उतरली आहे अशा हिंदी प्रजेविषयीं कां वाटाव्या तें कळत नाहीं. नामदार साहेब अशा अडचणीचा विचार करतांना हिंदी पुढाऱ्यांना जर विश्वासांत घेतील व आपल्या भाषणाच्या शेवटीं कौंसिलच्या सभासदांना सरकारी अधिकाऱ्यांशीं गोडी व सहकारिता ठेवण्यांविषयीं जो उपदेश केला आहे तो ते स्वतःच अंमलांत आणतील तर हिंदुस्थानच्या राज्यकारभाराच्या कठीणपणाविषयीं जो बाऊ त्यांना वाटत आहे तो पार नाहींसा होईल अशी आमची खात्री आहे.

---

## इंग्रजी भाषा विरूद्ध देशी भाषा

गेल्या महिन्यांत सिमला येथें भरलेल्या शिक्षण परिषदेच्या बैठकींत हायस्कुलांतल्या इंग्रजी भाषेच्या शिक्षणाचा विचार झाला, तेव्हां तेथें जो मतभेद दिसून आला तो खरोखर आश्चर्यजनक होता. त्या परिषदेचें एकंदर कार्यच आश्चर्यकारक होतें असें ह्मणतां येईल पांच सहा महिन्यापूर्वीं डायरेक्टरांच्या कान्फरन्स पुढें व्हाइसराय साहेबांनीं जें भाषण केलें होतें त्यावरून देशी भाषांच्या द्वारें दिलेलें शिक्षण अधिक फलदायक व यशस्वी होतें अशी त्यांची स्वतःची खात्री झालेली स्पष्ट दिसत होती. पण परवाच्या कान्फरन्समधल्या त्यांच्या भाषणाचा रंग कांहीं निराळा दिसला. हिंदुस्थानांत इंग्रजी भाषेचा प्रचार इतका रूढ झालेला आहे कीं त्या भाषेचें पाऊल मागें टकलणें व्हाइसराय साहेबांना आतां शक्य दिसत नाहीं. हिंदुस्थानांतल्या इंग्रजी भाषा बोलणारांच्या संख्येचें सरकारी रिपोर्टांतले आंकडेच व्हाइसराय साहेबांच्या या विधानाला खोडून काढतील. हिंदुस्थानांत शेंकडा ९ जणांना सुद्धां इंग्रजीचें ज्ञान नाहीं अशी वस्तुस्थिति असतां हिंदुस्थानांत इंग्रजी द्वारें शिक्षण देणेंच त्यांना सोयीचें दिसतें हें आश्चर्य आहे. इंग्रजी भाषेची पीछेहाट होऊं द्यावयाची नाहीं हें सरकारचें धोरण ठरलें आहे. असें ही सांगण्यांत आलें. इंग्रजीची पीछेहाट व्हावी अशी आमची ही इच्छा नाहीं, आणि ह्मणून देशी भाषेच्याद्वारें इतर विषयांचें शिक्षण दिलें तरी इंग्रजी भाषा ही

दुसरी भाषा अवश्यक विषय ह्मणून ठेवावी असें आह्मी ह्मणत आहों. प्रश्न इंग्रजीच्या पिछेहाटीचा नाहीं. शिक्षण प्रसार कोणत्या रीतीनें सुलभ होईल हा आहे. सरकारी-शिक्षणक्रमाच्या बाहेर देशी भाषांची उन्नति करण्याला पुष्कळ मार्ग आहेत असें ही वरील कान्फरन्समध्यें सांगण्यांत आलें व त्याच्या बरोबर हायस्कुलांतल्या मुलांनें इंग्रजीचें ज्ञान वाढविण्याकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे असें ही वारंवार सुचविण्यांत आलें. यावरून देशी भाषेच्या द्वारें शिक्षण देण्याचा प्रयोग करून पाहण्याची सुद्धां सरकारी अधिकाऱ्यांच्या मनाची प्रवृत्ति नाहीं असें स्पष्ट दिसतें आमचा हा समज चुकीचा आहे असें आह्मांस आढळून आलें तर त्यांत आह्मांला आनंदच वाटेल. इंग्रजी भाषेशीं आमचें वैर नाहीं. पण ती भाषा परकी असल्यामुळें शिक्षणाचें माध्यम बनण्यास योग्य नाहीं. तें काम इंग्रजी पेक्षां देशी भाषा अधिक चांगल्या रीतीनें करूं शकतील येवढेंच आमचें ह्मणणें आहे. इंग्रजी शिक्षणाचा प्रसार हिंदुस्थानांत ज्या मंदगतीनें होत आहे ती लक्षांत घेतली असतां हिंदुस्थानांत सार्वत्रिक शिक्षण होण्यास दोन शतकें तरी सहज पाहिजेत. तेंच काम देशी भाषांच्या द्वारें पंनास वर्षांत किंबहुना त्याहून ही कमी काळांत होण्याजोगें असतां देशी भाषांना मागें सारून इंग्रजीचें घोडें पुढें ढकलण्यांत काय अर्थ आहे? तें आह्मांस कळत नाहीं.

## बालमृत्यूंचें भयंकर प्रमाण!

मध्यप्रांत व वऱ्हाड येथील आरोग्यसंबंधाच्या नुकत्या झालेल्या वार्षिक रिपोर्टावरून एक गोष्ट निर्विवाद स्पष्ट होते आणि ती ही कीं या प्रांतांत बालमृत्यूंचें जें भयंकर प्रमाण आहे तसें साऱ्या हिंदुस्थानांत दुसरीकडे कोठेंही नाहीं. जन्मांच्या वार्षिक प्रमाणाशीं हें मृत्यूंचें प्रमाण मिळवून पाहिले ह्मणजे अशीच स्थिति कांहीं वर्षें सतत चालू राहिल्यास समाजाची काय स्थिति होईल त्याची कल्पना करवत नाहीं हल्लीं दर मैलास जन्मांचें प्रमाण २६५ आहे. पण मृत्यूंचें २८१ ह्मणजे १६ नीं ज्यास्त आहे. हिंदुस्थानचें हवापाणी इतर देशांच्या मानानें लोकसंख्येच्या वृद्धीस अनुकूळ असतां जन्मापेक्षां मृत्यूंचें प्रमाण इतकें मोठें असावें यावरून येथील परिस्थितींत कांहीं तरी मोठी गोम खास असली पाहिजे हें उघड आहे. सामाजिक सुधारक बालविवाहाकडे बोट दाखवितात; दुसरे कित्येक स्त्रियांच्या अज्ञानाचें कारण पुढें करतात; आणि कित्येक तर असें ही ह्मणतांना आढळतात कीं हिंदुस्थानच्या लोकांना अर्धपोटीं राहावें लागत असल्यामुळें त्या लोकांचा जीवनरसच निर्बळ झालेला आहे. अर्थात् त्यांची संतति अल्पायुच व्हावयाची यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नाहीं. पण विचार करून पाहतां हीं कारणें सामान्यतः हिंदी लोकांच्या अल्पायुत्वासंबंधानें खरीं असलीं तरी बालमृत्यूंच्या भयंकर प्रमाणाला तीं विशेषशी लागू पडत नाहींत. निदान या प्रांतापुरतें तरी आह्मी असें सांगू शकतों कीं येथें इतर प्रांतांपेक्षां बालविवाहाची संख्या अधिक नाहीं, किंवा येथील लोक ही इतर प्रांतांच्या मानानें पाहतां विशेष दरिद्री नाहींत. तेव्हां बाळंतपणाच्या सशास्त्र पद्धतीविषयींचें अज्ञानांतच या गोष्टीचें मूळ शोधलें पाहिजे असें सरकारी अधिकाऱ्यांप्रमाणेंच आमचेंही मत आहे. बाळंतपणाचें काम करण्यांत कुशल अशा सुईणींची संख्या फारच कमी आहे ही तर गोष्ट खरीच, पण त्या बरोबर हें ही सांगितलें पाहिजे कीं बालकांच्या जन्मानंतर त्यांची जोपासना जशी व्हावयास पाहिजे तशी काळजीपूर्वक होत नाहीं. मुलांचें दुखलें खुपल्यास त्यांना काढ्यामेढ्यांचीं घरगुती औषधें सांगणाऱ्या जुन्या बाया राहिल्या नाहींत, आणि नव्या ह्मणजे पाश्चात्य पद्धतीचीं डाक्तरी औषधें खेड्यापाड्यांतून मिळत नाहींत, किंवा मिळालीं तरी महाग पडतात, व त्यांचा उपयोग करण्याचें ज्ञान ही आयांना नसतें. दिल्लीच्या मेडिकल कॉलेजांतून सुईणी व दाया शिकून बाहेर पडतील आणि त्या खेड्यापाड्यांच्या वाट्याला येऊन त्यांची फी देण्याचे ही सामर्थ्य खेड्यापाड्यांतल्या नांगऱ्यांना येईल तेव्हां कोठें या भयंकर हानीला प्रतिबंध होणार. तोंपर्यंत हा प्रकार किती मर्यादेला जाऊन पोंचेल हें कोणीं सांगावें? यापेक्षां आपल्या जुन्या व अल्पखर्चाच्या पद्धतीनें बाळंतिणीचें बाळंतपण व मुलांचें संगोपन आयुर्वेदोक्त रीतीनें करण्याचें व्यावहारिक शिक्षण देण्याची तजवीज सरकारकडून होत नसल्यास समाजाकडूनच खुद्द कां होऊं नये?

## हा पक्षपात नव्हे काय?

मॉडर्न रिव्ह्यूच्या सप्तेंबरच्या अंकांत या विषयावर एक साधार व सप्रमाण लेख प्रसिद्ध झालेला आहे, आणि त्यावरून हिंदुस्थानांत रेल्वे राष्ट्रीय होण्याची—सरकारनें स्वतःच्या व्यवस्थेखालीं त्या चालविण्याची—किती मोठी अवश्यकता आहे तें दिसून येईल. रेल्वे कंपन्या फर्स्ट व सेकंड क्लासच्या उतारूंच्या सोयी जशा पाहातात त्याच्या शतांश ही तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या अडचणींचा विचार करीत नाहींत. यांत केवळ व्यापारीदृष्टि असती—जो अधिक पैसा देईल त्याच्याकडे अधिक लक्ष—तर तें एकवेळ क्षम्य होतें; पण कंपन्यांच्या कारभारांत तीही दृष्टी नाहीं. १९१५-१६ सालच्या रेल्वे रिपोर्टांतले आंकडे स्पष्ट सांगतात कीं रेल्वेच्या ६० कोटि ४२ लक्ष रुपये उत्पन्नापैकीं तिसऱ्या वर्गाच्या उतारूंनीं १९ कोटि १७ लक्ष रु. दिले आणि फर्स्ट व सेकंड क्लासवाल्यांनीं फक्त १ कोटी ६० लाख दिले! गेल्या वर्षापासून बहुतेक सगळ्या रेल्वे कंपन्यांनीं कोळशाचा पुरवठा होत नाहीं, या सबबीवर गाड्यांची संख्या कमी केल्यामुळें तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे हाल मनस्वी होऊं लागले आहेत. पण अशावेळीं जी. आय. पी. रेल्वे कंपनीला पुणें आणि मुंबई यांचे दरम्यान रेस-स्पेशल (निवळ पहिल्या व दुसऱ्या वर्गाच्या उतारूंची) काढण्यास मात्र कोळशाची अडचण आड येत नाहीं. रेल्वे कंपन्यांत हलक्या पगाराच्या खालच्या दर्जाच्या नोकरांची संख्या फार मोठी असते व या जागी सगळे हिंदी लोक असतात. वरच्या दर्जाच्या जागीं युरोपीयन असून या जागांचें प्रमाण शें. ३ ही नसतें. तरी पण आपल्या नौकरांच्या मुलांसाठीं कंपन्यांनीं ज्या शाळा ठेविल्या आहेत त्यांचें प्रमाण एकंदर २६६ शाळांपैकीं १०१ युरोपियनांसाठीं असें आहे! हिंदी लोकांसाठीं धंदे शिक्षणाच्या सोयी निराळ्या, व युरोपियनांसाठीं निराळ्या केल्या आहेत. याचः परिणाम असा झाला आहे कीं कंपन्यांच्या ३ लक्ष हिंदी नोकरांपैकीं फक्त १७ हजारांना तो फायदा मिळाला, आणि तोच १७ हजार युरोपियनांपैकीं ४॥ हजारांना मिळाला! खर्चाच्या बाबतींत ही असाच प्रकार आढळतो. रेल्वेशाळांच्या मदतीकरिता सरकारनें जी ग्रांट दिली ती पाहतां प्रत्येक हिंदी विद्यार्थ्याकरितां २ रुपये व प्रत्येक युरोपियन विद्यार्थ्यासाठीं २४ रु० याप्रमाणें सरकारच्या खर्चाचें प्रमाण पडतें! एन. डब्ल्यु रेल्वेनें युरोपियनासाठीं २ व हिंदी मुलांकरितां २६ शाळा काढल्या आहेत. पण या २६ शाळांना सरकार मुळींच मदत करित नाहीं, आणि २ युरोपियन शाळांना मात्र ४॥ हजार रु० देतें. अशा शेकडों गोष्टी दाखवितां येतील. रेल्वे राष्ट्रीय झाल्यानें अशा बऱ्याचशा पक्षपाताला थोडा बहुत तरी आळा पडेल. ह्मणून या संबंधांत चळवळीची फार अवश्यकता आहे. कांग्रेससारख्या राजकीय संस्थांनीं ही चळवळ चालविली पाहिजे, तर कांहीं कार्य होईल.

## राजहंस

(मुधोळकरांची आत्मशक्ती)

रावबहादुर मुधोळकर हे गेल्या २ तारखेला प्रांतिक काँग्रेस कमीटीपुढें बोलले, तेव्हाचा त्यांचा तो प्रेमळ उपदेश कधींही विसरला जाणार नाहीं. तरुण पिढीच्या आकांक्षांबरोबर किंबहुना अधिक उच्च यांच्या मनाच्या भराऱ्या दिसून आल्या. यशःश्री संपादण्यासाठीं केलेले आज गेल्या ३० वर्षांचे त्यांचे उद्योग इतके फलोन्मुख होत आहेत हें पाहून त्यांच्या नेत्रांत आनंदाश्रू देखील दाटून आले. त्यांनीं तरुण मंडळीचा सत्याग्रह व त्यांच्या मनाचा विकास हीं पाहून जो आशीर्वाद दिला तो त्यांच्या तपःसामर्थ्यामुळेंच अर्थवान् झाल्याशिवाय राहणार नाहीं. रावबहादुर तात्यासाहेब हे आपल्या विचारसरोवरांत इतकें निमग्न दिसले कीं मुंबईच्या सभेंत सर चंदावरकर यांनीं सत्याग्रहाच्या बाबतींत जी उत्कृष्ट दिशा घालवून दिली त्या पेक्षां कितीतरी उच्च उदार व सत्वशील असें उड्डाण आमच्या प्रांतिक राजहंसाचें होतें. राजश्री मॉंटेग यांनीं या नेमस्त ह्मणून संबोधलेल्या वऱ्हाडच्या तेजस्वी मुत्सद्याचे विचार जरूर ध्यानांत घ्यावे.

## राष्ट्रवीर.

(महमदअलींचा भावी बहुमान)

रा. रा. महमुद अली हे सध्या छिंदवाडा येथें राजकीय अटकेंत आहेत, पण त्यांसच त्यांच्या सर्वोत्कृष्ट लोकसेवेबद्दल येत्या ऑल इंडिया मास्लेम लीगचे अध्यक्ष नेमावे ह्मणून नामदार राजश्री मझरुल हक व मुखत्यार अहमद अनसरी यांनीं निरनिराळ्या उपसंस्थांना जोराची सूचना केलेली आहे. मुसलमान बंधूंचें हृदय सांगणारा आणि त्यांची लोकसत्ता खरी प्रस्थापित करण्याला राजश्री महमद अली हेच खरे राष्ट्रवीर आहेत असाच सर्वतोमुखीं अनुवाद ऐकूं येतो. राष्ट्रीय सभेचें जसें अध्यक्षस्थान श्रीमती बिझांट देवी या अलंकृत करितील तशीच ही दुसरी योजना लोकादरास पात्र ठरेल असा आह्मास भरंवसा वाटतो.

## अस्त्रसिद्धी.

(सत्याग्रहाविषयीं वऱ्हाडची अनुकूलता.)

वऱ्हाडच्या प्रांतिक कांग्रेस कमिटीची सभा रविवारीं ह्मणजे गेल्या २ तारखेस उमरावतीस नामदार राजश्री श्रीपाद बळवंत तांबे यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेपुढें एकच विषय निःशस्त्र प्रतिकार उर्फ सत्याग्रह हा होता. प्रस्तुतच्या राजकीय स्थितीला हा उपाय कितपत उपयोगांत आणावा या संबंधाचा अभिप्राय ऑल इंडिया कांग्रेस कमीटीला कळविण्यासाठीं ही प्रांतिक सभा भरली होती. या प्रश्नाचें चर्वण इतक्या बहुविध बाजूंनीं झालेलें आहे कीं त्यासंबंधांत आतां नव्य असा कांहीं विचार मांडण्यासारखा उरलेला नाहीं. यावेळीं आमच्या प्रांताचे मुख्य मुत्सद्दी यांनीं हा प्रश्न सध्या तहकूब ठेवावा ह्मणून उपसूचना आणली होती. पण ती उपसूचना सभेपुढें मांडतांना त्यांनीं जे सर्वोत्कृष्ट विचार निस्पृहपणानें व मोठ्या कळकळीनें प्रदर्शित केले तसे विचार सत्याग्रहाच्या थोर भक्ताच्या तोंडून किंवा स्वराज्यसंघाच्या श्रेष्ठ पुढाऱ्याच्या तोंडून देखील इतक्या वेगानें व निर्वाणीच्या प्रसंगानें क्वचित्च ऐकण्यास मिळतील. त्यांची उपसूचना नामंजूर झाली तरी देखील सभेनें जो ठराव पास केला तो त्यांच्याच प्रोत्साहनानें व दूरदर्शी दृष्टीनें अलंकृत झालेला आहे.

"प्रस्तुतची राजकीय स्थिती सत्याग्रह हातीं घेण्यासारखी बिकट झालेली आहे, तेव्हां नॅशनल कांग्रेस व मॉस्लेम लीग या दोन्ही संस्था स्वतां किंवा दुसऱ्या कोणत्याही संस्थाच्या द्वारानें जेव्हां जेवढा व जितका सत्याग्रह स्वीकारण्यास आज्ञा करितील तेव्हां त्या मानानें या उपायाचा अंगिकार करण्यांत येईल."

हा ठराव अखेर पसंत ठरून वर धाडण्याचा निश्चय ठरला.

## तहासाठीं यत्न,

ख्रिस्ती जगद्गुरु हे आपल्या धार्मिक कर्तव्यास जागृत राहून पृथ्वीवर शांति नांदत राहावी यासाठीं मधून मधून राष्ट्रीय प्रार्थना वगैरे करवीत असतात, पण सध्याच्या नास्तिकवादाच्या काळांत प्रार्थनेच्या सफलतेविषयीं लोकांची खात्री पटत नाहीं. प्रत्यक्ष पोप महाराजांनीं मध्यस्थी करण्याचा यत्न केला तरी त्या यत्नाला यश येत नाहीं, मग प्रार्थनेच्या नुसत्या शद्बाला लोकांच्या दृष्टीनें कांहीं किंमत नसल्याचें काय आश्चर्य! पोप महाराजांचे उद्देश स्तुत्य असले तरी जोंपर्यंत जर्मनीचा कुरा कायम आहे आणि

बायबलांतल्या नीतिवाक्यापेक्षां हातांतल्या शस्त्रावर त्याची अधिक श्रद्धा आहे, तोंपर्यंत जगांतलीं चार पंचमांश राष्ट्रें जर्मनीच्या विरुद्ध राहून त्याचा नक्षा उतरण्याची संधी हातची वाया जाऊं देणार नाहींत, व आत्मरक्षणासाठीं व क्षत्रियधर्माचे रक्षणासाठीं तसे सज्ज राहणें त्यांना अवश्य आहे. अशा ठिकाणीं जगद्गुरूच्या सात्विकपणाच्या इच्छांचा काय उपयोग होणार ?

## शाबास! बडोदें शाबास!

हिंदुस्थानांत प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करण्याचा धडा प्रथम घालून देण्याचा मान बडोदें संस्थानानें मिळविलेला आहे. पण या मानावर तृप्त न राहतां शिक्षणप्रसाररूपीं सोपानाची आणखी एक पायरी चढण्याचा त्या संस्थानचा विचार दिसतो. लवकरच तेथें होणाऱ्या कायदेकौंसिलाच्या बैठकीपुढें एक लोकनियुक्त मेंबर असा ठराव आणणार आहेत कीं सरकारनें दुय्यम प्रतीचे ह्मणजे हायस्कुलांतलें शिक्षण ही सक्तीचें करावें! असा ठराव कौंसिलापुढें आणिला गेला तरी तो लागलीच पास होतो असा नियम नाहीं; आणि पुरा विचार केल्याशिवाय येवढी महत्त्वाची गोष्ट निकालांत काढणें वाजवी ही होणार नाहीं. तथापि बडोदें संस्थानांतल्या लोकांना प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारामुळें शिक्षणाची कशी गोडी लागली आहे तेवढें दाखविण्यास पुरेसें प्रमाण या ठरावानें दिलें आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

## औद्योगिक शिक्षण व पुस्तकी शिक्षण.

हायस्कुलांतल्या शिक्षणाचें हल्लींचें स्वरूप पुष्कळसें पालटल्याशिवाय ह्मणजे त्यांत जें पुस्तकी शिक्षण मिळतें त्यांत औद्योगिक शिक्षणाचा बराच मोठा डोज मिळविल्याशिवाय दुय्यम प्रतीचें शिक्षण सक्तीचें करण्यापासून हितापेक्षां नुकसानच अधिक होईल असें आमचें प्रामाणिकपणाचें मत आहे. सध्याच हायस्कुलांतला अभ्यासक्रम संपवून म्याट्रिक किंवा स्कूल फायनल परीक्षा पास झालेले नोकरीसाठीं वणवण फिरतांना दिसतात. त्यांना नौकरीवांचून गत्यंतर नसतें. कारण, पोटाचा कोणताही धंदा त्यांना शिकविलेला नसतो, आणि म्याट्रिकचें किंवा स्कूलफायनलचें शिक्षण त्याच्या कांहीं उपयोगीं पडत नाहीं. ट्रामड्रायव्हर, किंवा गिरणींतला मजूर त्याच्यापेक्षां शतपटीनें बरा ह्मणविला जातो. व्यवहारांत जें शिक्षण इतकें निरुपयोगी ठरतें तें सक्तीचें केल्यावर सध्याची स्थिति किती पटीनें असह्य व दुःखद होईल याची कल्पनाच केली पाहिजे. केवळ पुस्तकी विद्येवर सगळा भार टाकल्यानें ही स्थिति प्राप्त झालेली आहे. अजून डोळे उघडून सरकार नीट पाहतील व पुस्तकी विद्येचा बराच अंश कमी करून पोटाच्या व्यवसायाचें शिक्षण तरुणांना देण्याची कांहीं तजवीज करतील तर लोकांची धडगत आहे. पण हायस्कुलें अद्याप ओस पडूं लागलीं नाहींत यावरून लोकांचा भ्रम अद्याप ओसरला नाहीं असें ह्मटलें पाहिजे. खाजगी हायस्कुलें काढतांना शिक्षणाच्या प्रश्नाची बाजू आजिबात लोक कसे विसरतात राम जाणे !

## स्वराज्य आणि मद्यपान.

देशी संस्थानांतली राज्यपद्धति ह्मणजे खरोखर कांहीं स्वराज्यपद्धति नव्हे. तेथें देशी अधिकारी प्रत्येक खात्यावर मुख्य असतो येवढी स्वराज्याची छाया फार तर तेथें असते. पण तेवढ्यांतच किती तरी काम करतां येतें ! इंदुरच्या मल्हारीमार्तंड विजय पत्रावरून कळतें कीं इंदूरचें अबकारी खातें इतर ठिकाणच्या आपल्या गोत्रजांहून अगदींच निराळ्या प्रकारचें आहे. मद्यपाननिषेधक सभेचें काम तें स्वतःच करीत आहे! त्या खात्यावरचे मुख्य मंत्री सरदार राव बहादूर माधवराव किबे यांनीं गुत्त्याची संख्या कमी केली, परवान्यावरची फी वाढविली, जकात वाढविली, आणि आतां एके ठिकाणीं जेथें चोरून दारू गाळली जाते कीं काय अशी शंका वाटत आहे तेथें मद्यप्याची खानेसुमारी करून त्यांचें राजिष्टर ठेवण्याची व त्यांना रोज नियमित प्रमाणांतच दारू विकण्यांत येईल अशी तजवीज करण्याचें घाटत आहे! मद्यपान कमी करण्याची खरोखर ही नामी युक्ति आहे. मद्यप्यांत आपलें नांव नोंदण्यास ही ज्यांना शरम वाटणार नाहीं असें कांहीं नीतिधैर्याचे पुतळे निघणार नाहींत असें आह्मी ह्मणत नाहीं, पण एकंदरीनें कमीच. सारांश, आमचे हातीं स्वराज्याचे अधिकार आल्यावर आमच्यांतल्या सरदार किंव्हा सारख्या एखाद्या अधिकाऱ्याला आळा घालण्याच्या पुष्कळ युक्त्या अंमलांत आणून दाखवितां येतील.

## लोक शिक्षण.

( पश्चिम वऱ्हाडांतील पुढाऱ्यांचा संघटित प्रयत्न. )

अंक नंबर ३४ वरून पुढें चालूं.

रा. नामदेवराव पाटील आकोला ह्मणाले:-- आपली खरी नड काय आहे त्याचा विचार करा शाळेंत शिरकाव होऊं शकत नाहीं असे विद्यार्थी किती आहेत. येथल्या म्युनिसिपल ए. व्ही. स्कूलमध्यें अजून ५० मुलांस जागा आहे. मुलांस कायदेशीर असे शिक्षण हल्लींच्या संस्थांतून मिळत नाहीं. आमच्या मराठाशिक्षण समाजांत हल्लीं पूर्वी इतकीं सुद्धां मुलें येत नाहींत. कोणी मदत मागण्यासही येत नाहींत त्याचा विचार करा. खेड्यांतील मुलांना उपयुक्त शिक्षण देण्याची सोय करा. बौद्धिक शिक्षण सर्वांच्या उपयोगी पडत नाहीं. आपल्या गरजा काय आहेत त्या सरकारास कळवा. ह्या साठीं एक पोट कमिटी नेमावी.

ह्या नंतर रा. दादा कोरडे मुर्तिजापूर ह्मणाले कीं येथें जमलेल्या वजनदार व व्यवहार कुशल लोकांस कांहींही कठीण नाहीं त्यांनीं आपलें धोरण स्वीकारण्यास सरकारास भाग पाडावें व ज्यापासून खरा उपयोग होईल असें शिक्षण देण्याची तरतूद करावी.

ह्यानंतर आकोल्याचे रा. बापुसाहेब फडके ह्मणाले सरकार व लोक एकच आहेत. आपल्याच पैशानें ओझ्याच्या ओझीं पगार देऊन नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या सल्ल्याचा फायदा आपणांस घेतां येऊं नये व त्यांनीं आजच्या सभेस हजर नसावें हें आपलें दुर्दैव आहे. आपण खाजगी रितीनें कांहीं ही करूं नये. सरकार लोकांहून वेगळे नाहींत ही गोष्ट कै. ना. गोखले ह्यांनीं ओळखली होती व ह्मणूनच त्यांनीं अखेरपर्यंत सरकारचा पिच्छा पुरवला. आपण जरी व्यक्तिशः गरीब असलों तरी आपली भूमाता आपल्या शिक्षणाकरितां पैसा खास पुरवील सरकारनें पाहिजे तर जमीन महसूल दुप्पट करावा पण आह्मांस सर्वांगसुंदर शिक्षण द्यावें. खामगांवचे रा. चांदे बोलल्यानंतर बुलढाण्याचे रा. पुरुषोत्तमपंत दामले ह्मणाले मेरेपर्यंत ४०|५० रुपये पगाराच्या जागा मिळविता येण्यास कांहीं सरकारी अभ्यासक्रमाचीच जरूर आहे असें नाहीं सरकारी अभ्यासक्रम सर्वांस उपयोगीं नाहीं. येथें कांच व साबण याचे धंदे निघण्यासारखे आहेत अशी माहिती कांहीं वर्षांपूर्वी ऐकली होती. धंदेशिक्षण देण्यास सुरवात केली पाहिजे. सर्व गोष्टीचा विचार करण्यास एक कमिटी नेमावी.

अखेरीस सर्वानुमतें खालील गृहस्थांची एक पोट कमिटी नेमण्यांत आली.

| | | |
|---|---|---|
| १ | रा. ब. बापट | बुलडाणा. |
| २ | पी. एम्. दामले | बुलडाणा. |
| ३ | आर. डब्ल्यू कानिटकर | बुलडाणा. |
| ४ | दादा पिंपळीकर | मलकापूर |
| ५ | लक्ष्मणराव दाहिहांडेकर | कारंजा |
| ६ | रा. ब. दामले | |
| ७ | ना. का दाते | |
| ८ | रा. ब. महाजनी | |
| ९ | रा. सा. महाजनी | |
| १० | रा. आठल्ये | |
| ११ | रा. ब. भागवत | |
| १२ | चिपळूणकर | |
| १३ | अभ्यंकर | |
| १४ | श्रीराम सुरजमल | |
| १५ | चवरे | |
| १६ | अणेकर | खामगांव |
| १७ | देऊळघाटचे नबाब खा. ब. सल्लामुल्लाखा | |
| १८ | रा. ब. केशवराव देशमुख | खामगांव |
| १९ | जी. ही. सावजी | मलकापूर |
| २० | गोपाळराव रेठे | आकोला |
| २१ | नामदेवराव पाटील | |
| २२ | काळे | मेहेकर |
| २३ | रामेकर | आकोट |
| २४ | एस. ए. देशपांडे | आडगांव |
| २५ | व्ही. व्ही. गोखले | |
| २६ | बापूसाहेब फडके | आकोला |

ह्या मंडळींना आपल्यांत आणखी इतर योग्य लोकांचा समावेश करण्याचा अधिकार देण्यांत आला. अध्यक्षांनीं सर्व लोकांचे त्यांनीं घेतलेल्या त्रासाबद्दल आभार मानल्यावर रा. आप्पासाहेब ओक आकोला ह्यांनीं अध्यक्षांस्थानीं सभेचें काम उत्तम रीतीनें पारपाडल्याबद्दल त्यांचे आभार मानल्यावर सभेचें काम समाप्त झालें.

सदर कमिटीनें शिक्षणविषयक प्रश्नाचा सर्व बाजूनें विचार करून दोन महिन्यांत एक रिपोर्ट तयार करावा असें ठरलें असून सदर कमिटीचे चिटणीसाचे जागीं रा. अनंत सखाराम आठल्ये व शिवराम पांडुरंग अभ्यंकर आकोला या दोघांचा नेमणूक करण्यांत आली आहे.

## महायुद्धाची प्रगति.

हल्लीं सर्वांचें लक्ष रशियाच्या राजकीय स्थितीकडे लागलें आहे. रशियामध्यें राज्यक्रांति होऊन झारच्या जुलमाची इतिश्री होऊन लोकसत्तेच्या अभिवृद्धीचीं लक्षणें दिसूं लागलीं तेव्हां सर्वांकडून अभिनंदनपर उद्गार निघाले, पण ते अकाली होते कीं काय असें आतां वाटूं लागलें आहे. रशियाच्या स्थितीचा युद्धावरच नव्हे तर साऱ्या जगावर विलक्षण परिणाम घडावयाचा आहे. रिगातर शत्रूला मिळालेंच; आतां पेट्रोग्राडमधून आपण विजयश्रीच्या थाटानें मिरवित चाललों आहों अशीं सुखस्वप्नें ही केसरला पडूं लागलीं असलीं तर नवल नाहीं. रशियन सेनापतीचें काम अत्यंत संकटमय झालेलें आहे. सैन्यांत फितुरी आणि असंतोष, आणि देशांत नवीन भरती होण्याची पडणारी अडचण यामुळें त्याला आहे तें सैन्य सोडतां येत नाहीं, आणि नवे ठेवतां येत नाहीं. रिगावर इतके दिवस चालून न जातां थांबण्याचें कारण रशिया आपली हल्लींची विचित्र स्थिति जाणून स्वतंत्र तह करण्यास कबूल होईल अशी जर्मनीला आशा वाटत होती, पण मॉ० केरेंझस्की यांच्या हातांत सत्ता आहे तोंपर्यंत हे शक्य किंवा संभवनीय दिसेना. ह्मणून केरेंझस्कीच्या विरुद्ध कारस्थानें करून पाहिलीं पण तीं निष्फळ झालीं व अजून ही स्वतंत्र तहाचें नांव काढण्याची सोय नाहीं ही गोष्ट मित्रराष्ट्रांना मोठी उत्तेजन देणारी आहे यांत शंका नाहीं.

## जर्मनीची अंतःस्थिति.

इकडे रशियाची ही अशी अंतःस्थिति असतां तिकडे जर्मनींत कांहीं विचित्र प्रकार आहे असें दिसून येईल. डा० मायकेलीस बाहेरून तर असें प्रतिज्ञेवर सांगत आहेत कीं जर्मनी सोक्ष कीं मोक्ष युद्धानेंच करून घेईल. पण त्याचवेळीं तहाच्या कोणत्या अटी आपणास ज्यास्त अनुकूळ होतील त्यांकडे बारीक नजर ठेवून त्यांचा प्रसार होईल तितका करण्याची त्याची खटपट चाललीच आहे. जर्मनींत युद्धाविषयींच्या लोकांच्या तेजस्वीतेला ओहोटी लागूं नये ह्मणून देशाभिमानाच्या पुराची भरतींत टाकण्यासाठीं तरुणांची एक टोळी निर्माण करण्यांत आली आहे पण युद्धाविषयींची लोकांची उत्सुकता कायम ठेवण्याला अशा कृत्रिम उपायांची उवश्यकता उत्पन्न झाली आहे हीच गोष्ट जर्मनीच्या विरुद्ध चहाड्या सांगणारी आहे. तह करण्याविषयीं आस्ट्रियाकडून जर्मनीवर तगादे सारखे येतच आहेत. लोकांना खाद्य पदार्थांची अडचण तीव्रतेनें भासूं लागली आहे. सारांश, ऊपरसे खूब बनी, अंदरकी केसर जाने अशी जर्मनीची खरी स्थिति आहे.

## मित्रराष्ट्रांवर परिणाम.

रशियाची बिघडलेली लष्करी शिस्त अथवा शिस्तीचा अभाव, लोकांमध्यें वाढत चाललेली देशाच्या हिताविषयींची बेपर्वाई,

जर्मन कारस्थानांना मिळालेला वाव इ० गोष्टींनीं मित्रराष्ट्रांनीं तयार करून ठेविलेल्या पुढच्या बेतावर एकाएकीं पाणी ओतलें. रुमानियाला एकट्याला म्याकेनसनच्या हल्ल्याचा भार सहन करावा लागला, आणि त्यांनीं तो फार उत्तम रीतीनें आतांपर्यंत सहन केला आहे हें त्यांना खरोखर भूषणावह आहे. ब्रिटिश, फ्रेंच व इटालियन यांनीं केलेल्या चढाईचा पूर्ण फायदा त्या त्या राष्ट्रांना न मिळतां लढाई मात्र लांबली हा दुसरा परिणाम होय. तिसरी गोष्ट शत्रूला पूर्व रणांगणांत सडकून रीतीनें विजय मिळाल्यामुळें या युद्धाचा अखेर निकाल पूर्व रणक्षेत्रावरच लागेल अशी शत्रूची समजूत होउन बसली आहे, आणि जर्मन लोकांच्या सध्याच्या बढाया त्याच समजुती वर चालल्या आहेत.

## पश्चिम रणक्षेत्रांत.

ब्रिटिश हद्दीच्या मर्यादा पुढें पुढें ढकलल्या जात आहेत पण त्यांची गति मंद आहे. हार्गिकोर्टपाशीं ब्रिटिशांचा जय होऊन ६०० यार्ड लांबीचा खंदक व ५२ कैदी इंग्रजांनीं हस्तगत केले; शिवाय सेंट ज्युलिएनकडे ही इंग्रजांचें पाउल पुढें पडलें आहे. म्युजनदीच्या दोन्ही तीरांवर तोफखान्याचा भडिमार सुरू आहे. आक्रमण प्रत्याक्रमण सुरू आहेत. चौमच्या जंगलांत झालेल्या लढाईंत फ्रेंचांना जय मिळून ५०० शत्रु कैद केले गेले.

## इतर बातम्या.

तह घडवून आणण्याकरितां आस्ट्रियाकडून जर्मनीवर आणतां येईल तेवढें वजन आणण्यांत येत आहे. इतकें ही करून जर्मनी तह न करील तर आस्ट्रिया तो करण्यास कबूल होईल असा रंग दिसतो.

आर्जेंटाईनच्या दरबारांत असलेल्या जर्मन वकीलानें तेथील सगळ्या जहाजांचा नाश करण्याचा घाट सुचविला होता, व त्याच प्रमाणें स्वीडनची राजधानी स्टॉकहोम येथील परराष्ट्रीय खात्यानें जर्मन सरकारच्या तारा आपल्या स्वतःच्या म्हणून पाठवून जर्मनीला आज ३ वर्षेंपर्यंत मदत चालविली आहे, या गोष्टी आतां बाहेर आल्यापासून अमेरिकेंत व इंग्लंडांत मोठी गडबड उडाली आहे.

पोलांडमध्यें तीन मेंबरांचें कौंसिल ऑफ रीजन्सी स्थापून तेथील राज्यकारभार चालवावा याविषयीं जर्मनी व आस्ट्रियांत यांच्यांत एकमत झालें आहे.

अमेरिकेनें पोपला तहाच्या संबंधांत दिलेला जबाब पसंत करून इंग्लंडनें असें ठरलें आहे कीं आपण ही असाच बहुतेक जबाब दिला आहे.

## रावणशाही

( पंजाबी वृषभशक्ती )

गेल्या गुरुवारच्या सिमला येथील वरिष्ठ कायदे कौंसिलांत सर मायकेल ओडायर लेफ्टनंट गव्हर्नर पंजाब यांनीं एक कलहज्वाला प्रसृत करणारा शाब्दिक बाँम फेकून दिला. असें उपमर्दानें भाषण कायदे कौंसिलांत या पूर्वीं क्वचितच ऐकू आलें असेल आठच दिवसापूर्वीं लॉर्ड चेम्सफर्ड यांनीं शांतिपाठ झटला आणि त्या शांतिपाठाचा हा अंतिम अनुवाक् सर ओडायर यांनीं गेल्या १८ व्या तारखेला सुरुंगाच्या स्फोटाप्रमाणें उडवून दिला आहे. सामान्य संप्रदाय झुगारून देण्यांत आले आणि या भाषणांमध्यें लोकांनीच वृत्ती काय तर तेथील सभासदांच्या वृत्ती देखील चिथवून देण्यासारखा सर्व भाषणाचा ओघ होता. सर मायकेल ओडायर हे वृद्ध आंग्ल-पुंगव आहेत झणून कदाचित त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला होणार नाहीं. पण पंजाबची तोफ उडावितांना व तेथील शांततेचे गोडवे गातांना, आणि तेथील राजभक्तीचा गौरव करतांना सर ओडायर हे इतर प्रांतांवर इतके घसरले कीं हल्लींच्या राजकीय चळवळवाल्यांना त्यांनीं राजद्रोही व राज्यक्रांती करून सोडणारे लोक आणि हल्लींचा स्वराज्यवाद म्हणजे लोकांच्या आत्मिक शक्तीचा विकास नसून तलवार, बंदूक व बॉम्ब यांच्या ऐवजीं ही गुप्त राजद्रोहाची ज्वाला होय इ. इ. विचाराचे अग्नितुषार उडविले. असे जेथें विचाराचे तारे तुटतात तेथें त्या वृषभ शक्तीपुढें आत्मशक्तीचा विकास सांगणाऱ्या होमरूलवाल्यांनीं मौनव्रत धरावें हेंच बरें !

## नाटकी वातावरण.

( व्यूह ढासळला. )

गेल्या अंकीं आम्ही लिहिलें होतें कीं येथील हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनीं आपल्या सभोंवती नाटकी वातावरण उत्पन्न करूं नये. कां कीं तें त्यांच्या कोमल बुद्धीच्या वाढीला नैतिकदृष्ट्या ब्रह्मचर्याश्रमांत मोठें अपायकारक आहे. हायस्कूलच्या विद्यार्थ्यांमध्यें नाटक करण्याची कल्पना अशी आली कीं एखादें नाटक रंगभूमीवर आणावें आणि त्याच्या उत्पन्नांतून युद्ध फंडाला मदत यावी. ही गोष्ट येथील थोर थोर लोकांनीं केलेल्या नाटक प्रयोगावरून उचलली असली पाहिजे. आणि त्यांनीं राजश्री नानासाहेब डांगे हेड मास्तर यांची प्रयोग करण्याविषयीं परवानगी मागितली व पालकांची मंजुरात आणण्याविषयीं त्यांनीं शर्त घातली. तेव्हां तशी मंजुरात न मिळाल्यामुळें नाटकाचा व्यूह आरंभींच ढासळला हें कळविण्यास आनंद वाटतो. राजश्री डांगे हे दूरदर्शी आहेत आणि त्यांची विद्यार्थ्यांविषयींची कळकळ फार नमूद आहे. तेव्हां त्यांनीं या कामीं विद्यार्थ्यांच्या पालकांचा बहुमान राखला व विद्याखात्याची शिस्त अधिक उच्चतर नेऊन ठेवली ही मोठ्या संतोषाची गोष्ट होय.

## जठार जिमखाना.

ता० ९-९-१९१७ रोजीं रविवारीं अकोट येथील जठार जिमखान्याच्या प्रवेश समारंभ आपले लोकप्रिय डे० क० मे० जठार साहेब यांचे हस्तें मोठ्या थाटमाटानें करण्यांत आला.

ते दिवशीं सूर्यदेवांच मेघराजाची भरपूर कृपा असतांही संस्थेच्या मालकीच्या नवीन तयार झालेल्या टुमदार व नमुनेदार बंगल्यानजीकची सर्व जागा उत्साहपूर्ण चेहऱ्यांनीं फुललेली दिसत होती. ठीक ८-३० वाजतां जठार साहेबांची स्वारी प्रसंगाकरितां मुद्दाम उभारून सजविलेल्या मंडपांत दाखल होतांच संगीताच्या मधुर ध्वनींत कार्यक्रमास सुरवात झाली. रा. रामेकर वकील यांच्या समयोचित अशा स्वागतपर चार शब्दानंतर येथील प्रेमळ व मनमिळाऊ मुन्सफ रा. बापूसाहेब गोखले यांनीं आपली विद्वत्ताप्रचुर व सर्वांग परिपूर्ण अहवाल इंग्रजींत वाचून दाखवून संस्थेची इत्थंभूत हकीकत सांगून हल्लींची परिणतावस्था तिला कशी प्राप्त झाली व हल्लींचें स्वरूप प्राप्त करून देण्यांत कोणा कसकसे परिश्रम केले ते विषद करून आश्रयदात्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. रा. करकरे वकील यांनीं याच अहवालाचा मराठींत अनुवाद केला नंतर मे. जठार साहेब ह्यांनीं आपल्या अधिकारपूर्ण वाणीनें मातृभाषेंतच असल्या संस्थांचें महत्व व उपयुक्तता सर्वांच्या नजरेस आणून दिली त्यांचें भाषण सर्वांनींच पण विशेषतः अधिकारी लोकांनीं मनन करण्यासारखें होतें. या नंतर इमारतीचा मे. जठारसाहेब यांचे हस्तें प्रवेश-समारंभ साजरा करण्यांत येऊन ते पुन्हा स्थानापन्न झाल्यावर रा. विरणीकर वकील यांनीं आपल्या गोड आणि काव्यमय भाषेंत उपसंहार करून सर्वांचे आभार मानले. नंतर पानसुपारी अत्तर गुलाब देण्यांत येऊन सकाळचा कार्यक्रम आटपला.

दुपारीं सभासदांचा फोटो घेण्यांत आला. व मे. जठारसाहेबांस संस्थेतर्फे बडी मेजवानी देण्यांत येऊन हा थाटाचा समारंभ पार पडला.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**— उत्तरा फाल्गुनीचा पर्जन्य या सप्ताहांत ३.१४ इंच झाला. एकंदर पाणी २२ इंचापर्यंत पडलें. पिकांच्या वाढीला खुली हवा आणि सूर्यप्रकाश यांची सध्या फार जरूरी आहे. कालच्या अमावास्येनंतर वातावरणांत अनुकूल फरक दृष्टीस पडतील असा रंग दिसतो

**पुण्यतिथीः**— शेगांवचे कैलासवासी अवलिया श्री गणपती बुवा यांची पुण्यतिथी येत्या शुक्रवारीं ऋषि पंचमीच्या दिवशीं आहे आणि त्या निमित्त शेगांव येथें यंदाचा ७ वा वार्षिक उत्सव व्हावयाचा आहे. या यात्रेला ४।५ हजार लोक जमतात, तेव्हां स्वराज्य संघवाल्यांनीं या मोठ्या समुदायाचा फायदा घेऊन आपल्या राजकीय व्रताची दीक्षा जनसमुहास देण्याची संधी दवडूं नये.

**पशुवधः**— जीवरक्षा ज्ञान प्रसारक मंडळीचे मुरबाड जिल्हा ठाणा येथील सेक्रेटरी सर्व वर्तमान पत्रकर्त्यांना प्रश्न करीत आहेत कीं देव, देवी किंवा धर्म यांच्या नांवाखालीं यज्ञयागासाठीं किंवा नवसासाठीं जो पशुवध करण्याचा प्रचार चालू आहे, तो शास्त्राला धरून आहे किंवा निंद्य आहे या संबंधाचा अभिप्राय सर्वत्र प्रसिद्ध होणें फार अगत्याचें झालें आहे. कोणतें ही धर्मशास्त्र पशुवध पसंत करणार नाहीं. पण मनुष्य चांगल्या उन्नतीला पोंचेपर्यंत व त्याची नीतिदृष्टी अधिक उज्वल होईपर्यंत या प्रश्नाचा निकाल कागदी लेखानें होण्यासारखा नाहीं. प्रस्तुतच्या लढाईंत माणसें पशुसारखीं मरत आहेत तेथें या युद्धापासून शेवटीं अहिंसेचा निष्कर्ष जगाला अद्याप कळण्याला कालावधी लागेल असें दिसतें, तेव्हां मनुष्य जेथें उघड्या डोळ्यानें पशूंना मारतात व त्यांच्यावर आहारसौख्यें मिळवितात तेथें पशुवधाचा निषेध अंतःकरणामध्यें चांगलासा सध्याच बिंबणार नाहीं.

**जाहिर सभा**— १६ जूनला श्री बिझांट यांस अटक करण्यांत आली आणि म्हणून त्या तारखेला दरमहा निषेध प्रदर्शक सभा भरत असते. त्या प्रमाणें कालरोजीं सायंकाळीं येथील श्री राजेश्वराच्या धर्म शाळेंत ती सभा भरली होती. गेल्या अंकींचें "उच्च भवितव्य" खरें होईपर्यंत हा क्रम असाच चालू राहणार.

**प्लेग**— पूर्व वऱ्हाडांत बडनेरा. मोर्शी, चांदूर स्टेशन, यवतमाळ, डिग्रस व इतर कांहीं खेडीं मिळून ८ सप्टेंबर पर्यंतच्या सप्तकांत ७९ प्लेगाचे मृत्यू झाले; पण पश्चिम वऱ्हाडांतील अकोला जिल्ह्यांत बार्शिटाकळी, वाशीम, कारंजा, पातूर बाळापूर आणि कांहीं इतर खेडीं मिळून प्लेगाच्या मृत्युचें मान १६२ पर्यंत पोंचले; आणि त्याशिवाय बुलढाणें जिल्ह्यांत ३० मृत्यु आहेत.

**शुभचिंतन**— गेल्या बुधवारीं येथून सुमारें ६०-७० रंगरूटचे शिपाई दिवसाच्या गाडीनें गाजतवाजत रवाना करण्यांत आले. राष्ट्र कार्यासाठीं हे लोक सैनिक होण्यासाठीं पुढें आले म्हणून राजश्री मिर्झा रहिमान बेग यांनीं आपल्या घरासमोर त्यांना पानसुपारी दिली आणि लढाईवर जाऊ इच्छिणाऱ्या माणसांचा सन्मान करण्यासाठीं व त्यांस शुभचिंतनाचा निरोप देण्यासाठीं राजश्री स्टँडन कामिशनर व इतर अधिकारी मुद्दाम स्टेशनावर गेले होते हें अधिकाऱ्यांच्या सौजन्याचें निदर्शक होय

**समागम**— राजश्री स्टँडन साहेब कमिशनर यांचा मुक्काम गेल्या मंगळवार पासून येथें असून निरनिराळ्या खात्यांची वार्षिक तपासणी चालू आहे. यांची दृष्टी सर्व कारभारांत फार खोलवर असते; आणि लोकांचा संतोष राखून सार्वजनिक कार्यांची भरभराट व्हावी यासाठीं ते आपल्या अनुभवाचा लाभ पुष्कळदां देत असतात. प्रेमळ बुद्धि, सत्याची चहा, मित चेष्टा इत्यादि सद्गुणांस यांच्या शिष्टाचारांनीं व प्रसन्नवृत्तीनें जें सौंदर्य येतें तें यांच्या भेटीस जाणार गृहस्थ नेहमीं वर्णन करीत असतात.

यवतमाळचे वकील रा० रा० गोपाल नागोजी कोठेकर यांच्यावरील क्रि० प्रो० १०८ कलमाखालील मुकदमा उमरावतीचे जिल्हा मॅजिस्ट्रेट पुढें चालण्याविषयीं हायकोर्टाचा हुकूम झाला आहे.

**धी बरार व्हिक्टोरिया मेमोरिअल टेक्निकल इन्स्टिटयूट अमरावती.**

ह्या शाळेंत जीन फिटिंग व जीन चालविण्याचें काम विद्यार्थ्यांस शिकविण्याकरितां एक हुशार, अनुभवी व मेहेनती जीन फिटर पाहिजे आहे. लायकी प्रमाणें पगार दरमहा ५० रुपये पर्यंत मिळेल. काम पसंत पडल्यास १२ महिन्यानंतर कायम केलें जाईल. उमेदवारांनीं सरटिफिकिटांच्या नकलासह अर्ज खालीं सही करणारास ३० सप्टेंबर १९१७ पर्यंत मिळतील असें करावे.

सही

D. G. Apte
Superintendent B. V. M. Technical Institute Amraoti.

N. N. 399.


**नोटिशीचें उत्तर.**

नोटीस बेशमी सोनाई मर्द भोनाजी रा० उगव ता० आकोला—

ईस:—

खालीं सही करणार भोनाजी वलद बाबाजी जावर मराठे रा० भैरद ता० आकोला वऱ्हाडसमाचारांतील ३७८ नंबरचे. नोटिसीचे उत्तर देतो कीं तूं माझी लग्नाची बायको असून तुझे शातिकानंतर कांहीं वर्ष मजजवळ राहलीस व पुढें कांहीं कारणामुळें अंगावरचे डागीनें घेऊन पळून गेलीस व पुष्कळ वेळा मी तुझ्या आईबापाकडे तुला आणावयास गेलो असता कांहीं तरी वाईट साईट उत्तरें देऊन मजकडेस आली नाहीं तुझ्या मनांतून माझ्या बरोबर राहणें नाहीं असे दिसले. मी तुला केव्हाही वागविण्यास तयार आहे. तुझ्या आईबापानें मुद्दाम मजकडे तुला पाठविले नाहीं तरी तूं डागिन्यासह मजकडे राहावयास ये. न आल्यास मला तुला घरी आणण्याच कायद्याप्रमाणें व्यवस्था करावी लागेल. तुझ्या नोटिसींत लिहिले आहे कीं मी दुसरा घरठव करीन हें करणें कायद्याप्रमाणें अयोग्य आहे व तसा गुन्हा होतो तरी तसे करण्याच्या भानगडींत पडूं नये तुझ्या नोटिसींतील मजकूर लबाडीचा व खोटा आहे. कळावें तारीख १६-९-१७

सही

भोनाजी वलद बाबाजी जावर रा० भैरद ता० जि० अकोला नि० खुद

नो० नं०४००


**पाहिजे**

देवघेवीच्या दुकाना करतां गुमास्ते पाहीजेत. पेनशनर लोकांस प्रथम पसंत केले जाईल. जास्त खुलासा खालील पत्यावर.

सही

गुलाबराय गोविंदराय दुकान अकोला वऱ्हाड

नो० नं. ३७९

**हिंदुस्थानावर अरिष्ट.**

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारांसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विक तावरतीव दूर होतात किं रु. १॥८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन माफकळाशी कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिश्रण करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L Batliwala Sons & Co. Ltd**

N. N. 6 Dadar Bombay

**अनुभवानें खात्री**



पटेल !! जर आपणास आपले हारमोनीयम अगदीं वाईट स्थितींतील नव्या प्रमाणें माफक दरांत दुरुस्त करून घेणें असेल तर आजच खालीं लिहिलेल्या पत्यावर व्यवहार करा. अनुभवानें खात्री पटेल. शिवाय नव्या पेट्या आमचे जंगी कारखान्यांत ऑरडर प्रमाणें अडव्हान्स आल्यास तयार मिळतात. याचे दर—हात पेटी सिंगल रीड २० ते २५

" डबल रीड ३० ३५-४०-५०

तीनलाइनी क्याझरेल सूराची किं. रु. ९५

पाय पेटी सत्तक ३। ६० ते ८० रु.

" " " ३॥ ८५ ते ९५ रु.

" " " ३॥। १०४-११५ रु)

" " " ३॥। तीन लाइनी क्याझरेल सुराची १८० ते ३१० रु.

**पत्ता—रामचंद्र बीसनसा हार्मोनियम मेकर व रिपेअरर नांदुरा जि० (बुलडाणा**

नो. नं. २८४

# लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आम्ही येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान, दळण्याच्या गिरण्या **जीन व प्रेसचें सामान** वगैरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारे सर्व सामान मोटारचे व घोडे गाडीचे गाद्यांचे कापड, व दुसरे लागणारे सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरे विजेचे सामान, स्पांपस् वगैरे माल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट मुंबई नंबर २

नो. नं ३९८

**गरीबांस फुकट**

# रामबाण मलम

**( कोणत्याहि त्वग्रोगावर )**

गुणकारी किं. ६ आणे.

# केशनाशक पूड.

( ९ आणे )

(क्याटलॉग फुकट) पत्ता. व्ही. आर मुळे नांदूरा. G. I. P.

नो० नं० ३७०

**रोल्डगोल्ड सोन्याच**

**कधींच काळे न पडणारे दागिने**

चंद्रहार किं. ५. २-४; गोट जोडी २-२॥; पाटल्या जडी २-२॥; वज्रटीका ३-४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४-५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सगाची २-३-४; अंगठी १; मले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २-२॥. सरी ४

**केंस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाकसची किं. १॥ रु.

पत्ता— **मगनलाल के. आणि कंपनी गिरगांव— मुंबई**

नो० नं० ५

ॐ नमः श्रीगणेशाय.

**आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.**

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोल्हादक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भासंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६१ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तीडक, मुत्रांची लाग, संकोच, पुयस्त्राव, रक्तस्त्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका वटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवू.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० दर्भे, जिल्हा रत्नागिरी

नो० नं० २२


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd. N. No. 150

# वऱ्हाडसमाचार.

## Berar-Samachar.

वर्ष ५१ ] आकोला—सोमवार तारीख २४ माहे सप्टेंबर सन १९१७ ई० [ अंक ३८

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

ता. १ जुलै पासून पुढें आणखी प्रसिद्ध होईपर्यंत व्याज दरसाल दर शेकडां ४ रुपये याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ — Lyon Scott एजंट

नो नं १

## पाहिजे.

देवघेवींच्या दुकानाकरतां गुमस्ते पाहीजेत. पेनशनर लोकांस प्रथम पसंत केले जाईल. जास्त खुलासा खालील पत्त्यावर.

सही

गुलाबराव गोविंदराय दुकान अकोला वऱ्हाड

नो० नं. ३७९

CIVIL SUIT NO 26 OF 1917.
SUMMONS FOR DISPOSAL OF SUITS.

( Section 27 and O. 5, R. 5 of the Code of Civil Procedure. )

IN THE COURT OF THE ADDITIONAL JUDGE OF THE COURT OF SMALL CAUSES, RESIDENCY BAZARS, HYDERABAD.

To 1. Nagorao, son of Gunderao Chivadewala, age 40 years, & 2. Narsu, Mistress of No. 1 Nagorao, age 35 years both residing in Khamgaon, Berars.

WHEREAS D. Chimanlal, son of Pandudas, of the Residency Bazars, Hyderabad, Deccan, has instituted a suit against you for H. S. Rs. 232-0-0 you are hereby summoned to appear in this Court in person or by a pleader, duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some other person able to answer all such questions, on Thursday the 4th day of October 1917, at 11 a. m., to answer the claim, and as the day fixed for your appearance is appointed for the final disposal of the suit, you must be prepared to produce on that day all witnesses upon whose evidence and all the documents upon which you intend to rely in support of your defence. Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this 13th day of September 1917.

H. S. Rs. ... 232-0-0
Coste ... 18-8-11.

250-8-11

H. R. Lynch Blosse
Judge

N. N. 401

### नोटीस

तीर्थस्वरूप रा. रा. राजाराम सदाशीव सुनगांवकर मु. लासीना ता. दारव्हा जि. येवतमाळ पो. यवतमाळ

यांसः—

मी खालीं सही करणार नोटीशीनें असें कळवितो कीं, माझा बाप मरण्यास १९-१६ वर्षे झालीं तेव्हां मी ४।५ वर्षांचा अज्ञान होतो. तुह्मी मला व माझ्या आईला कवठळ येथून आपले गांवीं नेले तेव्हां-पासून माझे शेतीचें उत्पन्न व पांडेपण व देशपांडेपणाचे उत्पन्न तुह्मी कवठळ येथून दरसाल आणत गेले हल्लीं अदमास ७।८ महिने झाले मी माझे आईसह कवठळ येथें आलो आहो. आमचे जवळ खर्चायास कांहीं नाहीं. तुह्माला बरेच वेळां पत्र वगैरे पाठविले परंतु तुह्मी आह्मांस कांहीं पाठविलें नाहीं. त्यामुळें आह्मास फार त्रास सोसावा लागतो. माझे लग्नाचे जुळून आले होते परंतु आपण पैसे न दिल्यामुळें माझे लग्न ही झालें नाहीं. पैशाची फार अडचण झाल्यामुळें अखेर आह्मांस ४०० च्यारशें रुपयास शेत गहाण देणें भाग पडलें. तरी या नोटिशीनें तुह्मांस कळविण्यांत येतें कीं तुह्मी माझे उत्पन्नाचा काय खर्च केला व शिल्लक काय आहे त्याचा हिशेब देऊन शिल्लक असलेली रक्कम व तुमचे जवळ असलेले आमचे डागीने नोटीस पावल्या-पासून १५ पंधरा दिवसाचे आंत आह्मांस पोहचते करून आमची पावती घेऊन जावी. नाहीं तर तुमचेवर योग्य कोर्टात दावा केला जाईल कळावे

सही

देविदास सखाराम देशपांडे रा. कवठळ ता० जळगांव जि० बुलडाणा द० खु०

नो० नं० ४०२

### नोटीस.

नोटीस बेशमी रावजी वल्लद देवजी सिंदे मु. मोरगव्हाण प्रगणे रिसोड ता. वाशिम जिल्हा आकोला

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुह्मी मला दोन वर्षे झाली घराबाहेर काढून दिले आहे व मी तेव्हां पासून सावकाराचे कर्ज काढून निरवाह करीत आहे. व तुमच्या पोटचा मुलगा ही माझेजवळ आहे. हें आपणास यापूर्वीं ता० २०-८-१७ इ० रोजीं पोष्टमार्फत नोटिसीनें कळविलेच आहे. त्याप्रमाणें तुह्मी आले नाहीं. तरी आतां सावकारानें तगादा लावल्यामुळें माझा नाइलाज झाला आहे. तरी मी पुन्हा आपणास जाहिर नोटिसीनें कळवीत आहे कीं नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत मला नेण्यास आले नाहीं तर मी दुसरा घरठाव ( मोहतीर ) करीन. तेव्हां तुमची कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. आतां तुह्मी नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत मला नेण्यास यावे व माझे आईची इस्टेट तुमचे जवळ आहे ती संर्व माझे सख्खे चुलत भाऊ नामे बाळाजी वा पुंजाजी चोपडे रा. भर जहागीर यांस आणून देउन त्याची पावती घेणें. कारण भावकी संबंधी मला जाच होत आहे. त्याचा तपसील खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. एक हंडा तांब्याचा, एक परात तांब्याची, २ पितळी पराती, २ तांबे पितळी, २ वाट्या, १ काशाची वाटी, १ पळी पितळी, १ भगुण पितळी, १ कुसा, १ पास, १ फारळाचा जोड, १ कुदळ, ४ कसाळ्या, १ नथ सोन्याची, १ सरी १६ तोळे २ पाटल्या चांदीच्या तोळे ६, २ बाळ्या सोन्याच्या ६ मासे, इतका माल तुमचे जवळ आहे. त्याबद्दल पंचाच्या सहीची पावती आहे. इतका माल व सावकाराचे कर्ज देऊन मला घेउन जाणे. मुदतीचे आंत जर न याल तर पुढें नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. माल व नोटिसीचा खर्च सावकाराचें कर्ज कोर्टांत दावा करून भरून घेतले जाईल. कळावे ता० ८-९-१७ इ.

सही

सेनी मर्द रावजी सिंदे हल्लीं मु० भर जहागीर ता. वाशीम जि० आकोला हातची निशानी आंगठा

नो० नं० ४०३

### नोटीस.

नोटीस बेशमी झाड्या वा सितऱ्या जात महार तायडे राहणार कारली प्रगणें कारंजा ता० मुर्तिजापूर जिल्हा आकोला

यांसीः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून लग्न होऊन अदाजे ९।१० वर्षे झालीं पांच सहा वर्षांपूर्वीं मी अज्ञानावस्थेंत आपले बापाचेच घरीं राहून तुह्मी नेआण करीत होते. हल्लीं मी तीन वर्षांपासून सज्ञान झाले. तेव्हांपासून माझा बाप तीन वेळां मला तुमचे घरीं स्वतः घेऊन आला ही गोष्ट आपले जातींतील बरेच लोकांस व इतर लोकांस माहीत आहे व ते प्रसंगोपात पुरावाही देतील कीं तुह्मी माझा इनकार केला व मुळींच तुमचे घरीं राहूं दिले नाहीं तरी या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावले पासून आठ दिवसाचे आंत माझे कडे झालेले लोकांचे कर्ज खावटीचे दरसाल रुपये ५० प्रमाणें तीन वर्षांचे रुपये १५० देऊन घेऊन जाणें व चांगले वागणुकीबद्दल हमी देणें मी नांदण्यास कबूल आहे. वरप्रमाणें तुमचे कडून वर्तन न झाल्यास हीच फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन व तुमचा नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं कळावें ता० ९ माहे सप्टेंबर सन १९१७ इ. द. कृष्णराव व्यंकटराव नाईक रा० कारंजा

सही

नि० आंगठा भागी मर्द झाड्या महार राहणार जनुन ह० मु० कारंजा इचा असे द० कृ.

नो० नं० ४०४

### नोटीस

सदाशिव वा तुकाराम अ. पा. करणार मानकाबाई जवजे तुकाराम व मानकाबाई जवजे तुकाराम सुतार रा० निमगांव ता० मलकापूर

यांसः—

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं, कजबे निमगांव येथील सर्वे नंबर १३९ पो. नं० २ एकर २८।३६ गुंठे हे शेत माझी बायको बनी इजला तिच्या बापाकडून मृत्युपत्राच्या लेखावरून मिळालें आहे सदरहु शेत तिच्या बापाचे ह्मणजे तुकाराम सुताराचें स्वसंपादित असून त्यानें त्याचे मरणाचे पूर्वींच माझे बायकोचे नावानें करून दिले होते. माझी बायको जिवंत होती तोपर्यंत तिनें सदरहु शेतीचा उपभोग घेतला. ह्या चालू वर्षींच ती मरण पावली आहे व तिच्यापासून संतती वगैरे मुळींच नाहीं. ह्मणून सदरहु सेताचा मी कायदेशीर मालक आहे. माझे ऐकण्यांत आले कीं, तुह्मी सदरहु शेताच्या उभ्या पिकाची खरेदी कोणाला देणार करितां मी सर्व लोकांस जाहीरपणें कळवितो कीं, ह्या शेताचे मालक वर लिहिलेले आई व मुलगा त्या नसून शेताचा कायदेशीर मालक मीच आहे. करितां कोणीही मानकाबाई जवळून उभ्या पिकाची खरेदी

किंवा दुसरे कोणते ही प्रकारचा लेख करून घेऊं नये घेतल्यास तो बेकायदेशीर समजला जाईल. माझे गैरहजरींत सदरहु सेतांत कोणी पायसुद्धां टाकूं नये व कोणतेही प्रकारचा लेख घेऊन माझेशी तंटा सुद्धां करूं नये. कळावें तारीख १९-९-१९१७ सही

पांडू खंडू सुतार रा. निमगांव नि० खुद दस्तूर सूर्यभान झांगाजी धोटे

नो० नं० ४०९

---

वऱ्हाडसमाचार

भाद्रपद शुद्ध ८ पिंगल संवत्सर १८३९

# आनंदोद्गार.

## ( सनदशीर चळवळीची पुण्याई )

अखेर आशा आणि निराशा यांच्या आंदोलनांत ९४ वे दिवशीं ह्मणजे तारीख १७ सोमवारीं रात्रौ ११ वाजतां श्रीबिझांट व त्यांचे दोन सहकारी यांस अटकेंतून मुक्त केल्याचा हुकुम कळविण्यांत आला आणि सर्व राष्ट्र आनंदानें दुमदुमून गेलें आहे. राजश्री महमदअल्ली, व शौकत अल्ली हे छिंदवाड्याच्या अटकेंतून सुटले आहेत आणी इतर असलेच राजकीय कैदी सुटणार आहेत. आनंदाची भाषा फार संक्षिप्त असते ह्मणून आह्मी १० सप्टेंबरच्या अंकांतील आनंदोद्गार पुनः प्रकाशित करतों.

# उच्च भवितव्यें

## ( साम्राज्याची पुण्यश्री )

पुनश्च

### श्री बिझांटचें ' स्वराज्य '

ब्रिटिश साम्राज्याची पुण्यश्री फार लोकोत्तर होय ! त्याचीं उदात्त ध्येयें, पिढीजात न्यायबुद्धि, आणि संकटामुळें प्रकाशमय होणारी तेजोवृत्ति हीच आमच्या हिंदी लोकांची खरी धन दौलत होय. श्री बिझांट देवी व त्यांचे सद्भक्त बंधमुक्त होतात इतकेंच नाहीं तर आमच्या ' स्वराज्या'चा गंगाप्रवाह सर्व राष्ट्रालाच काय तर साम्राज्याला देखील कसा पुनीत व पावन करीत चालला आहे पहा !

## व्याजबट्ट्याला निर्बंध घालणारें बिल.

वरिष्ठ कौंसिलाच्या नुकत्या झालेल्या बैठकींत ज्या अनेक बिलांवर चर्चा झाली त्यांत व्याजबट्ट्याचें बिल हें महत्त्वाचें होतें. इतके दिवस सावकार ऋणकोशीं करार करून वाटेल त्या व्याजाच्या दरानें पैसा कर्जाऊ देत, आणि शेतकरी वगैरे कुळें अज्ञान आणि गरजू असल्यामुळें त्यांना सावकाराची मागणी कबूल करावी लागे. अशा व्यवहारांत व्याजाचे दर कधीं कधीं इतके भारी असत कीं वीस पंचवीस वर्षांत मुद्दलाचे वीसपट व्याज भरून सुद्धां ऋणकोची मुक्तता होत नसे. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें दामदुपटीचा निर्बंध घातला आहे खरा; पण व्यवहारांत त्याचा फायदा ऋणकोंना क्वचित्च मिळत असे. मूळच्या कराराच्या योग्यतायोग्यतेविषयीं विचार करण्याचा दिवाणी कोर्टांना अधिकार नसल्यामुळें तो करार उघड उघड अन्यायाचा व ऋणकोस जाचक असला तरी कोर्टामार्फत तो अन्याय दूर करून घेण्याला कांहीं मार्ग नव्हता. हें पाहून तसा अधिकार दिवाणी कोर्टाला देण्यासाठीं हें बिल सादर करण्यांत आलें आहे, असें बिल आणणाऱ्या ना. मेंबराकडून सांगण्यांत आलें. सकृद्दर्शनीं अन्याय दूर करूं पाहणाऱ्या या बिलावर आक्षेप घेण्याचें कोणाच्या ही मनांत येणार नाहीं, आणि त्याप्रमाणें कौंसिलाच्या सभासदांनीं ही आक्षेप न घेतां उलट त्याचें स्वागतच केलें. पण ऋणकोसंबंधाचा अन्याय दूर करूं पाहणारें हें बिल सावकाराला योग्य न्याय देत आहे काय हा प्रश्न येथें साहजिकच कोणालाही सुचण्यासारखा आहे. सावकार ऋणकोला पिळून पैसे काढणोरे शायलॉक असतात तसे ऋणको ही पुष्कळ वेळां ऋण फेडण्याची अनुकूळता असतां लबाडी करून आपली इस्टेट दुसऱ्याचे नांवें करून दिवाळें काढून मोकळे होतांना दिसतात कीं नाहीं? सावकारीचा धंदा सर्वस्वी फायद्याचाच असता तर थोड्याशा व्याजावर संतुष्ट रहा असें सावकारांना सांगतां आलें असतें. पण त्या धंद्यांत ही सट्ट्यासारखा कांहीं प्रकार असल्यामुळें कित्येक वेळां मोठी ठोकर खाण्याचा प्रसंग येतो तेव्हां कायदा सावकारांचें तारण करण्यास पुढें येतो काय ? शेतकरी वगैरे ऋणकोचा वर्ग बहुधा अज्ञान असतो हें विधान सुद्धां अंमळ बेताबातानेंच खरें मानून चालावें लागते. कारण शेतकरी वर्ग जरी साक्षर नसला तरी व्यवहारांतल्या खुब्या त्यांना कळत नाहींत इतका भोळेपणा त्यांचे पदरीं बांधण्यास सहसा कोणी तयार होणार नाहीं. आह्मी सावकारांचा पक्ष उचलतों असा भाग नाहीं. आमचें ह्मणणें येवढेंच आहे कीं एकाविषयीं अन्याय करून दुसऱ्याला न्याय देऊं पाहणें बरोबर नाहीं. मूळचा करार किती ही मागचा असला तरी जर तो अन्यायाचा असेल तर कोर्टानें त्याची चिकित्सा करून योग्य व्याजाच्या दरानें हिशोब करावा, आणि सावकाराकडेस ज्यास्त पैसा गेल्याचें आढळल्यास ज्यास्त गेलेली रकम ऋणकोला परत देववावी हें नव्या कायद्यांतलें कलम तर सावकारांना व त्यांच्या वारसांना अत्यंत हानिकारक व अन्यायाचें आहे असें दाखवितां येईल. इतकेंच नाहीं तर त्याच्या योगानें ऋणकोला सावकाराकडून कर्ज मिळण्यास ही पुष्कळ वेळां मुष्किलीचें होईल. शेतकऱ्यांना साऱ्याची रकम भरावी लागते त्यावेळीं सावकारांनीं जर ओढून धरलें तर शेतकऱ्यांची काय दशा होईल याचा ही विचार आमच्या मतें अवश्य करायास पाहिजे. सावकार ह्मणजे रक्त शोषण करणारी जळू आहे खरी; पण तिची ही एखादे वेळीं जरूर लागते व त्यावेळीं ही आपलें रक्त पिते असें ह्मणून आपलें काम झाल्याबरोबर तिला मारून टाकणें कदापि योग्य होणार नाहीं.

---

## ओडायर पूजा

सर मायकेल ओडायर यांच्या तारीख १३ सप्टेंबरच्या वरिष्ठ कायदे कौन्सिलांतील भाषणासंबंधानें येथील गेल्या १६ तारखेच्या जाहिर सभेंत जो निषेधाचा ठराव करण्यांत आला तो सभेपुढें मांडतांना रा. रा. त्र्यंबक नारायण बापट बी. ए. एल् एल् बी, वकील आकोला हे ह्मणाले कीं:—

प्रस्तुतचा ठराव पंजाबचे ले. गवर्नर मायकेल ओडवायर यांनीं गेल्या गुरुवारीं व्हाइसराॅयांच्या कौन्सिलांत जें भाषण केलें त्यासंबंधीं निषेध प्रदर्शित करण्याचा आहे. त्यांतील पहिला भाग होमरूलची चळवळ व Passive Resistence याविषयीं त्यांनीं जी अवास्तव व निमर्याद निंदा केली, त्या निंदेचा निषेध करण्याचा आहे. होमरूल व passive resistence यांचाच फक्त ठरावांत निर्देश आहे तरी साधारणतः हें सर्व भाषणच आपणास असंमत आहे हें सांगणें नकोच. ठरावाच्या दुसऱ्या भागांत अशा तऱ्हेची अधिकाऱ्यांची भाषणें आजच्या प्रसंगीं सरकार व प्रजा यामध्यें बिकट परिस्थिती उत्पन्न करण्यासारखीं आहेत, अशी स्पष्ट इशारत आहे.

थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे व्हाइसराय साहेबाचे कौन्सिलांत पंजाब प्रांतासंबंधीं कांहीं सुधारणा या ठरावावर वाद चालला व साहेब मजकूर बोलण्यास उठले. व बोलण्याचे भरांत भान न राहिलें ह्मणा, किंवा, मनांतलें वीष बाहेर पडल्याखेरीज राहीचना ह्मणून ह्मणा साहेब मजकूर सध्याचे राजकीय चळवळीवर घसरले. साहेब ह्मणाले, पंजाब प्रांत सरकारास लष्करी भरती देत आहे, द्रव्य देत आहे. व लढाई खातर सर्व झीज सोशीत आहे. तरी सुद्धां Spirituality, Home rule, असल्या दुटप्पी लफंगेपणा पासून अलिप्त आहे हा त्याचा मोठा गुण आहे. दुसऱ्या प्रांतांतून पहावें तों खरी मदत मुळींच नाहीं. पण होमरूल वगैरे भुलविणारे दुटप्पी शब्द ज्यांचा राजकीय चळवळे किंवा बाॅंब फेंकणारे अराजक दोघेही सारखाच करूं शकतात. असले शब्द व त्या नांवाखालीं मोडणाऱ्या चळवळी व त्यांचा फैलाव अशी स्थिती आहे. व कांहीं ठिकाणीं सत्याग्रहापर्यंत ही मजल पोंचविण्याची इशारत होत आहे. साहेब मजकुरांच्या मतें सत्याग्रह व बादशहांशी राजनिष्ठ राहण्याची शपथ यांचा मेळ घालणें दुर्घट आहे. अर्थात सत्याग्रह मतवादी लोक राजाशीं बेइमानी करतात असा या भाषणांत ध्वनी आहे. साहेबांचे समोर भाषणाचे वेळीं बसलेले मंडळींत राजनिष्ठेची शपथ घेणारे व पासिव resistence चें तत्व संमत असलेले कांहीं लोक असतीलच. होमरूल व Passive Resistence याचा समाचार घेऊन साहेब पुन्हा पंजाबकडे वळले व होतां होतां Self Government संबंधीं तीन तत्वें सांगून हिंदी जनता आज Self Government ला अपात्र आहे असे पर्यायानें सुचवून आज तुह्मी आमच्या लढाया लढण्यापुरते पात्र आहांत इतका पोक्त उपदेश करून साहेब विराम पावले. अशा तऱ्हेचें हें भाषण आहे.

पंजाब सांगावें तितकें लढतो पण होमरूलचे फंदांत पडत नाहीं, ही साहेबांचे मतें त्या प्रांताची विशेष शिफारस आहे. ठीकच आहे. घोडा लादावें तेवढें ओझें वाहून खवयास कांहींच मागणार नाहीं तर मालकाला केव्हांही अधिकच प्रिय राहणार. आज पंजाबांत सुमारे ७ हजार लोक बंदिवासांत पडले आहेत व साहेब मजकुरांचे शिस्तीमुळें राजकीय आकांक्षासंबंधीं पूर्ण पराङ्मुख आहे अशी परिस्थिती इंग्रजी अंमला खालीं ७५ वर्षे नांदल्या नंतर स्पृहणीय आहे अशी साहेबांची मनोदेवता सांगत असेल तर नइलाज आहे. परंतु इतक्या स्पृहणीय स्थितीस आह्मी पात्र नाहीं अशी इतर प्रांतांनीं सांगण्याची वेळ खचित आली आहे.

खरें पहातां पंजाब प्रांताचे सुधारणेचे संबंधी वादांत सर्व राजकीय चळवळीवर सहसा तुटून पडणें हेंच अप्रस्तुत आहे. व दुसऱ्या एखाद्या लोकनियुक्त सभासदानें असला अतिप्रसंग केला असता, तर त्याचें भाषण कितपत शेवटास गेलें असतें हा प्रश्नच आहे. याच कौन्सिलाचें बैठकींत साहेबांचें भाषणापूर्वीं सुमारे आठ दिवस व्हाइसराय साहेबांनीं हिंदुस्थान सरकारचे ही साम्राज्यांतर्गत स्वराज्य हेंच अंतिम ध्येय आहे व बादशहांनींही मुद्दाम आज्ञापत्र काढून या ध्येयास संमती दिली आहे असें जाहिर केलें आहे. हें ध्येय अखेर साध्य होण्यासाठीं आज किती पावलें पुढें जावें याचा विचार करण्यासाठीं सरकारचे निमंत्रणावरूनच मीटिंग येथें येणार आहेत, व त्यांच्यापुढें आपले विचार मांडण्याची लोकनियुक्त संस्थांना पूर्ण वाव मिळेल व असले विचार व्यवस्थित स्वरूपांनीं सर्वांनीं आपसांतील विरोध विसरून जाऊन सहकारितेचे दृष्टीनें, खुल्या दिलानें मांडावे, अशी ही व्हाइसराय साहेबांनीं कळवळ्याची विनंति केली आहे. या भाषणामुळें आनि-बिझांट लवकर सुटतील. निदान दडपशाहीचें शिंग या पुढें पुकारलें जाणार नाहीं अशी आशा वाटूं लागली होती. व्हाइसरायांनीं तर एकमेकांचें मनोवृत्तींना मान देऊनच हिंदुस्थानचे भूमींत साम्राज्यास अनुकूल अशा भावना उत्पन्न होतील असें स्पष्ट सांगितलें आहे.

" It is only by constant and watchful regard for the feelings of others that a sweet and healthy sentiment for the empire can be brought to blossem and bear fruit on Indian soil."

अशा वेळीं कोणी जबाबदार अधिकारी लोक प्रतिनिधी समोर इतकी अरेरावीची भाषा वापरील अशी कल्पनाही झाली नसती. कांग्रेस सारख्या संस्थांनीं आंखून दिलेलें खुद्द राजाज्ञेस संमत असलेलें, ध्येय लोकप्रतिनिधींसमोर अयोग्य ह्मणून ठरविण्याचा प्रयत्न करणें, किंवा त्या ध्येयासंबंधीं वापरले जाणारे होमरूल सारखे शब्द इतके संदिग्ध

किंवा दुटप्पी असतात कीं ते अराजक सुद्धां वापरूं शकतात असें सांगणें ह्मणजे जनतेचा बेमुर्वतपणानें अपमान करणें आहे एकाद्या नांवाचा किंवा गोष्टीचा वाईट लोक दुरुपयोग करूं शकतात एवढीच गोष्ट, त्या नांवाची किंवा गोष्टीची थट्टा उडविण्यास पुरेशी असेल तर जगांतील कोणच्या ही पवित्र गोष्टीचा उपहास करितां येईल. खुद्द राजसत्तेचीच गोष्ट घ्या. चांगल्या राजाच्या हातांत ती असेल तर लोकांचें कल्याण होऊन त्यांस फिलिपाइन बेटांतील लोकांप्रमाणें स्वातंत्र्यही मिळेल. तीच अरेरावी अधिकाऱ्यांच्या हातीं असेल तर प्रांतचे प्रांत राजकीय आकांक्षा संबंधी नामो हरम होऊन निःसत्व बनतील. हा दोष सत्तेचा किंवा चालविणाऱ्यांचा ? व सत्तेचा दुरुपयोग होणें शक्य आहे ह्मणून ती कोणाचेच हातांत ठेवावयाची नसेल तर **साहेब कोठें** राहतील व पंजाबचें शिफारस पत्र कसें टिकेल हा प्रश्नच आहे. साहेब मनकुरांनीं हिंदी लोक वक्तृत्वांत वाकबगार आहेत, पण त्यांच्यांत खरें शहाणपण अथवा सारासार विचार नाहीं असा एक जातां जातां शेरा झोकून दिला आहे. साहेबांचें भाषण बरेंच आवेशाचें अहे वक्तृत्वपूर्ण ही आहे. व त्यांत होमरूल सारख्या चळवळीची थट्टा उडविण्यासाठीं बालिश कोट्या ही केल्या आहेत. यामुळें त्यांच्या भाषणावरून जर कोणी वक्तृत्व व शहाणपण यांचें समीकरण जुळवूं लागेल तर वक्तृत्व, व शहाणपण किंवा सारासार विचार यांचा खरोखरीच कधीं ही मेळ बसत नाहीं असेंच ह्मणावें लागेल. साहेबांच्या स्वानुभवांतील गोष्ट साहेबांनीं आत्मोपम्य न्यायानें लोकांचे माथी मारली आहे इतकेंच. होमरूलची अशी कितीही टर केली तरी आतां हिंदी लोक होमरूलचे चळवळी पसून पराङ्मुख होणें कठीण आहे किंबहुना असल्या भाषणामुळें होमरूलची आवश्यकता जास्तच भासूं लागते. हे अधिकारी लोक मताला जर जबाबदार असते तर हिंदुस्थानचे तिजोरीतून ओंझींचीं ओंझीं पगार खाऊन लोक प्रतिनिधी समोर जनतेचे ध्येया संबंधीं अशी टर उडवूं शकले असते काय ? व ही जबाबदारी होमरूल शिवाय कशी उत्पन्न होणार ? Passive Resistence वर तर साहेब फार गरम झाले आहेत, मात्र त्यांनीं पॉसिव्ह रेझिस्टन्सचा अर्थविपर्यास केला आहे. राज निष्ठेचा शपथ किंवा ब्रिटिश राज्याचें स्थैर्य याच्याशीं Passive Resistence चा विरोध नाहीं. ज्या अन्यायाचे मुळें राज्याचे स्थैर्यास धोका येण्याचा संभव असतो, किंवा ज्यापद्धतीमुळें ईश्वरी न्याय किंवा राजसत्ता या दोघांनाही काळिमा आणणारे अन्याय घडूं शकतात असे अन्याय किंवा अशा पद्धती दूर करण्याचा Passive resistence हा शांततेचा, सनदशीर पण **अखेरचा** उपाय आहे. Passive resistence चा मार्ग पुराणकाळीं वसिष्ठ प्रल्हादासारख्या विभूतींनीं चोखाळलेला आहे. इतिहास कालांत महमद, ख्राइस्ट, साक्रेटिस अशा अवतारी पुरुषांनीं अंगिकारलेला आहे. मध्यकाळांत एकनाथ ज्ञानेश्वरासारख्या महंत संतांनीं आक्रमिलेला आहे राजकारणांत खुद्द इंग्लंड देशांत हेम्डनसारख्या राजगुरूंनीं आक्रमिलेला आहे. अगदीं नजीक ह्मणजे ब्रॅडलॉसारख्यांनीं ही हा मार्ग स्वीकारिलेला आहे व महात्मा गांधी यांनीं याचेच मदतीनें यश संपादन केलें आहे. व खऱ्या उदार अंतःकरणाच्या लॉर्ड हार्डिंज सारख्या इंग्रजांनीं या मार्गांत सक्रिय सहानुभूती दाखविली आहे. असला साधुसंतांनीं पवित्र केलेला राजगुरूंनीं अंगिकारलेला passive resistence चा मार्ग कोणाच्याही शिफारस पत्राची अपेक्षाही करीत नाहीं, किंवा अरेरावी अधिकाऱ्यांच्या दरडावणीनें नाश ही पावत नाहीं. अशा मार्गाची निंदा करणें ह्मणजे सूर्यावर थुंकण्यासारखें आहे. त्यांतून आज सरकार दोन पावलें पुढे येऊन हिंदी लोकांच्या राजकीय आकांक्षा जर तृप्त करूं इच्छित असेल तर आज जनतेहि हा मार्ग अंगिकारण्यापूर्वीं अवधी देण्यास राजी नाहीं असें ही नाहीं. अशा स्थितींत passive resistence चा मार्ग संमत असणाऱ्या लोकांना पर्यायानें बेइमान ह्मणणें हे मुत्सद्दीपणास केवळ लांच्छन आहे. वाशिंग्टन आयर्व्हिंग नांवाच्या एका अमेरिकन ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं "तरवारीचे वारानें झालेली जखम मांसाचे खालीं जात नाहीं व भरून ही येऊं शकते परंतु दुःशब्दांनीं झालेली जखम थेट अंतःकरणापर्यंत जाऊन भिडते व ती कधींही भरून येत नाहीं तरवारीचा घाव मनुष्य विसरतो परंतु दुःशब्दाचें ताडण सर्व मर्मांतून क्रोधाग्नि उत्पन्न करितो." होमरूल असता तर प्रजेच्या पुढाऱ्यांना विनाकारण दुःशब्दांनीं ताडन करणाऱ्याला आळा घालण्यासाठीं प्रमाद्रोहाचा कायदाही उत्पन्न झाला असता व आजही अशा तऱ्हेचें भाषण एखाद्या अनधिकारी लुंग्यासुंग्या मनुष्यांनें केलें असतें तर सरकारच्या अखेर प्रजाजनांना स्वराज्य देण्याविषयींचे हेतूविषयीं शंका उत्पन्न करणारें हें भाषण आहे. व त्यामुळें Disaffection उत्पन्न होण्याचा संभव आहे अशी ही तक्रार प्रजेला करितां आली असती परंतु ज्यांच्या हातांत राजसूत्रें किंवा कायद्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार आहेत, अशा लोकांनींच हें भाषण केल्या मुळें हाही मार्ग बंद आहे. अशाच एका भाषणामुळें लॉर्ड कर्झन यांनीं सर्व प्रजेचे मत आपले विरुद्ध करून घेतलें होतें व अलस्याच अरेरावी मुळें फुलर साहेबांनीं बंगालप्रांतांत बिकट परिस्थिति उत्पन्न केली होती. असलीं भाषणें ह्मणजे शिष्टाचाराचे भंगाची परमावधी, राजाज्ञेचा अवमान, प्रजेचा उपमर्द व राजनीतीचा उपहास होत. व जें हिंदुस्थान सरकार लोकांनीं नेमस्त भाषा वापरावी अशी अपेक्षा करितें त्यांनीं तरी याप्रसंगीं आळा घालण्याचें धैर्य दाखवावें.

## जाहीर ठराव.

राजकीय

**(रसायन शाळेंतला नवा प्रयोग.)**

गेल्या १६ तारखेला व १८ तारखला अशा दोन जाहीर सभा येथील राजेश्वराच्या पाठशाळेंत रावसाहेब रामचंद्र विष्णू महाजनी व रावबहादूर विष्णु मोरेश्वर महाजनी यांच्या अध्यक्षते खालीं अनुक्रमानें भरल्या होत्या. पहिल्या सभेमध्यें डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टाच्या खालीं श्रीमती बिझांट, आरुंडेल, वाडिया आदिकरून ज्या स्त्रीपुरुषांस अटक करण्यांत आली आहे ती दूर करण्याविषयींचा पहिला प्रस्ताव होता; पण त्या ठरावाची आतां फारशी जरूर राहणार नाहीं असें दिसल्या वरून तो ठराव येथें दिला नाहीं. पहिल्या सभेंतील दुसरा ठराव असाः—

"श्रीराजेश्वराचे देवालयांत आज ता. १६ सप्टेंबर १९१७ इ. रोजीं जाहीर सभेंत जमलेले आह्मी आकोल्याचे रहिवासी, पंजाबचे लेफ्टिनंट गव्हरनर सर मायकेल ओडायर यांनीं व्हॉइसरॉयांच्या काउंसिलांत ता. १३।९।१७ इ. रोजीं भरलेल्या सभेंत, केलेल्या भाषणांत, होमरूलचे चळवळीवर जो विनाकारण व असभ्य असा हल्ला केला त्याचा, व निःशस्त्र प्रतिकाराच्या पूर्ण सनदशीर मार्गाचा उपदेश हा केवळ झांकलेला राजद्रोह आहे, व तो काउंन्सिलांतील सभासदांनीं बादशहांचे संबंधीं त्यांनीं घेतलेल्या राजनिष्ठेच्या शपथेशीं विसंगत आहे, असें जें त्यांनीं भर काउंन्सिलांत जाहीर विधान केलें त्याचा; या ठरावानें, रागानें निषेध करितों.

वरील विधानांनीं, हिंदुस्थानांतील आधींच आणीबाणीच्या स्थितीस आलेलें राजकीय वातावरण, खात्रीनें जास्तच तमें होईल व हिंदुस्थानचें स्टेट सेक्रेटरी मि. मॅंटिग यांचें स्वागत करून त्यांच्याशीं त्यांच्या कार्यांत सहकारित्व करण्यास परिस्थिति शांत करणें हे सरकार व जनतेचे पुढारी या दोघांचे हो शक्तीचे बाहेर लवकरच जाईल असें आमचें पक्कें मत आहे."

तारीख १८ रोजींच्या जाहिरसभेंत पहिला ठराव असा झाला कीं:—

"ता० १८ सप्टेंबर १९१७ इ० रोजीं जाहिर सभेंत जमलेले आह्मी आकोला येथील नागरिक, या ठरावानें, मिसेस बिझांट व मेसर्स ॲरंडेल व वाडिया यांच्या सुटकेबद्दल, त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों; व ही सुटका, या सर्व देशभर एकसारखी व एक दिलानें चालविलेल्या सनदशीर चळवळीचा यशस्वी परिणाम आहे; व आमच्या सतपक्षाच्या पुरस्करणाकरितां योजिलेल्या मार्गांच्या कायदेशीरपणाचें समर्थन आहे; असें आह्मी समजतों.

आह्मी अशी प्रार्थना करितों कीं, परम दयाळू महाराज, राजे पंचम जॉर्ज यांच्या हातानें, ही मातृभूमी, साम्राज्यांतर्गत स्वराज्य प्राप्तीनें, कृतार्थ झालेली पाहण्यापर्यंत, त्यांना परमेश्वरानें आयुष्य द्यावें.

या संधीस, ब्रिटिश न्यायबुद्धी व मुत्सद्दिगिरी यांची त्यांचे हृदयांत, उशीरा कां होईना, पण जागृति झाली याबद्दल आह्मी सरकारचें अभिनंदन करितों व लवकरच हिंदुस्थानचे राज्यकारभारासंबंधीं महत्वाच्या सुधारणा देण्याचा या कृत्यानें मंगलकारक उपक्रमच सुरू केला आहे, अशी आमची समजूत आहे.

सर बेंजामिन रॉबर्टसन यांचें सरकार मि, बेझंट यांना मध्यप्रांत व वऱ्हाडमध्यें येण्याविषयीं अटक असल्याबद्दलचा हुकुम विलंब न लावितां रद्द करतील असा आह्मास भरंवसा आहे.

आह्मी अशी आशा बाळगतों कीं महमद अली शौकत अली ह्याची ही सुटका लवकर होईल."

ता० २१ शुक्रवार रोजीं रावबहादूर केशव गोविंद दामले यांच्या अध्यक्षतेखालीं राजश्री महमदअली व शौकतअली हे अटकेंतून सुटले ह्मणून आनंद प्रदर्शित करण्यासाठीं श्रीराम थिएटरांत जाहिर सभा भरली होती. तेथें राजश्री महमद युसफ, लक्ष्मणराव ओक, आणि विष्णुपंत भट यांचीं जोरदार स्फूर्तिदायक भाषणें अभिनंदनाचा जाहिर ठराव टाळ्यांच्या गजरांत व धन्यवादांच्या जयघोषांत पसार करण्यांत आला.

वरील जाहिर ठराव हे लोकांचें हृदय इतके तंतोतंत व्यक्त करतात कीं त्यामध्यें सरकाराविषयीं आदरभाव उच्च कोटीचा जागृत असून सरकार व प्रजा यांच्या मधील हे प्रेमाचें विनयाचें व सत्याग्रहाचें भांडण आहे. तेव्हां राजभक्ती व प्रजावात्सल्य या दोन मूलतत्वांचें संमिश्रण आमच्या ब्रिटिश रसायन शाळेंत इतकें उत्तम होईल कीं सर्व जगाला सुराज्याचा येथें कित्ताच घेण्यास सांपडेल.

## बेझंटचा प्रभाव.

**(विद्यार्थ्यांचा विरस.)**

मोठ्या माणसांना श्री बिझांट या मुक्त झाल्या याबद्दल जो हर्ष वाटतो तो निराळा; आणि शाळांतून शिकणारे विद्यार्थी हर्षभरानें बागडत आहेत त्यांचा तो आनंद कांहीं निराळा! श्रीमती बिझांट या आतां सुटल्या तेव्हां त्यांच्या हातूनच आमचा सभाबंदीचा ससेमिरा दूर होईल असा विलक्षण विश्वास त्यांना त्या बाईच्या चारित्र्यावरून वाटतो. कांहीं विद्यार्थी तर आपआपल्या शिक्षकांना या बाईच्या सुटकेबद्दल आनंद प्रदर्शक ज्या सभा होत आहेत त्यांना जाऊं देण्याविषयीं उत्कंठेनें परवानगी मागू लागले; आणि परवानगी मिळेना ह्मणून त्यांची विषण्णता ही फार झाली. कांहीं विद्यार्थी असा वाद घालूं लागले कीं श्री बिझांट यांचें स्वराज्य आमच्या शिवाय कसें चालणार? विद्यार्थ्यांमधील ही तीव्र जाणीव व अंतःकरणाची भरारी या इंडियाच्या इतिहासांत चिरस्मरणीय राहतील. आह्मी ह्मणतों कीं सभाबंदीनें जें कार्य झालें आहे तें कार्य सहस्त्रावधी व्याख्यानांनीं ही इतकें सुंदर घडलें नसतें, घरोघर श्री बिझांट यांचा एवढा जयघोष चालतो कीं विद्यार्थी वर्ग त्याच्या त्या नानाविध गोष्टी ऐकून त्यांस देवा प्रमाणें पूजूं लागले आहेत. विद्यार्थ्यांच्या मनांत हा सद्गुणांचा विकास, स्वातंत्र्याची प्रीती आणि देश सेवेचें व्रत हीं इतकीं उज्वलपणें उदय पावलीं आहेत कीं राजश्री चॅपमन यांची बालचमूची संस्था आतां विस्तृत प्रमाणावर व खऱ्या लष्करी शिक्षणाच्या धर्तीवर चालू करण्यास सध्यां विद्यार्थ्यांचीं मनें फार अनुकूल स्थितींत आहेत. हल्लीं शाळांतून पोवाडे, वीररसाचीं भाषणें विद्यार्थ्यांच्या तोंडून राजश्री स्टँडन कमिशनर साहेब यांनीं नुकतींच आकोल्यास ऐकलीं असतील, आणि त्यांच्या मनाला आल्हाद व कौतुक ही वाटलें असेल; पण आह्मी त्यांना इतकेंच सुचवितों कीं जर विद्यार्थ्यांना

खऱ्या इष्ट दिशांनीं स्वैरपणें वागू दिलें तर या विद्यार्थ्यांच्या पिढीपुढें कोणत्या ही राष्ट्राला ब्रिटिश राष्ट्राबर युद्ध पुकारण्याचें धारिष्ट होणार नाहीं.

---

## मृत्यूनंतर काय?

मनुष्य मरण पावल्यानंतर त्याचा आत्मा हवेंत संचार करीत राहतो कीं काय? त्याचा त्यानंतर या मृत्युलोकाशीं संबंध राहतो कीं नाहीं? कां मनुष्य मेला कीं त्याचा या जगाशीं संबंध कायमचा तुटला? वगैरे प्रश्न आज शेकडों वर्षें तत्त्वज्ञांना घोटाळ्यांत पाडीत आले आहेत. पण शास्त्रज्ञ या प्रश्नाच्या निर्णयाच्या जवळ जवळ येत चालले आहेत असें दिसतें. सर ऑलिव्हर लॉज हे पाश्चात्य शास्त्रज्ञांतले प्रमुख आहेत. यांचें मत आतां आत्म्याच्या अस्तित्वाकडे आणि सूक्ष्म रूप धारण करणारे मृतात्मे पृथ्वीवरच्या आपल्या इष्टमित्रांशीं संबंध ठेवतात असें मानण्याकडे पूर्णपणें वळलें आहे. यांचा एक मुलगा रेडमंड हा थोडे दिवसापूर्वीं प्रस्तुतयुद्धात मारला गेला. त्याचा व आपला अद्याप ही दळणवळणाचा संबंध आहे असें प्रस्थापित करणारा एक ग्रंथ ही त्यांनीं लिहिला असून लोकनिंदेची पर्वा न करतां ते आपलें मत उघडपणें सांगत असतात. नुकतेंच त्यांनीं एका भाषणांत सांगितलें कीं मृत महात्मे अदृश्य रूपानें संचार करीत असतात व त्यांना कोणी सल्ला विचारल्यास ती देतात. या जगांत विद्यमान असतांना ऐहिक गोष्टींत त्यांचें जितकें लक्ष असेल तितकेंच मृत्यूनंतर ही त्यांचें राहतें. सारांश, मृत्यू ह्मणजे जीवनाचा अंत नव्हे तर उच्च स्थितीला जाण्याची एक पायरी आहे. हिंदूंना हें मत कांहीं नवें वाटणार नाहीं. कारण जें सत्य ऑ. लॉज सारख्या शास्त्रज्ञांना आज दिसूं लागलें आहे तें आमच्या ऋषींना दिव्य चक्षूंनीं कित्येक हजार वर्षांपूर्वींच कळून चुकलेलें आहे. इतके दिवस ते भोळसर व रानटी मानिले जात असत, आतां शहाणपणाचा तोरा मिरविणारे जे शास्त्रज्ञ त्यांच्यापेक्षां ही ज्ञानानें ते उच्चप्रतीचे ठरतील. सत्य कधीं लपून राहत नसतें.

---

## मि. मांटेग्यु यांची हिंदुस्थानास भेट.

हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी मि० मांटेग्यु हे हिंदुस्थानांत आल्यावर त्यांची मुलाखत कोणीं कशी घ्यावयाची, व त्यांना अर्ज वगैरे पाठविणें झाले तर ते कसे पाठवावयाचे त्यासंबंधानें सरकारी पत्रक प्रसिद्ध झालें आहे. मि० मांटेग्यु हे राज्यविषयक सुधारणांसंबंधानें हिंदुस्थानचे पुढारी व सार्वजनिक संस्था यांची सल्ला घेण्यासाठींच इकडे येत आहेत [illegible] त्यांना पार्लमेंटांतून फार दिवस गैरहजर राहतां येणार नाहीं. सबब सुधारणेशिवाय अन्य बाबी संबंधानें ते कोणाच्या ही भेटी किंवा अर्ज वगैरे घेणार नाहींत. सुधारणांच्या संबंधांत जाणारे अर्ज वगैरे हिंदुस्थान सरकारच्या मार्फत मि० मांटेग्यु यांच्या नांवें पाठवावे. डेप्युटेशनची मुलाखत घेतांना ना० व्हाइसराय साहेब हजर असतील, व डेप्युटेशनला लागलीच उत्तर मिळणार नाहीं. डेप्युटेशनच्या निवडक मंडळींशीं खाजगी मुलाखती होतील. अशा ज्यांना हव्या असतील किंवा ज्यांना मानपत्र देण्याची किंवा अर्ज करण्याची इच्छा असेल त्यांनीं तसें आपापल्या प्रांतिक सरकारास कळवावें, व तें सरकार आपली शिफारस हिंदुस्थान सरकारमार्फत स्टेट सेक्रेटरीस कळवितील, व त्यासाठीं वेळ नेमण्यांत येईल. जें मानपत्र किंवा अर्ज द्यावयाचे त्यांची प्रत थोडे दिवस आगाऊ पाठविली असतां अधिक सोयीचें होईल. त्याचप्रमाणें खाजगी मुलाखत चाहणारांनीं ज्या मुद्यांवर आपणांस बोलावयाचें त्यांचें टांचण व आपल्या बोलण्याचा सारांश आगाऊ पाठविले असतां चांगलें होईल. या नियमांवरून स्टेट सेक्रेटरी साहेबांच्या मुलाखती कोणाशीं होऊं द्यावयाच्या व कोणाशीं नाहींत हें प्रांतिक सरकारें व हिंदुस्थान सरकार यांच्या हातांत राहणार हें उघड आहे.

---

## महायुद्धाची प्रगति.

मित्रराष्ट्रांच्या विजयप्राप्तीच्या कामांत रशियांतली अस्वस्थता अद्याप मोठें विघ्न करून चिंता उत्पन्न करीत आहे. ज० कॉर्निलॉफ व केरेनझस्की यांच्यांतला बेबनाव कांहींसा मुद्राराक्षस नाटकांतल्या चाणक्य आणि राक्षस यांच्यांतल्या राजनीतीच्या झटापटी सारखा आहे. दोघेही देशाभिमानी पुरुष आहेत दोघेही जर्मनांचे कट्टे शत्रु आहेत. पण मुत्सद्दीपणा आणि शिपाईगिरी यांपैकीं कोणी कोणाला ताब्यांत ठेवावें या मुद्यावर दोघांमध्यें तीव्र मतभेद होऊन हल्लींची शोचनीय स्थिति प्राप्त झाली आहे. मि० केरेंझस्की यांनीं जनरल कार्निलाफ यांना बंडखोर समजून कैद करून ठेविलें आहे. त्या बरोबर त्यांच्या पक्षाचे दुसरेही कित्येक मोठाले लष्करी अधिकारी पकडण्यांत आले आहेत, आणि पांचांचें मंत्रीमंडळ नेमून मि० केरेंझस्की यांनीं रशिया हें लोकसत्तात्मक राज्य झालें आहे अशी द्वाही फिरविली आहे. पण द्वाही, ठराव, व जाहिरनामे यांनीं काम होतें तर रशियाची आज जी स्थिति झाली आहे ती कधींच झाली नसती. रूटरचा बातमीदार गंभीरपणानें सांगत आहे कीं ज० कार्निलाफ यांस व त्यांचे साथीदारास पकडल्यानें रशियन सरकारच्या मार्गांतला एक कांटा दूर झाला आणि लोकांत खऱ्या स्वदेशाभिमानाची जागृति दिसूं लागली आहे. आतां भविष्य निष्कंटक आहे. पण त्या बरोबरच अशी ही बातमी आली आहे कीं जिच्या योगानें रशियन सरकारच्या मार्गांतल्या अडचणी दूर झाल्या असें ह्मणतां येत नाहीं. रशियन लष्करी शिपाई व कामकरी यांच्या प्रतिनिधींच्या कौंसिलानें असा एक ठराव केला आहे कीं जमीनदारांची मालमत्ता जप्त करून ती शेतकऱ्यांना बक्षिसादाखल वाटून देण्यांत यावी व उद्योगधंद्यावर कामकरी लोकांची सत्ता ठेवून भांडवलवाल्यांवर कर बसवावा, व इस्टेटवाल्या आणि मध्यम वर्गाच्या लोकांचा राज्यकारभारांत हात ठेवूं नये; इतकेंच नाहींतर तहाला अनुकूळ असा ही त्यांचा ठराव होता, पण पुढें तो रद्द झाला अशा प्रकारच्या ठरावाला सध्याच्या स्थितींत रशियन सरकारकडून मान्यता मिळण्याचा मुळींच संभव नसल्यामुळें रशियांत प्रजासत्ताक राज्याची द्वाही फिरली, तरी शांततेची द्वाही तिच्या बरोबर फिरली असें ह्मणतां येत नाहीं. इतके दिवस अधिकाऱ्यांची सत्ता आपल्याच हातांत घेऊन त्यांचे हुकुम अमान्य करण्याचें खोडसाळ लक्षण लष्करांतच दिसत होतें; पण आतां तो प्रकार सर्व राज्यभर झालेला आहे. ज. कॉर्निलाफ याचें मि. केरेनझस्की यांशीं न पटण्याला एक कारण हें होतें कीं कॉर्निलॉफ हे बडबडीचे कट्टे द्वेष्टे आहेत. कृति हा त्यांचा गुरुमंत्र आहे आणि त्या मंत्राचा प्रयोग लष्करीखातें मुत्सद्दी लोकांच्या कह्यांतून सोडविण्याचे कामीं त्यांनीं करून पाहिला व तो फसला. याचा परिणाम मात्र फार वाईट झाला. कॉर्निलॉफ सारख्या हुषार सेनापतीच्या सेवेला रशियाला ऐन आणीबाणीच्या वेळीं मुकावें लागलें. आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं रशियाची अशी दुर्दशा झाली असतां ही जर्मन शत्रूचें पाऊल लिव्होनिया प्रांतांत विशेषसें पुढें पडलें नाहीं. यावरून काय निष्कर्ष काढावयाचा? रशियांत पुढें पाऊल टाकण्याची शत्रूची इच्छा नाहीं, व त्याचें लक्ष दुसरीकडे कोठें आहे कीं काय? कां पश्चिम रणक्षेत्रांत लवकरच माजणाऱ्या तुमुळ युद्धासाठीं तो शक्ति संचय करीत आहे? कां सध्याचें रशियन वातावरण लोकसत्तेच्या ध्वनीनें भरून गेलें असल्यामुळें रशियाच्या राज्याच्या अंतर्भागीं जाण्यानें जर्मन शिपायांना तो संसर्गजन्य रोग लागेल अशी भीती जर्मन सरकारास वाटत आहे?

---

## बाल्कन रणक्षेत्र.

या रणक्षेत्रांत गेल्या आठवड्यांत बरीच ह्मणण्यासारखी धामधूम चालली होती. जनरल सारेल यांनीं मोनास्टिरच्या नैर्ऋत्येला शत्रूंच्या कित्येक ठाण्यांवर हल्ला करून यश मिळविलें, आणि पोग्राडेज हें सोयीचें ठिकाण हस्तगत करून मोनास्टिरचा मार्ग आपल्या लष्कराला खुला करून दिला. याचा उपयोग मित्रराष्ट्रांना फार मोठा होण्यासारखा आहे हें लवकरच दिसून येण्याचा संभव आहे.

---

## इटली व आस्ट्रिया.

मौंट सान गाब्रिएल हें ठिकाण हस्तगत करण्याचा अतिशय निकराचा प्रयत्न आज पंधरावीस दिवसांपासून चालला आहे, पण आस्ट्रियाला त्या कामांत यश मिळत नाहीं. इटालियन लोकांनीं चिकाटी धरून अखेर त्या डोंगरावर आपलें निशाण फडकाविलें. तथापि तें उच्च शिखर व बेनसिझाचें मैदान यांच्या मधील लहान लहान डोंगर अद्याप शत्रूच्या ताब्यांत आहेत. ते मिळत तोंपर्यंत इटालियन लोकांना चैन पडावयाचें नाहीं व त्यासाठीं किती रक्त खर्चीं पडेल त्याचा नेम नाहीं.

---

## पर्जन्यास्त्र.

प्रस्तुतच्या युद्धांत विषारी वायूनें भरलेल्या कुलुपी गोळ्यांचा उपयोग प्रथम जर्मन लोकांनीं केला. या वाग्वस्त्राचा बंदोबस्त ब्रिटिश व फ्रेंच (आणि हिंदुस्थानी) शास्त्रज्ञांनीं केलेला पाहतांच कल्पक जर्मन आतां पश्चिम रणक्षेत्रांत पर्जन्यास्त्र सोडूं लागले आहेत. रंध्राविरहित अशी मातीचीं मडकीं तयार करून त्यांत पाणी भरावयाचें व तीं मडकीं यांत्रिक शक्तीनें इंग्रज व फ्रेंच यांचे अंगावर सोडावयाची असा जर्मनांचा क्रम आतां सुरू आहे. अगोदरच या रणक्षेत्रांतली हवा वाईट व जमीन दलदलीची; तशांत हा पावसाचा भाडिमार मित्रसैन्यांना सोसावा लागत आहे. गतवर्षींच्या सॉमच्या लढाईशीं तुलना केली तर अलीकडे कैद केलेल्या जर्मन शिपायांची संख्या कमी दिसेल, पण मारले गेलेल्या जर्मन शिपायांची संख्या अधिक आहे यावरून जर्मन बळाचा ऱ्हास होत चालला आहे याविषयीं शंका रहात नाहीं. प्रिन्स रुपरेक्टच्या सैन्यांतले लोक फार खपले ही जर्मनीला काळजी उत्पन्न करणारी गोष्ट आहे. तिच्या बरोबरच इंग्रजी वैमानिकांनीं शत्रूच्या रेल्वे स्टेशनावर, दारू गोळ्यांच्या संग्रहावर, व कारखान्यांवर बांब टाकून पुष्कळ नाश केला ही ही त्यांना चिंता उत्पन्न करणारीच गोष्ट आहे. अलीकडे जर्मन वैमानिकांचे धाडशी प्रयत्न शिथिल झालेले दिसत आहेत.

---

## फ्रेंचांकडील बातमी.

प्रत्यक्ष लढाईची अशी फ्रेंचांसंबंधाची विशेषशी बातमी गेल्या आठवड्यांत आली नाहीं. फ्रेंच सरकारचें लक्ष अलीकडे नवें प्रधानमंडळ तयार करण्यांत गुंतलें होतें. इंग्लंडच्या धर्तीवर नवें जोरदार प्रधानमंडळ नेमण्याचा विचार करून त्याप्रमाणें तें नेमण्यांत आलें आहे. या नव्या प्रधानमंडळाचे मुख्य प्रधान पेनलिव्ह हे आहेत. बुद्धिमत्ता व शीलमत्ता यांबद्दल यांची ख्याति असून फ्रेंच सोशियालिस्ट पक्षामध्यें ही त्यांचे विषयीं आदर दिसतो. या प्रधानमंडळांत रॅडिकल व मॉडरेट या दोन पक्षांचेंच वर्चस्व आहे. सोशियालिस्ट पक्षानें यांत भाग घेण्याचें नाकारलें. याचा अर्थ फ्रान्समध्यें एकी नाहीं असा न घेतां ज्या तत्त्वावर नवें प्रधान मंडळ नेमण्यांत आलें तें तत्त्व आपणांस मान्य नाहीं इतकाच समजावा, असें सोशियालिस्ट पक्षाचे पुढारी टॉमस यांनीं जाहिर केलें आहे.

---

## प्रेमध्वनी

### ( चेम्सफर्डची मुरली. )

लॉर्ड चेम्सफर्ड यांनीं तारिख ५ रोजीं जी मुरली वाजविली, तिचा ध्वनी मधुर व मनोहर असाच आहे. तेव्हां पासून येथील राजकीय वातावरण निराळ्याच गोष्टींनीं ओतप्रोत भरून गेलें आहे. सहका-

सहकारित्व, सहानुभूती व प्रेमसंदेश यांनीं प्रजाजन व राजपुरुष एक दिलानें वागूं लागले आणि ते इतकें कीं कांहीं अपूर्वता कायदे कौंसिलांतील कारभाराला आली आहे. दडपशाही पालटली आणि लागलीच सर ओडायर हे पश्चात्ताप पाऊन आपल्या निरर्गल भाषणाबद्दल माफी मागतात आणि खुद्द लॉर्ड चेम्सफर्ड या रोषाच्या गोष्टी विसरण्याचा आग्रह करितात. वरिष्ठ कायदे कौंसिलांतच काय पण हिंदुस्थानच्या इतिहासांत हा प्रकार अद्भुत व अपूर्व होय. मद्रासकडील व कलकत्याकडील ॲंग्लो इंडियन मंडळी या नव्या प्रेमाच्या गाण्यानें इतकी संतापली आहे कीं सरकारी अधिकाऱ्यांनीं राजीनामे द्यावेत असा ही वर्तमान पत्रांतून उपदेश सुरू झाला आहे. लॉर्ड चेम्सफर्ड व त्यांच्या बरोबर राजश्री मॅंटेग या दोघांनाही या नव्या सहकारित्वाच्या पद्धतीबद्दल ही मंडळी त्यांना सोडून देण्याला तयार झाली आहे. लॉर्ड हार्डिंज जसे ह्मणाले कीं माझ्या इंडियन कारकीर्दीबद्दल निकाल होण्यापूर्वी इंडियन प्रजाबंधूंनीं तो निकाल सांगितला पाहिजे आणि कदाचित प्रस्तुतचे राजकीय आकाश असेंच सांगतें कीं राजश्री मॅंटेग आदिकरून मंडळीस ही सत्कृत्याबद्दल इंडियन प्रजाबंधूंचें पाठबळ घ्यावें लागेल हिंदी लोकांनीं जी एवढी अंतःकरणाची चळवळ करून सोडली तिचाच परिणाम राजकीय वातावरणांत उत्पन्न झालेला नवा प्रेमध्वनी होय. दडपशाही विषयीं द्वेष व्यक्त करतांना इंडियन हृदयांतून जे राजनिष्ठेचे प्रवाह उगम पावले त्यांमध्येंच महायुद्धांत जय मिळविण्याची प्रसादचिन्हें सरकारास दिसूं लागलीं. ह्मणून आह्मी ह्मणतों कीं ईश्वरी संकेताची सुवर्ण ध्वजा उभारणाऱ्या '**कालाय तस्मै नमः**'

## विचारस्फूर्ति

राजकीय वातावरण नव्या विचारांनीं इतकें तेजस्वी व प्रकाशमय झालें आहे कीं या लोकजागृतीच्या सुपरिणामाबद्दल आह्मी उमरावती, आकोला, यवतमाळ, खामगांव इत्यादि वऱ्हाडांतील ठिकठिकाणच्या सार्वजनिक कार्यकर्त्या पुढाऱ्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. सर्व प्रकारच्या विचारांचें संमिश्रण होऊन निरनिराळी कार्यदिशा आमचे अग्रणी जनसमूहास दाखवीत आहेत. आत्मविश्वास विलक्षण स्वरूपाचा दृष्टीस पडतो. आशा व आकांक्षा यांनीं जनसमूह भविष्य कालाच्या कार्याकडे जोरानें व जोमानें ओढून नेला जात आहे आणि या उत्क्रांतीमध्यें सर्वांच्या अंतःकरणांत प्रेमबंधनें राज्य करीत आहेत व त्यामुळें विचार वैचित्र्याला महत्व येऊन राजकीय कार्यांना सुंदरता येत चालली आहे. या नव्या क्रांतीचें निदर्शक ह्मणून आह्मी गेल्या सप्ताहांत येथें झालेल्या जाहीर सभांतील कांहीं विचार मुद्दाम लोकांच्या आदरासाठीं मांडीत आहों.

रावबहादुर अण्णासाहेब महाजनी हे श्रीमती बिझांट यांच्या संबंधाच्या आनंदप्रदर्शनाच्या दिवशीं अध्यक्ष होते. हे सार्वजनिक संकटाच्या वेळीं लोकांच्या विश्वासाचे आधारस्तंभ आहेत आणि त्यांच्या शिक्षणाखालीं तयार झालेल्या पिढीला किंबहुना सर्व तरुण पिढीला समुत्साह देण्याला, त्यांच्या कडून निरनिराळीं कार्यें करवून घेण्याला, आणि आपल्या आशामय व प्रशांत वचनामृतानीं त्यांस कार्यें शिखराकडे नेण्याला हे नेहमीं आनंदानें तयार असतात हें आकोल्याचें सद्भाग्य होय. त्यांच्या आज्ञेवरून नामदार राजश्री रामभाऊ महाजनी यांनीं अभिनंदनाच्या ठरावांत आपल्या मनोवृत्ती कशा उचंबळतात हें सांगतांना ह्मणाले कीं, सनदशीर चळवळीचा हा सुदीन व **जयस्तंभ** होय. पुढील जिना उंच व पायऱ्या बिकट आहेत तेव्हां स्वार्थत्यागानें व एकोप्यानें करारीपणाची, नेटाची व स्पष्टवक्तेपणाची पुढील लढाई जिंकली पाहिजे. भावी प्रवास आपल्या कंपूतील एकोप्यानेंच सुसाध्य होईल आणि श्री बिझांटवरील लोकविश्वास त्या काँग्रेसच्या अध्यक्ष निवडल्या जात आहेत यांतच व्यक्त होतो. या आनंदाच्या प्रस्तावांत जी स्वराज्याची आशा प्रकट केली आहे ती ब्रिटिश मुत्सद्देगिरी वरील आमच्या विश्वासाचीच मुख्य ध्वजा होय आणि सर बेंजामिन हे आपल्या प्रांतासंबंधाची अटक दूर करून लोकांचा असंतोष राहूं देणार नाहींत व पुष्कळ दिवसाची ही खळवळ शांत करितील अशी बळकट इच्छा प्रदर्शित केली याला अनुमोदन देतांना रावबहादूर दामले यांनीं आपला अत्यानंद निरनिराळ्या प्रकारांनीं व्यक्त केला आणि श्री बिझांट यांच्या अपूर्व चरित्राची आठवण देऊन लोक कल्याणासाठीं निस्सिमभक्ती, स्वार्थत्याग व निग्रहाचें युद्धकौशल्य हीं शिकण्यांतच खऱ्या आनंदाचा परिणाम झाला पाहिजे असें त्यांनीं ध्वनित केलें.

या प्रस्तावाला समोदन देतांना राजश्री चिपळूणकर यांनीं श्री देहांत असणाऱ्या या बिझांटचें अभिनंदन राष्ट्र कां करीत आहे या विषयीं फार उत्कृष्ठ वक्तृत्व केलें. बिझांटबाईमध्यें मानवी अंतःकरणांतील दैवी गुणांचा जो उत्कर्ष दृष्टीस पडतो तो त्यांच्या क्षात्रतेजामुळें होय. त्यांची सत्यनिष्ठा मृत्यूलाही न भिणारी आहे. आज वयाच्या ७० व्या वर्षी अटकेंत असतांना व शरीर क्षीण असतांना स्वराज्याची ध्वजा काढून नेणऱ्या शिपायाला उद्देशून त्यांनीं जे उद्गार काढिले ते सर्व जगाला क्षात्रधर्म शिकवतील. शिपायाला जसा आपला युनिअन जॅक ह्मणजे शिपाई जसा प्राण जाईपर्यंत हें निशाण खालीं पडूं देणार नाहीं, त्याप्रमाणें रक्तहारित रंगाची ही स्वराज्याची ध्वजा ह्मणजे श्री बिझांटच्या आयुष्याचें ध्येय होय आणि त्यांनीं त्याच निश्चेनें तें उभारलेलें आहे. सरकार, ह्मणजे, आपली उपास्य देवता होय. तिच्या स्वभावाचें खरें ज्ञान आतां कोठें आह्माला होऊं लागलें आहे. 'दार ठोकीत रहा ह्मणजे तें उघडेल' या तत्वावर ब्रिटिश स्वभावाची रचना आहे. तेव्हां त्याच सनदशीर पद्धतीनें आपली चळवळ सतत चालू राहिली पाहिजे असें ही अध्यात्मशास्त्राची मुख्य अध्यापक बाई उच्चस्वरानें सांगत आहे. आणि राष्ट्रीय मंत्री, पंडित आणि सामर्थ्यवान् व कर्तृत्ववान् लोक आपल्या मातृभूमीच्या सेवेसाठीं या बाईच्या प्रोत्साहनामुळेंच इतके उद्युक्त झालेले सर्व राष्ट्रभर दिसत आहेत.

याच ठरावाला पुष्टी देतांना राजश्री अनंतराव भागवत यांनीं फार मौजेचे कोटिक्रम करून अशा सभांचें रहस्य सांगितलें. दडपशाहीची मात प्रथम झाली. पण त्याच्या उलट ही लोकांच्या चळवळीची ग्यादीमात होय. अशा चळवळीच्या भाडणांतच बीज उत्पन्न होते आणि त्यामुळें सर्व राष्ट्रवीर एकजीव होऊन आपल्या देशाचीं कार्यें करूं लागतात. रा. महमद युसफ यांनीं शुकरिया अदा करतांना एक आंख हसती है व राजश्री महमद अली व शौकतअली याच्या अटकेसंबंधानें दुसरी आंख रोती है असें जोरानें सांगितलें. तेव्हां सर्वानुमतें त्यांच्या अटकेसंबंधाचा निर्देश मुख्य ठरावांतच करण्यांत आला.

राजश्री रामधन शेट यांनीं ह्मटलें कीं, मिसेस बिझांट यांनीं क्षात्रतेजापेक्षां जें ब्राह्मतेज सर्व राष्ट्रभर प्रदीप्त केलें आहे त्याचेंच परिणाम या गोष्टी होत आणि हें तेज कधीं ही नाश पावणारें नाहीं.

राजश्री जयकुमार चवरे यांनीं एक निराळीच तात्विक दृष्टी सांगितली. ते ह्मणाले कीं राष्ट्राची विल पॉवर ह्मणजे इच्छा शक्ती काय करणार नाहीं बरें? लोकांनीं आपल्यावर प्रीती करावी, त्यांनीं आपणाला द्रव्य द्यावें, विद्या द्यावी अशी जेव्हां इच्छा असेल तेव्हां ती सफळ करण्याचा इच्छाशक्तीच्या शास्त्रान्वयें मुख्य सिद्धांत असा कीं, आपणच दुसऱ्यावर प्रीती करण्यास प्रारंभ करावा, आपल्या जवळील द्रव्य द्यावें, आपल्या विद्या दुसऱ्यास शिकवाव्या ह्मणजे त्या त्या गोष्टी परत आपणाला चांगल्या प्रकारें लाभतात. या न्यायानें सरकारला सर्व शक्तिमान साम्राज्य पाहिजे असेल तर त्यांनीं आपल्या प्रजाजनांना स्वातंत्र्य व स्वराज्य खुल्या दिलानें दिलें पाहिजे. ज्या बाईनें आपल्या चळवळीमुळें सर्व जग हलवून सोडलें त्या सुटल्या यांत आपल्या कार्यासिद्धीच्या दृष्टीनें थोडी पीछेहाट होऊन धंदपगा येण्याचा संभव आहे.

अध्यक्ष रावबहादुर अण्णासाहेब यांनीं उपसंहारांत बंगाल्यांतील १५०० तरुण अद्याप अटकेंत आहेत ही मुळीं कल्पना नव्हती असें सांगितलें. आपण या बाबतींत इतके दिवस गुपचूप बसलों ह्मणून आपण या सरकारी अटकेचा निषेध न केल्यामुळें बंगालच्या सहानुभूतीला अंतरलो आहों. बिझांटबाईच्या अटकेचें संकट हें परिणामीं तारकच झालें आहे तेव्हां हें आता उसळलेलें लोकमत अटकेंतील तरुणांची सुटका केल्यावांचून राहणार नाहीं. सर ओडायर सारख्यांचे बुक्कार आणि सरकारच्या राज्यकारभाराच्या उत्तमतेबद्दलची गर्वोक्ती हीं मेसोपोटेमियाच्या लढाईनें अगदीं विफळ करून सोडली आहे. शिक्षण, जंगल, रेल्वे इ. इ. खात्यांचे कारभार इतके वाढले आहेत कीं ते सरकारला स्वतःच्याच घमेंडीवर लोकांना असंतुष्ट ठेवून नीटसे चालण्यासारखे नाहींत. आतां सरकारची **बुद्धी फिरली** आहे तेव्हां वस्तुस्थिती पाहूनच सरकार आमची योग्य मदत घेतील, अमेरिकन राष्ट्रानें रशियाचे नवे स्वातंत्र्य पाहून अभिनंदन केलें तेव्हां या साधुमार्गानें सर्व्हियाला व बेलजमला स्वातंत्र्य देणारें आपलें साम्राज्य आपल्याच ताब्यांत असलेल्या इंडियाला स्वातंत्र्य दिल्याशिवाय राहणार नाहीं अशी बळकट आशा व्यक्त केली आणि सर्वच तरुण पिढीला भाषण, विचार व कृती यांत मर्यादा व आत्मसंयमन ठेवण्याविषयीं मोठ्या कळकळीचा उपदेश करून राष्ट्रीय आकांक्षा पुऱ्या करण्याविषयीं **राज राजेश्वरास** प्रार्थना केली.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—उत्तरा नक्षत्र अगदीं शेवटीं शेवटीं पर्जन्याची झोडच करीत आहे. मेघगर्जना विलक्षण गडगडाट करितात; सायंकाळीं पश्चिम क्षितिजाचे रंग अप्रतिम मनोहर व नवे नवे असतात. सर्व वृक्ष व वेली सूर्य प्रकाश व चंद्र प्रकाश यांचेंच स्वागत करण्यासाठीं फार उत्कंठित आहेत.

**गणपत्युत्सवः**— मुर्तिजापूर, यवतमाळ, उमरावती, खामगांव, आकोला, इत्यादि ठिकाणाचे हे उत्सव ह्मणजे ज्ञानसत्रेंच होत. ठिकठिकाणचे लोक निरनिराळ्या गांवीं जाऊन आपल्या जवळील सरस्वतीचा प्रसाद इतर सर्व बंधुभगिनींना मोठ्या आनंदानें वाढून देत आहेत. "संदेश" कर्ते राजश्री अच्युतराव कोल्हटकर व 'केसरी' कर्ते राजश्री नरसोपंत केळकर या उभयतांच्या सुश्राव्य व्याख्यानांचा आकोल्यास या आठवड्यांत लाभ होणार आहे.

मुंबईच्या श्रीमती सौ. अवंतिकाबाई गोखले ह्या यवतमाळास व्याख्यान देणार आहेत आणि नागपूरच्या श्रीमती मथुराबाई द्रवीड या आकोल्याच्या उत्सवांत व्याख्यान देणार आहेत. या दोघींजणींच्या औत्सुक्याबद्दल आह्मी आनंद प्रदर्शित करितों.

श्रीमती तापीबाई हर्डीकर बी. ए. शाळा इन्स्पेक्ट्रेस ह्या येथें आल्या असून मुलींच्या शाळांच्या परीक्षा चालू आहेत.

रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार यांची स्वारी वाशीमाकडे दौऱ्यावर आहे आणि रावबहादुर वासुदेव रामचंद्र ढोबळे डिस्ट्रिक्ट ॲंड सेशन जज यांची स्वारी सेशन निमित्त बुलढाण्यास आहे.

'गंधर्व नाटक मंडळी' नें गेल्या शनिवारीं मानापमानाचा प्रयोग करून दाखविला आणि या कंपनीमुळें लोकांच्या गायन लोलुपतेलाही थोडा जोर आलेला आहे; पण लोकांच्या मनाच्या उडी प्रमाणें यांचीं नाटकें यापेक्षां अधिक चांगलीं व्हावयाला पाहिजेत.

**पाण्याचे नळः**— आतां पाऊस चांगला धो धो पडत आहे, आणि कापशीला एवढा मोठा पाण्याचा संग्रह करण्यांत आला आहे, तेव्हां निदान दिवसाचे १२ तास पाणी जोरानें सोडण्याची आतां म्युनिसिपालिटी व्यवस्था करील असा आह्मास भरंवसा वाटतो.

## नोटीस

**नोटीस कलम ११ आक्ट ८ सन १८९० प्रमाणें.**

कि. दिवाणी मुकद्दमा नंबर ७६ सन १९१७ इ. विद्यमान डिस्ट्रीक्ट अन्ड सेशन जज साहेब यांचें कोर्ट

मुक्काम आकोला

नांव कृष्णाजी

बापाचें नांव रामचंद्र सकळकळे

जात ब्राह्मण राहणार जळगांव

तहसील जळगांव जिल्हा बुलडाणा

च्या अल्पवयी यशवंत व काशीनाथ

उमर वर्षे १४ व १०

हल्ली राहणार व ता. जळगांव तहसिलीचे (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालनकर्ता (१) नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदर्हु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख ३ माहे नोव्हेंबर सन १९१७ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यात येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जा-बद्दल जर तुह्मास कांहीं तक्रार असेल तर. तुह्मांस जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांना जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे; आणि तुह्मांस असें ही नोटीस देण्यात येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तुह्मी हाजर न झाल्यास, तुमच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख १९ माहे सप्टेंबर सन १९१७ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली

सही

W. R. Dhobley

डि. जज

पश्चिम वऱ्हाड

आकोला

नो. नं. ४०६

## नोटीस.

विद्यमान सिनीयर सबजज्ज साहेब कोर्ट आकोला

सकसेशन सरटीफिकीट नं. २० सन १९१७

चौ. ता. ६।१०।१९१७

अर्जदार

राजना बा निंबागीरी रा. वरंगळ

प्रतीपक्षी

१ यल्लमा मयत निंबागिरी याची राख

२ व्यंकटस्वामी निंबया रा. आकोला

सर्वत्र लोकांस या नोटिशीचेद्वारें कळ-विण्यांत येते कीं, वरील अर्जदारानें त्याचा बाप मयत निंबागिरी यानें आकोला येथील सेव्हींग ब्यांकेंत १९२९८३८१ ठेवलेली रक्कम वसूल करण्यासाठीं विद्यमान कोर्टांत अर्ज दिलेला आहे. व त्या अर्जाची चौ. ता. ६।१०।१९१७ इ. रोजीं नेमलेली आहे. तरी ज्या कोणास सदर्हू अर्जास हरकत करणें असेल अथवा तत् संबंधीं कोर्टात कांहीं उजर करणें असेल तर त्यानें ता. ६।१०।१७ इ. रोजीं कोर्टांत हजर राहून आपले ह्मणणें कोर्टापुढें मांडावें. ता. १८-९।१७

सही

N. G. Subhedar

Addl District Judge

Akola

N. N. 407


## अंगुरी

# हिंग.

पवित्र आणि अस्सल १८८ उत्तम कस्तुरी ३९, शुद्धशिलाजीत ८८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १= कागजी बादाम ८९ पौंड, सेबाचा मुरब्बा २ पौं. टिन १।

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५**

नो० नं० ९

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्व व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारेंसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विक त बडतोब दूर होतात किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज याचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 6 Dadar Bombay

# लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आह्मी येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान, दळण्याच्या गिरण्या **जीन व प्रेसचें सामान** वगैरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठावितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारे सर्व सामान मोटारचे व घोडे गाडीचे गाद्यांचे कापड, व दुसरें लागणारे सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरे विजेचे सामान, स्यांपस् वगैरे माल पुरावितो. एकवेळ आरडर देऊन कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट मुंबई नंबर २

नो. नं. ३९८

## गरीबांस फुकट

# रामबाण मलम

( कोणत्याहि त्वग्रोगावर )

गुणकारी किं. ६ आणे.

# केशनाशक पूड.

( ५ आणे )

(क्याटलॉग फुकट) पत्ता. व्ही. आर मुळे नांदूर. G. I. P.

नो० नं० ३७०

## रोल्डगोल्ड सोन्याचे

### कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. ४. ३—४; गोट जोडी २—२॥; पाटल्या जडी २—२॥; वज्रटीका ३—४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४—५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. साची २-३-४; अंगठी १; सल्ले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २-२॥. सरी ४

**केंस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता— **मगनलाल के. आणि कंपनी गिरगांव- मुंबई**

नो० नं० ५

ॐ नमः श्रीगणेशाय.

# आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भासंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटां मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३९ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६९ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५९० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तीडक, मुत्रांची लाला, संकोच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवू.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रींची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, योक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुंगधा अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.**

**मु० मुर्डी, पो० हर्णै, जिल्हा रत्नागिरी**

नो० नं० २२


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशीवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.